नागपूर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com




* वर्ष ५५ * अंक १७१ * | * नागपूर * | रविवार, दिनांक २१ सप्टेंबर २०२५ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## २४ ला निवृत्त होणार मिग २१ लढाऊ विमान

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २० :**
भारतीय हवाई दलाचा कणा मानले जाणारे मिग-२१ विमान २६ सप्टेंबर रोजी निवृत्त होणार आहे. ६२ वर्षांच्या सेवेत त्यांनी १९७१ च्या युद्धात, कारगिलमध्ये आणि इतर अनेक मोहिमांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली.

आता त्याची जागा तेजस एलसीए मार्क १ ए घेईल. या लढाऊ विमानाला चंदीगड एअरबेसवर निरोप देण्यात येईल, ज्यामुळे त्याच्या सेवेचा अधिकृत शेवट होईल. मिग-२१ जेट पहिल्यांदा १९६३ मध्ये भारतीय हवाई दलात समाविष्ट करण्यात आले. ते भारताचे पहिले सुपरसॉनिक जेट होते, ते ध्वनीच्या वेगापेक्षा (३३२ मीटर प्रति सेकंद) वेगाने उडू शकते. नंतर वारंवारच्या अपघाताने हे विमान बदनाम झाले होते.

## थोडक्यात...

### राष्ट्रपती मुर्मूंनी केले गयामध्ये पिंड दान

■ **गया :** राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे शनिवारी, २० सप्टेंबर रोजी गया येथे



विष्णुपद मंदिरात पिंडदान केले. मंदिर संकुलातील ॲल्युमिनियमपासून बनवलेल्या हॉलमध्ये राष्ट्रपतींसाठी तीन खोल्या उभारण्यात आल्या होत्या. एका खोलीत राष्ट्रपतींनी त्यांच्या कुटुंबासह पिंडदान केले.
राष्ट्रपतींचे वडिलोपार्जित घर ओडिशातील मयूरभंज येथे आहे. राष्ट्रपती मुर्मू यांच्या कुटुंबातील एक सदस्य पिंडदान करण्यासाठी खूप पूर्वी गयाला भेट देऊन आला होता. तथापि, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू स्वतः पिंडदानासाठी गयाला भेट देण्याची ही पहिलीच वेळ आहे.

### देशाच्या विकासात न्यायव्यवस्था अडथळा

■ **नवी दिल्ली :** पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार परिषदेचे (ईएसी) सदस्य संजीव सान्याल यांनी शनिवारी सांगितले की, आपली न्यायव्यवस्था ही विकसित भारतासाठी सर्वात मोठा अडथळा आहे. असे अनेक कायदे आहेत जे समस्या सोप्या करण्याऐवजी गुंतागुंतीच्या करतात. ब्रिटिश काळातील माय लॉर्ड सारख्या संज्ञांनाही न्यायालयाचा आक्षेप आहे. हे बदलले पाहिजेत.
सान्याल यांनी महिन्यांच्या न्यायालयीन सुट्ट्यांवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ते म्हणाले की, राज्याच्या इतर भागांप्रमाणेच न्यायव्यवस्था ही एक सार्वजनिक सेवा आहे. तुम्ही पोलीस विभाग किंवा रुग्णालये महिने बंद ठेवू शकता का? संजीव सान्याल यांनी दिल्ली येथे झालेल्या भारताच्या महाधिवक्तांच्या परिषदेत हे वक्तव्य केले. भारताची मोठी समस्या म्हणजे कायदा आणि न्याय वेळेवर लागू करण्यात अक्षमता. आपल्या देशात करार आणि न्याय वेळेवर मिळत नाही, असेही ते म्हणाले.

### कुडमी समुदायाचे आंदोलन

**रांची :** झारखंडमध्ये कुडमी समुदायाचे लोक शनिवार, २० सप्टेंबर रोजी निदर्शने करत आहेत. अनुसूचित जमाती (एसटी) श्रेणीत समावेश करण्याच्या मागणीसाठी रेल टेका आंदोलन केले जात आहे.
राज्यातील ४० रेल्वे स्थानकांवर निदर्शने सुरूच होती. पारंपारिक पोशाख परिधान करून आणि ढोल-ताशांसह निदर्शक सकाळपासूनच रेल्वे रुळांवर उतरले.
गिरिडीह, चक्रधरपूर, जामतारा आणि बोकारो येथे निदर्शकांनी रेल्वे रुळांवर बसून गाड्या रोखल्या. निदर्शनांना प्रतिसाद म्हणून रांचीमधील चार रेल्वे स्थानकांवर कलम १४४ लागू करण्यात आले आहे.

## कायदा व सुव्यवस्थेच्या प्रभावी अंमलबजावणीने

# महासत्तेकडे वाटचाल

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २० :**
अमली पदार्थ संबंधी गुन्ह्यांत झीरो टॉलरन्स महत्वाचे कायदा व सुव्यवस्थेच्या प्रभावी अंमलबजावणीने देश महासत्तेकडे वाटचाल करू शकतो. कायदा व सुव्यवस्थेचे पालन करताना अमली पदार्थ संदर्भातील गुन्ह्ये हे पोलीस दलासमोर आव्हान ठरत असून यासाठी झीरो टॉलरन्स धोरण राज्याने अवलंबले आहे. तसेच बदलत्या काळानुसार सायबर क्षेत्रातील गुन्ह्याची उकल करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे अत्यावश्यक असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.





इंडियन पोलीस फाऊंडेशनच्या १० व्या स्थापना दिनानिमित्त भारताच्या आर्थिक विकासासाठी पोलीस दलाची पुनर्कल्पना या विषयावर चर्चासत्राचे पोलीस मुख्यालय, कुलाबा येथे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते.

कार्यक्रमास उत्तर प्रदेशचे सामाजिक न्याय राज्यमंत्री असीम अरूण, इंडियन पोलीस फाउंडेशनचे प्रमुख तथा मेघालयचे माजी राज्यपाल आर. एस. माशारी, फाउंडेशनचे अध्यक्ष उत्तर प्रदेशचे माजी पोलीस महासंचालक ओ.पी.सिंह, राज्याचे पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती यांच्यासह विविध राज्यातील पोलीस अधिकारी उपस्थित होते.

फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्र पोलीस आणि मुंबई पोलिसांनी कायम उच्च दर्जा टिकवून ठेवल्याचा अभिमान आहे. पोलीस आज भारताच्या आर्थिक विकासावर चर्चा करीत आहेत ही अभिनंदनीय बाब असून, या विचारमंथनातून येणारे नवीन उपाययोजनांचा शासन सकारात्मक विचार करेल असेही फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

पोलीस दल तसेच समाजातही एकात्मता असणे आवश्यक आहे. यामुळे समाजातील नकारात्मकता कमी होते आणि राज्य व देश शाश्वत प्रगतीकडे वाटचाल करू शकतो. काळानुरूप गुन्ह्यांचे स्वरूप बदलले असून, जुन्या काळातील शाश्वत मुल्यांसह नव तंत्रज्ञानाचा वापर केल्यास प्रगती शक्य आहे. अमली पदार्थांच्या माध्यमातून गुन्हेगारी वाढविणे आणि तरूणांना निष्क्रीय करण्यात येत आहे. आज अमली पदार्थांची गुन्हेगारी पोलीस दलासमोर एक आव्हान आहे. यामध्ये झीरो टोलरन्स असणे महत्वाचे असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

सोशल मीडिया आणि ऑनलाईन प्लॅटफॉमद्वारे गुन्हेगारी वाढत असून, डेटा ॲनालिटिक्स, मशीन लर्निंग आणि डिजिटल ट्रॅकिंग, ऑनलाईन गुन्ह्यांवर जलद प्रतिसादासाठी विशेष असे नव तंत्रज्ञान आणि पद्धती वापरणे आवश्यक आहे. बदलत्या सेवा क्षेत्राची परिभाषा समजून घेणे आवश्यक आहे. पोलिस दलाच्या आधुनिकीकरणासोबतच शाश्वत मूल्ये कायम ठेवण्याचा प्रयत्न होणेही आवश्यक असल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

यावेळी गुंतवणूक परिसंस्थेत विश्वात आणि स्थिरता निर्माण करण्यासाठी पोलीस प्रशासन, डिजीटल सीमांचे संरक्षण : धोरणात्मक पोलिस : उद्योग सहकार्याची गरज या विषयांवर चर्चा करण्यात आली.

## इतर देशांवरील अवलंबित्व

# आपला सर्वात मोठा शत्रू

■ **वृत्तसंस्था, भावनगर, दि. २० :**
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी सांगितले की, भारत वैश्विक बंधुत्वाच्या भावनेने पुढे जात आहे. जगात आपले कोणीही शत्रू नाहीत. प्रत्यक्षात, जर आपला शत्रू असेल तर तो इतर देशांवरील आपले अवलंबित्व आहे. हा आपला शत्रू आहे. भारताच्या या शत्रूला पराभूत करण्यासाठी आपण एकत्र आले पाहिजे.



जर आपण इतरांवर अवलंबून राहिलो तर आपला स्वाभिमान दुखावणारे आहे. आपण भावी पिढ्यांचे भविष्य धोक्यात घालू शकत नाही, म्हणूनच असे म्हटले जाते की शंभर समस्यांवरचा इलाज म्हणजे आत्मनिर्भर भारत.

पंतप्रधान मोदी गुजरातच्या एक दिवसाच्या दौऱ्यावर होते. ते सकाळी १० वाजता भावनगरमध्ये पोहोचले. त्यानंतर त्यांनी विमानतळ ते जवाहर मैदानापर्यंत रोड शो केला. येथून, पंतप्रधानांनी भावनगर, सौराष्ट्र आणि गुजरातमध्ये कोट्यवधी रुपयांच्या विकासकामांचे व्हर्च्युअल उद्घाटन आणि पायाभरणी केली.

या योजना बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्रालय, गुजरात मेरीटाईम बोर्ड आणि इतर राज्य मेरीटाईम बोर्डांशी जोडल्या गेल्या आहेत. त्यानंतर पंतप्रधान धोलेराचे हवाई सर्वेक्षण केले. अहमदाबादमधील लोथलला भेट देऊन राष्ट्रीय सागरी वारसा संकुलची पाहणी केली.

मोदी म्हणाले, जर आपला कोणी शत्रू असेल तर तो इतर देशांवरील आपले अवलंबित्व आहे. हा आपला शत्रू आहे. आपल्याला एकत्रितपणे भारताच्या या शत्रूला पराभूत करायचे आहे. आपल्याला नेहमीच ही गोष्ट पुन्हा सांगावी लागेल की परकीय अवलंबित्व जितके जास्त तितके देशाचे अपयश जास्त.

जगातील शांतता, स्थिरता आणि समृद्धीसाठी, जगातील सर्वात जास्त लोकसंख्या असलेल्या देशाला स्वावलंबी व्हावे लागेल. जर आपण इतरांवर अवलंबून राहिलो तर आपला स्वाभिमान दुखावला जाईल. आपण भावी पिढीचे भविष्य पणाला लावू शकत नाही, म्हणूनच असे म्हटले जाते की १०० समस्यांवर एकच औषध आहे, ते म्हणजे स्वावलंबी भारत.

## राज्यात येणार ८०,९६२ कोटींची गुंतवणूक

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २० :**
महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांच्या प्रमुख उपस्थितीत विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र आणि कोकण या चार विभागांमध्ये महाराष्ट्र शासन आणि विविध पोलाद कंपन्यांमध्ये एकूण ९ सामंजस्य करार झाले.

या करारांमधून राज्यात ८०,९६२ कोटी रुपयांची गुंतवणूक येणार असून, त्यातून ९०,३०० नवीन रोजगार संधी निर्माण होतील, असा दावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला.

या गुंतवणुकीचा एक मोठा भाग मराठवाड्याला मिळणार आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये एनपीएसपीएल ॲडव्हान्स्ड मटेरियल (अथा ग्रुप) ही कंपनी ५,४४० कोटी रुपयांची गुंतवणूक करणार असून त्यातून सुमारे २,५०० रोजगार निर्माण होतील. याव्यतिरिक्त, गडचिरोली, चंद्रपूर, नागपूर, सातारा आणि रायगड जिल्ह्यांमध्येही महत्त्वाचे प्रकल्प उभे राहणार आहेत.

महाराष्ट्राला स्टील उत्पादनात देशात अव्वल क्रमांकावर नेण्याचा निर्धार फडणवीस यांनी व्यक्त केला. या कार्यक्रमाची मुख्य थीम ग्रीन स्टील होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारने ग्रीन स्टीलसाठी ५,००० कोटी रुपयांचे विशेष मिशन सुरू केले आहे, असे ते म्हणाले.

महाराष्ट्र स्टील उत्पादनात चौथ्या क्रमांकावर आहे, पुढील ८ वर्षांत आम्ही महाराष्ट्राला पहिल्या क्रमांकावर आणू. सध्या राज्यात स्टील क्षेत्रात ८० हजार कोटींची गुंतवणूक झाली असून, यातून १ लाख रोजगारांची निर्मिती होईल. ही गुंतवणूक राज्याच्या विविध भागांत आल्याने विकासाला चालना मिळेल, असेही ते म्हणाले.

| प्रमुख कंपन्या | गुंतवणूक | रोजगार संधी |
|---|---|---|
| जिंदाल स्टेनलेस (रायगड) | ४१,५८० | ६०,००० |
| रश्मी मेटलर्जिकल इंडस्ट्री (गडचिरोली) | २५,००० | २०,००० |
| एनपीएसपीएल मटेरियल (संभाजीनगर) | ५,४४० | २,५०० |
| हरिओम पाइप्स (गडचिरोली) | ३,१३५ | २,५०० |
| सुमेध टूल्स (गडचिरोली) | २,००० | १,५०० |
| जयदीप स्टील वर्क्स (नागपूर) | १,३७५ | ६०० |
| जी. आर. कृष्णा फेरो अलॉइज (चंद्रपूर) | १,४८२ | ५०० |
| आयकॉन स्टील इंडिया (चंद्रपूर) | ८५० | १,५०० |
| फिल्ट्रम ऑटोकॉम्प (सातारा) | १००१ | २०० |

(गुंतवणूक आकडे कोटींत तर रोजगार संधी हजारांत)

## एसटीत १७,४५० जागांची मेगाभरती!

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २० :**
एसटी महामंडळात तब्बल १७ हजार जागांची भरती होणार आहे. या जागा चालक व सहाय्यकाच्या आहेत. त्यासाठी स्वतः एसटीच पात्र उमेदवारांना प्रशिक्षण देणार आहे. विशेषतः या पदासांसाठी दरमहा ३० हजार रुपयांपर्यंतचे मानधन दिले जाणार आहे. नोकरीच्या शोधात असणाऱ्या तरुणांसाठी ही मोठी संधी आहे.



परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी वरील नोकरभरतीची माहिती दिली. ते म्हणाले, भविष्यात येणाऱ्या ८ हजार नवीन बसेससाठी मनुष्यबळाची मोठी आवश्यकता आहे. त्यामुळे चालक व सहाय्यक या पदांसाठी कंत्राटी पद्धतीने १७,४५० जागांवर भरती केली जाईल. यासंबंधीची निविदा प्रक्रिया २ ऑक्टोबर रोजी सुरू होईल.

या भरती प्रक्रियेच्या माध्यमातून राज्यातील हजारो बेरोजगार तरुण-तरुणींना रोजगार उपलब्ध होणार आहे. त्यांना दरमहा ३० हजार रुपये एवढे वेतन मिळणार आहे. त्यामुळे होतकरू तरुण-तरुणींनी या संधीचा पुरेपूर फायदा घ्यावा, असे ते म्हणाले.

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या ३०० व्या संचालक मंडळाच्या बैठकीत भरतीचा हा निर्णय घेण्यात आला. या निर्णयानुसार, बससेवा सुरळीत सुरू ठेवण्यासाठी आवश्यक असलेले चालक व सहाय्यक मनुष्यबळ भाडेतत्त्वावर (कंत्राटी पद्धत) ३ वर्षांच्या कालावधीसाठी घेण्यासाठी ई-निविदा प्रक्रिया अवलंबण्यात येत आहे. अर्थात ही ई-निविदा प्रक्रिया ६ प्रादेशिक विभाग निहाय राबवण्यात येणार आहे. प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मनुष्यबळ पुरवणाऱ्या संस्थांकडून राज्य परिवहन महामंडळाला आवश्यक मनुष्यबळ वेळेत उपलब्ध होईल. कंत्राटी पद्धतीने भरती होणाऱ्या चालक व सहाय्यक उमेदवारांना प्रत्येकी ३० हजारांचे मासिक वेतन दिले जाईल. याशिवाय उमेदवारांना एसटीकडून प्रशिक्षणही दिले जार आहे.
बसेसची वाढती संख्या व त्यासाठी लागणारे मनुष्यबल मिळाल्यानंतर प्रवाशांना अखंडित, सुरक्षित व दजेर्दार बससेवा पुरवणे शक्य होईल, असा विश्वास मंत्री प्रताप सरनाईक यांनी यावेळी वव्यक्त केला.

उल्लेखनीय बाब म्हणजे काही दिवसांपूर्वीच पोलिस भरतीला मंजुरी देण्यात आली होती. मंत्रीमंडळाच्या मंजूरीनंतर प्रक्रियेला गती मिळण्याची शक्यता आहे.

## राज्याचे कर्ज एकूण महसुलाच्या

# फक्त १८.८७ टक्के

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २० :**
महायुती सरकारने लाडकी बहीण सारख्या लोकप्रिय योजनांची घोषणा राज्याच्या डोक्यावर कर्जाचा डोंगर उभा केल्याची टीका विरोधकांनी केली आहे. त्याला उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी प्रत्युत्तर दिले आहे. सध्या राज्यावर ९.३२ लाख कोटी रुपयांचे कर्ज असून, हे कर्ज राज्याच्या एकूण महसुलाच्या तुलनेत फार कमी आहे, असे ते म्हणालेत.



महाविकास आघाडीचे नेते राज्यावर कर्जाचे प्रचंड ओझे असल्याचा आरोप करत आहेत. पण अजित पवारांनी आकडेवारीसह हा आरोप फेटाळून लावला आहे. ते म्हणाले, राज्यावरील कर्जाचे प्रमाण नियमांच्या मर्यादित आहे. सध्या राज्यावर ९.३२ लाख कोटी रुपयांचे कर्ज आहे.

हे कर्ज राज्याच्या एकूण महसुलाच्या तुलनेत फार कमी आहे. नियमानुसार राज्यावरील कर्ज एकूण महसुलाच्या २५ टक्क्यांहून अधिक नसावे. त्यानुसार, २०२५-२६ या आर्थिक वर्षात राज्याचे कर्ज एकूण महसुलाच्या केवळ १८.८७ टक्के एवढे आहे.

हे प्रमाण अत्यंत सुरक्षित असून, राज्याची आर्थिक स्थिती मजबूत असल्याचे दर्शवते. त्यामुळे विरोधकांचे आरोप पूर्णतः निराधार आहेत.

## मंत्री अतुल सावेंच्या गाडीवर दगडफेक

■ **वृत्तसंस्था, छ. संभाजीनगर, दि. २० :**
गृहनिर्माण तथा इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांच्या गाडीवर दगडफेक करण्यात आल्याची घटना घडली आहे. या घटनेत सावे यांच्या गाडीची काच फुटली आहे. पोलिसांनी या प्रकरणी एका व्यक्तीला ताब्यात घेतले आहे. मराठा आरक्षणामुळे राज्याचे वातावरण तापले असताना ही घटना घडल्यामुळे चिंता व्यक्त केली जात आहे.

मंत्री अतुल सावे यांचे छत्रपती संभाजीनगर शहरात सिडको एन-४ भागातील संपर्क कार्यालयाबाहेर शनिवारी दुपारी त्यांच्या गाडीवर दगडफेक करण्यात आली. ही घटना घडली तेव्हा मंत्री सावे आपल्या



संपर्क कार्यालयात बसले होते. दगडफेकीत त्यांच्या कारची समोरील काच फुटली. इतर कोणतेही नुकसान झाले नाही.

## अमेरिकेने वाढवले एच-१ बी व्हिसा शुल्क

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २० :**
अमेरिकेने एच-१ बी व्हिसासाठी अर्ज शुल्कात वाढ केली आहे. अमेरिका आता एच-१बी व्हिसासाठी १००,००० डॉलर्स (अंदाजे ८.८ दशलक्ष रुपये) अर्ज शुल्क आकारेल. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी शनिवारी व्हाईट हाऊसमध्ये या आदेशावर स्वाक्षरी केली. पूर्वी, एच-१बी व्हिसासाठी अर्ज शुल्क १००,००० ते ६००,००० रुपयांपर्यंत होते.

एच-१बी व्हिसा म्हणजे एक म्हणजे नॉन-इमिग्रंट व्हिसा. दरवर्षी लाखो लोक अर्ज करतात म्हणून हे व्हिसा लॉटरीद्वारे दिले जातात. आयटी, आर्किटेक्चर आणि आरोग्य यासारख्या व्यवसायांमध्ये विशेष तांत्रिक कौशल्य असलेल्या लोकांना हा व्हिसा दिला जातो. त्याची मुदत तीन वर्षे आहे, परंतु गरज पडल्यास ती तीन वर्षांनी वाढवता येते. नूतनीकरण शुल्क ६ लाख रुपयांपर्यंत आहे. आता ८८ लाख रुपये आकारले जातील.

अमेरिकन सरकार दरवर्षी ८५,००० एच-१बी व्हिसा जारी करते. या वर्षासाठी अर्ज आधीच भरले आहेत. आकडेवारीनुसार, यावर्षी एकट्या ॲमेझानला १०,००० हून अधिक व्हिसा मिळाले आहेत, तर मायक्रोसॉफ्ट आणि मेटा सारख्या कंपन्यांना ५,००० हून अधिक व्हिसासाठी मान्यता देण्यात आली आहे.

## मंधानाने वनडेत ठोकले

# ५० चेंडूत शतक

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २० :**
स्मृती मंधानाने भारतासाठी एकदिवसीय क्रिकेट इतिहासातील सर्वात जलद शतक झळकावले आहे. शनिवारी, नवी दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर, तिने फक्त ५० चेंडूत शतक पूर्ण केले आणि ७० चेंडूत शतक झळकावण्याचा तिचा स्वतःचा विक्रम मोडला. महिला एकदिवसीय सामन्यांमधील हे दुसरे सर्वात जलद शतक होते. ऑस्ट्रेलियाच्या मेग लॅनिंगने आधीच ४५ चेंडूत शतक झळकावले होते.



ऑस्ट्रेलियाने प्रथम फलंदाजी करताना ४७.५ षटकांत ४१२ धावा केल्या. बेथ मुनीने फक्त ५७ चेंडूत शतक झळकावले, तर जॉर्जिया वोलने ८१ आणि एलिस पेरीने ६८ धावा केल्या. भारताकडून अरुंधती रेड्डीने ३ बळी घेतले. रेणुका ठाकूर आणि दीप्ती शर्मा यांनी प्रत्येकी २ विकेट घेतल्या.

स्मृती मंधानाच्या नावावर एकदिवसीय क्रिकेटमध्ये पुरुष आणि महिला दोन्ही प्रकारात सर्वात जलद शतक करण्याचा विक्रम आहे. तिने २०१३ मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध ५२ चेंडूत शतक ठोकणाऱ्या विराट कोहलीचा पुरुष संघाचा विक्रम मोडला. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या मालिकेत स्मृती मंधानाने सलग दुसरे शतक झळकावले.

महिलांच्या एकदिवसीय क्रिकेटमध्ये भारताविरुद्ध पहिल्यांदाच ४०० धावांचा टप्पा गाठण्यात आला आहे. यापूर्वी, ऑस्ट्रेलियाने ८ डिसेंबर २०२४ रोजी ब्रिस्बेन क्रिकेट ग्राउंडवर भारत महिला संघाविरुद्ध ३७१ धावा करून सर्वाधिक एकदिवसीय धावसंख्या नोंदवली होती. महिला क्रिकेटमध्ये ४०० धावांचा टप्पा ओलांडण्याची ही केवळ सातवी वेळ आहे.

## राज्यातील पाऊस थांबताच शेती नुकसानीचे पंचनामे

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २० :**
राज्यात सुरू असलेला पाऊस थांबल्यानंतर शेतीच्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत दिली जाईल, असे आश्वासन कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले आहे. जून आणि जुलै महिन्यातील नुकसानीची भरपाई शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होण्यास सुरुवात झाली असल्याचे कृषिमंत्र्यांनी सांगितले. उर्वरित नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनाही लवकरच मदत दिली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात शिवारफेरीच्या उद्घाटनावेळी ते बोलत होते.



महाराष्ट्र राज्याच्या कृषी उत्पादन वृद्धीसाठी आणि एकूणच कृषी क्षेत्राच्या ऊर्जितावस्थेसाठी कृषी विद्यापीठाव्दारे विकसित प्रगत कृषी तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणे अतिशय महत्त्वाचे असून शेतकरी बांधवांनी त्याचा अवलंब नैसर्गिक आपत्तीवर मात करण्यासाठी एक सशक्त पर्याय तसेच महत्त्वाचा पैलू असल्याचेही भरणे म्हणाले.

यावेळी कृषी राज्यमंत्री ॲड.आशिष जयस्वाल, खासदार अनुप धोत्रे, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणीचे कुलगुरू डॉ. इंद्र मणी, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ नागपूरचे कुलगुरू डॉ. नितीन पाटील, आ. ॲड. किरण सरनाईक, आ. वसंत खंडेलवाल, आ. प्रकाश भारसाकळे, आ. हरीश पिंपळे, विद्यापीठ कार्यकारी परिषदेचे सदस्य मोरेश्वर वानखेडे जनार्दन मोगल, केशवराव तायडे, श्रीमती हेमलताताई अंधारे, डॉ. एन बी पाटील, श्रीमती बुवनेश्वरी एस, रफिक नाईकवाडे, सुनील बोरकर, विद्यापीठाचे विस्तार डॉ. धनराज उंदीरवाडे, डॉ. श्यामसुंदर माने, डॉ. शशांक भराड, डॉ. सतीश ठाकरे, सुनील थोटांगे, राहुल सातपुते, उमेश घाटगे उपस्थित होते.

देशातील कृषी उत्पादन वृद्धीसाठी प्रगत कृषी तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणे महत्त्वाचे असून शिवार फेरीचे आयोजन हे तर्कसंगत कृषी उत्पादन वाढीच्या दृष्टीने कृषी तंत्रज्ञान हस्तांतरण व अवलंबनामधील महत्त्वाचा पैलू असल्याचे कृषी राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल म्हणाले.

कुलगुरू डॉ. शरद गडाख यांच्यासह अनेक मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक विस्तार शिक्षण संचालक डॉ. धनराज उंदीरवाडे यांनी केले. संचालन जनसंपर्क अधिकारी डॉ. किशोर बिडवे यांनी केले.

### शिवारफेरीत २१२ पिकांचे प्रात्यक्षिक

अकोला कृषी विद्यापीठाची ४३ वी शिवारफेरी सुरू झाली असून, तीन दिवस चालणाऱ्या या कार्यक्रमात २० एकर क्षेत्रावर ११२ खरीप पिके, २७ भाजीपाला पिके, ५९ फुल वर्गीय पिकांसह एकूण २१२ पिकांचे प्रात्यक्षिक शेतकऱ्यांना पाहता येणार आहे. यासाठी विदर्भाती शेतकरी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

# अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी ६८९ कोटी रुपयांच्या निधीस मान्यता

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २० :
अतिवृष्टी व पुरामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा व मदत देण्यासाठी शासन संवेदनशील असून जून २०२५ ते ऑगस्ट २०२५ या कालावधीत नांदेड, परभणी, सातारा आणि सांगली जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टी व पुरामुळे बाधित शेतकऱ्यांना नुकसानीपोटी मदत देण्यासाठी ६८९ कोटी ५२ लाख ६१ हजार रुपयांच्या निधीस शासनाने मान्यता दिली आहे. याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असल्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी सांगितले.

नांदेड जिल्हा- ऑगस्ट २०२५ मध्ये अतिवृष्टी व पुरामुळे ७ लाख ७४ हजार ३१३ शेतकऱ्यांचे ६ लाख ४८ हजार ५३३.२१ हेक्टर क्षेत्रावरील पिके बाधित झाली. यासाठी ५५३ कोटी ४८ लाख ६२ हजार रुपये मंजूर करण्यात आले आहेत.



परभणी जिल्हा - जून ते ऑगस्ट २०२५ दरम्यान अतिवृष्टी व पुरामुळे २ लाख ३८ हजार ५३० शेतकऱ्यांचे १ लाख ५१ हजार २२२.६ हेक्टर क्षेत्र बाधित झाले असून, त्यांना १२८ कोटी ५५ लाख ३८ हजार रुपयांची मदत मिळणार आहे.

सातारा जिल्हा- जून ते ऑगस्ट २०२५ दरम्यान झालेल्या पावसामुळे १४२ शेतकऱ्यांचे २१.६० हेक्टर क्षेत्रावरील पिके बाधित झाली. त्यासाठी शासनाने ३ लाख २३ हजार रुपयांची मदत मंजूर केली आहे.

सांगली जिल्हा - जून ते ऑगस्ट २०२५ दरम्यान झालेल्या अतिवृष्टी व पुरामुळे १३ हजार ४७५ शेतकऱ्यांचे ४ हजार ७४.२७ हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. यासाठी ७ कोटी ४५ लाख ३८ हजार रुपयांच्या मदतीस मान्यता देण्यात आली आहे.

नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित शेतकऱ्यांना मदत करण्यात शासन संवेदनशील असून अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी बाधित शेतपिकांचे तात्काळ पंचनामे करण्यात आले. बाधित पिकांच्या पंचनामा अहवाल शासनास प्राप्त होताच शासनाने या मदतीच्या निधीस तत्काळ मंजुरी दिली असल्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी सांगितले. तसेच, नैसर्गिक आपत्तीमध्ये दिलेल्या मदतीचा निधी शेतकऱ्यांच्या कर्ज अथवा अन्य वसुलीत वळती करू नयेत यासाठी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या स्तरावरून बँकांना निर्देश द्यावेत, अशा स्पष्ट सूचनाही मदत व पुनर्वसन मंत्री जाधव-पाटील यांनी दिल्या आहेत.

## वाहतूक कोंडीमुळे दीड वर्षाच्या मुलाचा ॲम्बुलन्समध्येच मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २० :
नायगावहून मुंबईच्या दिशेने उपचारासाठी निघालेल्या दीड वर्षाच्या चिमुकल्याचा वाहतूक कोंडीत अडकल्यामुळे दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे प्रशासनाच्या ढिसाळ कारभारावर संताप व्यक्त केला जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, नायगाव येथील चिंचोटीमधील गॅलेक्सी हॉस्पिटलमध्ये या निष्पाप मुलावर उपचार सुरू होते. मात्र, डॉक्टरांनी त्याला पुढील उपचारासाठी मुंबईला घेऊन जाण्याचा सल्ला दिला होता. त्यानुसार कुटुंबीय रुग्णवाहिकेतून मुंबईकडे निघाले. मात्र, वाटेतच ते भीषण वाहतूक कोंडीत अडकले. रुग्णालयात वेळेवर पोहोचता न आल्याने त्या चिमुकल्याने रस्त्यातच प्राण गमावले. मुंबई-अहमदाबाद महामार्गावर सकाळपासूनच सुरू असलेल्या भीषण वाहतूक कोंडीमुळे एका दीड वर्षाच्या चिमुकल्याचा जीव गेल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. उपचारासाठी रुग्णवाहिकेतून मुंबईकडे निघालेल्या या मुलाची प्रकृती बिघडल्यानंतर त्याला तातडीने नजीकच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत असून, प्रशासनाच्या ढिसाळ कारभारावर नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. नायगाव येथून मुंबईकडे निघालेली रुग्णवाहिका मुंबई-गुजरातकडे जाणाऱ्या आणि येणाऱ्या दोन्ही मार्गावरील वाहतूक कोंडीत अडकली होती. तब्बल पाच तास या कोंडीत अडकल्यामुळे चिमुकल्याची तब्येत खालावली. हतबल झालेल्या कुटुंबियांनी रुग्णवाहिकेतून उतरून त्याला घोडबंदरजवळील ससूनवघर येथील एका छोट्या रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

## पाणीपुरवठा, रस्ते, आरोग्य सुविधा, शाळेच्या कामांना तातडीने प्राधान्य द्यावे : एकनाथ शिंदे

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २० :
नवी मुंबई महापालिकेत समाविष्ट १४ गावांमध्ये पाणीपुरवठा, रस्ते, आरोग्य सुविधा, शाळा ह्या कामांना तातडीने प्राधान्य द्या. याभागातील दप्तर हस्तांतरणाची कार्यवाही त्वरीत पूर्ण करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नवी मुंबई महापालिका आयुक्तांना दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे नवी मुंबई महापालिका हद्दीत समाविष्ट झालेल्या १४ गावांच्या विविध मागण्यांबाबत बैठक झाली. त्यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे बोलत होते. यावेळी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, आमदार राजेश मोरे, उपमुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता, नगरविकास विभागाचे अपर मुख्य सचिव गोविंदराज, नवी मुंबई महापालिका आयुक्त कैलास शिंदे, ठाणे जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ आदी उपस्थित होते.



या गावांमध्ये तातडीने मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नवी मुंबई महापालिकेने कार्यवाहीला वेग द्यावा. तात्पुरती आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पोर्टा केबिनच्या सहाय्याने दवाखाने सुरू करण्यात यावे. नावाळी येथे असलेल्या जुन्या इमारतींमध्ये नव्याने रुग्णालय सुरू करण्यासाठी संबंधितांना निर्देश द्यावे, असे उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

वाकळण येथील तलावाचे सुशोभीकरण करून नवी मुंबई महापालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांमार्फत या गावांमधील साफसफाई करण्यात यावी. शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे तातडीने हटविण्यात यावी तसेच या गावांमधील शासकीय दप्तर नवी मुंबईकडे हस्तांतरित करण्याच्या प्रक्रियेला वेग देण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिले.

या गावांचा नियोजन आराखडा तयार करण्याचे काम सुरू असून रस्ते, पायाभूत सुविधा, जमिनीचा उपयोग आदी घटकांचे सर्वेक्षण ड्रोनच्या माध्यमातून करण्यात येत असल्याचे आयुक्त शिंदे यांनी सांगितले. नवी मुंबई महापालिकेच्या २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात या १४ गावांसाठी १९ कोटी ७० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली असून त्यामध्ये प्राधान्याने शाळा, आरोग्य केंद्र, पाणी पुरवठा, मलनिस्सारण, पायवाटा, रस्ते या सुविधांचा समावेश असल्याचे आयुक्तांनी सांगितले.

## ठाकरे बंधूंची मोर्चेबांधणी

### स्थानिक स्वराज्य निवडणुकांसाठी रणनीतीला आला वेग

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २० :
स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा बिगुल वाजत असताना उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी अजून अधिकृतपणे युतीची घोषणा केली नसली तरी निवडणुकीसाठी दोन्ही बंधूंनी रणनीती आखण्याची प्रक्रिया वेगाने सुरू केली आहे. ठाकरे बंधूंनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या बालेकिल्ल्यात मोर्चेबांधणी करण्यास सुरुवात केली आहे.



मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी शुक्रवारी अंबरनाथ, कल्याण आणि डोंबिवली दौरा केला. सकाळी ९ वाजता त्यांनी अंबरनाथमधून दौऱ्याची सुरुवात केली, तर दुसरीकडे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी अंबरनाथ, बदलापूर, कल्याण-डोंबिवली परिसरातील पदाधिकाऱ्यांची मातोश्रीवर बैठक घेतली. ठाणे जिल्हा शिंदे यांचा गड मानला जातो. तसेच कल्याण लोकसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व खासदार श्रीकांत शिंदे करतात. या बालेकिल्ल्यात ठाकरे बंधूंच्या हालचालींना विशेष महत्त्व दिले जात आहे.

राज ठाकरे यांनी आपल्या बैठकीत राहुल गांधींच्या मतदार यादीतील घोळावरील आरोपांना समर्थन देत मतदार याद्यांमधील बनावट मतदारांचा मुद्दा उपस्थित केला.

गेल्या विधानसभा निवडणुकीत मोठ्या प्रमाणात मतचोरी झाली. मतचोरी रोखण्यासाठी मतदार याद्यांवर काटेकोरपणे काम करणे गरजेचे आहे मतदार यादी तपासा, बूथपातळीवर लक्ष ठेवा, नव्या मतदारांवर नजर ठेवा अशा स्पष्ट सूचना त्यांनी पदाधिकाऱ्यांना दिल्या.

## अवैध वाळू वाहतुक करणाऱ्या वाहनांचा परवाना होणार निलंबित

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २० :
राज्यात मोठ्या प्रमाणात वाळू व इतर गौण खनिजांचे अनधिकृत उत्खनन, वापर, वाहतूक व तस्करीचे प्रकार वारंवार घडत असल्याचे निदर्शनास येत आहे. महसुलाची तसेच पर्यावरणाची हानी टाळण्यासाठी तसेच अनधिकृतपणे वाहतूक करणाऱ्या वाहनांचा परवाना निलंबित करण्याचा निर्णय राज्य परिवहन प्राधिकरणाच्या बैठकीत घेण्यात आला आहे. वाळू व इतर गौण खनिजांचे अनधिकृत उत्खनन करून अवैधपणे वाहतूक करणाऱ्या वाहनांच्या पहिल्या गुन्ह्यासाठी पुढील ३० दिवसांपर्यंत परवाना निलंबित व वाहन अटकावून ठेवण्याची कारवाई करण्यात येत आहे. तसेच याच संदर्भातील तिसऱ्या गुन्ह्यासाठी वाहन अटकाव करून संबंधित प्रादेशिक परिवहन प्राधिकरणामार्फत परवाना रद्द करण्याची कारवाई करण्यात येणार आहे.

मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या कलम ११३ चा भंग करून सकल भारक्षमतेपेक्षा अतिरिक्त वजनाच्या वाळू व इतर गौण खनिजांची मालाची वाहतूक करणा-या परवानाधारकांवर विभागीय कारवाई करण्याचा निर्णय घेण्याचे अधिकार राज्य परिवहन प्राधिकरणास आहेत.

त्यानुसार प्राधिकरणाकडून वाळू व इतर गौण खनिजांचे अनधिकृत उत्खनन करून अवैधपणे वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाईचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाच्या धोरणामध्ये एकसूत्रता आणण्यासाठी १८ ऑगस्ट २०२५ रोजी झालेल्या बैठकीत वाळू व इतर गौण खनिजांचे अनधिकृत उत्खनन करून अवैधपणे वाहतूक करणा?या वाहनांच्या परवान्यावर मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या कलम ८६ मधील तरतुदीनुसार विभागीय कारवाई करण्यासाठी राज्यातील सर्व प्रादेशिक परिवहन प्राधिकरणांनी विभागीय कारवाई करण्याचे निर्देशही देण्यात आले आहे, असे अपर परिवहन आयुक्त भरत कळसकर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

## मुंबई लुटण्यासाठी बुलेट ट्रेन

### गद्दारांची सेना भाजपमध्ये विलीन होणार : संजय राऊत

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २० :
मुंबईचा घास गिळण्यासाठी मुंबईतून सुरतला बुलेट ट्रेन निर्माण केली जात आहे. मुंबई लुटण्यासाठी हे सर्व सुरू आहे. मुंबई पासून इतर कुठे ही ट्रेन का नाही, असा सवाल उबाठाचे नेते संजय राऊत यांनी केला आहे. तर 4 तारखेला पुण्यात उद्धव ठाकरेंचा दौरा आहे. तर इतका दबाव आणून जयंत पाटील त्यांच्या पक्षात जायला तयार नाही म्हणून त्यांच्यावर राग आहे, म्हणून त्यांच्यावर अशी खालच्या भाषेत टीका करण्यात येत आहे. महायुतीचे 90 टक्के आमदार हे व्होट चोरीच्या माध्यमातून निवडून आले आहेत असा टोलाही राऊत यांनी लगावला आहे.

संजय राऊत म्हणाले की, नारायण राणे यांच्या मुलाने वडीलांचे नाव काढण्याचे सुरू केले. त्याला भाजपने पाठीशी घातले. म्हणून ही सर्व घाण वाढत गेली आहे. आम्ही



कधी कुणाचा बाप काढला नाही, त्यांचे कर्तृत्व काढले नाही. गोपीचंद पडळकर यांनी जयंत पाटील यांच्या वडिलांवर चुकीचे बोलणं हे अतिशय दुर्दैवी आहे. फडणवीसांनी त्यांच्या टीमला संस्कार शिकवावे. 12 ते 13 वेळेस समज देऊन जर हा माणूस ऐकत नसेल तरी त्याला तुमचा पाठिंबा आहे.

संजय राऊत म्हणाले की, एकनाथ शिंदे यांनी चित्रपट काढला म्हणजे त्यांना आनंद दिघे समजले असे नाही. चित्रपटामधील 90 टक्के गोष्टी या खोट्या आणि भंपक आहेत.

## पडळकरांसारखे विकृत पोसले : अंजली दमानिया

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २० :
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीच गोपीचंद पडळकर यांच्यासारख्या विकृत पुढाऱ्यांना पोसले आहे. ते त्यांचा वेळ पडल्यावर गरजेनुसार वापर करतात, अशी टीका सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी फडणवीसांवर निशाणा साधताना केली आहे. त्यांनी वाल्मीक कराडचा राईट हँड असलेल्या गोट्या गितेवरील मकोका रद्द करण्यावरूनही सरकार व पोलिस प्रशासनाला धारेवर धरले आहे.

गोपीचंद पडळकर यांनी नुकतेच जयंत पाटील व त्यांच्या कुटुंबीयांविषयी वादग्रस्त विधान केले होते. त्यांच्या विधानाचे राज्याच्या राजकारणात तीव्र पडसाद उमटत आहेत. अनेक राजकीय नेत्यांनी या प्रकरणी पडळकरांच्या विधानाचा निषेध केला आहे. स्वतः शरद पवारांनी याविषयी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना फोन करून आपली नाराजी कळवली. त्यानंतर स्वतः मुख्यमंत्र्यांनीही पडळकरांना भान राखून बोलण्याचा सल्ला देत त्यांचे कान टोचले. त्यानंतर आता सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी या प्रकरणी पडळकरांसह त्यांचे 'राजकीय बॉस' असलेल्या फडणवीसांना धारेवर धरले आहे.

## अतिवृष्टीमुळे १४ लाख हेक्टर शेतीचा चिखल

### शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजारांची मदत द्या : रोहित पवार

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २० :
राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी अतिवृष्टीमुळे राज्यातील 14 लाख हेक्टरहून अधिकच्या शेतीचा चिखल झाल्याचा दावा केला आहे. या प्रकरणी त्यांनी सरकारला शेतकऱ्यांना हेक्टरी 50 हजार रुपयांची तातडीने मदत देण्याचे आवाहन केले आहे. विशेषतः शेतकऱ्यांना कर्जमाफी करण्यासाठीही हीच योग्य वेळ असल्याचे त्यांनी म्हटले आहे. राज्यात गत काही दिवसांपासून मुसळधार पाऊस होत आहे. यामुळे शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी शेती खरडून गेली आहे. त्यामुळे अगोदरच संकटात असलेल्या शेतकऱ्यांचे पाय आणखी खोलात गेलेत. या पार्श्वभूमीवर आमदार रोहित पवार यांनी सरकारला शेतकऱ्यांना तत्काळ मदतीचा हात देण्याचे आवाहन केले आहे. त्यांनी हे सरकार



जातीधर्मामध्ये वाद लावणारे असल्याचीही टीका केली आहे.

रोहित पवार म्हणाले, जातीधर्मामध्ये वाद लावण्यात सरकारला सांगायचंय.. की आज अतिवृष्टीमुळे राज्यातील 14 लाख हेक्टरहून अधिक शेतीचा चिखल झालाय, त्यामुळं अडचणीत आलेला बळीराजा आक्रोश करतोय. यात कोणत्याही एका जातीचा नाही तर सर्व जाती-धर्माचे शेतकरी आहेत. या अडचणीतील बळीराजाला हात देण्यासाठी तातडीने 50 हजार रु. प्रति हेक्टरी मदत जाहिर करावी आणि कर्जमाफीसाठी अधिक वाट न बघता काही नेते स्वतःच्या राजकीय पुनर्वसनासाठी मोर्चांचं प्रतिनिधीत्व करत आहेत. पण मोचांला येणाऱ्या लोकांच्या घरातली चूलही या अतिवृष्टीने विझलीय. त्यामुळं जाती-जातीत वाद निर्माण करण्याऐवजी या मोर्चात त्यांनी शेतकऱ्यांची बाजू ठामपणे मांडली तर अधिक योग्य ठरेल. वास्तविक राज्यात आणि केंद्रातही सत्तेत असताना त्यांना आपल्या मागण्यांवर एकत्रित बसून योग्य मार्ग काढणं शक्य आहे, पण त्याऐवजी सत्तेत असतानाही ते मोर्चे का काढत आहेत, हेही त्यांनी लोकांना सांगावं, असे ते म्हणाले. ते आपल्या अन्य एका ट्विटमध्ये म्हणाले, आज राज्यात नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी पूर्णतः उध्वस्त झाला असताना सरकारने शेतकऱ्यांना सढळ हाताने मदत करणे गरजेचे असताना सरकार मात्र हात आखडता घेताना दिसतंय.

## एमआयटी कॅम्पसमध्ये आढळला मृतदेह

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. २० :
पुण्यातील लोणी परिसरात असलेल्या एमआयटी कॉलेजच्या आवारात 65 वर्षीय व्यक्तीचा मृतदेह आढळून आल्याने एकच खळबळ उडाली आहे. सुभाष कामठे (वय 65) असे या मृत व्यक्तीचे नाव असून, ते गेल्या आठ दिवसांपासून बेपत्ता होते. मुळा मुठा नदीच्या किनाऱ्यावर कॉलेजच्या मागील बाजूस त्यांचा मृतदेह सापडला. यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, हा मृत्यू आत्महत्या आहे की हत्या, याबाबत संशय व्यक्त केला जात आहे.

सुभाष कामठे हे मूळचे पुण्याच्या फुरसुंगी परिसरातील रहिवासी होते. त्यांच्या कुटुंबीयांनी ते बेपत्ता झाल्याची तक्रार फुरसुंगी पोलिस ठाण्यात दाखल केली होती. पोलिसांच्या प्राथमिक तपासात त्यांना दारूचे व्यसन असल्याची माहिती समोर आली आहे. गुरुवारी दुपारी मच्छीमारांना त्यांचा मृतदेह एमआयटी कॉलेजच्या आवारात आढळून आला. सध्या मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला असून, मृत्यूचे नेमके कारण अहवाल आल्यानंतरच स्पष्ट होईल, असे पोलिसांनी सांगितले आहे.

पुण्यात गेल्या काही दिवसांपासून झालेल्या मुसळधार पावसामुळे मुळा मुठा नदीच्या पात्रात पाण्याचा विसर्ग वाढला होता. त्यामुळे मृतदेह वाहून आला असावा, असा अंदाजही पोलिस व्यक्त करत आहेत. यामुळे पोलिसांना तपास करताना काही अडचणी येऊ शकतात. ही आत्महत्या आहे की हत्या? याचा तपास पोलिस करत आहेत. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून, पोलिस अधिक तपास करत आहेत.

## त्र्यंबकेश्वर येथे तीन पत्रकारांवर गुंडांकडून हल्ला



■ महासागर प्रतिनिधी, नाशिक, दि. २० :
त्र्यंबकेश्वर येथे वृत्तांकनासाठी जात असताना, स्वामी समर्थ केंद्राजवळ असलेल्या पार्किंगवरील गुंड प्रवृत्तीच्या लोकांकडून नाशिकमधील इलेक्ट्रॉनिक माध्यमांचे प्रतिनिधी पत्रकार योगेश खरे, अभिजीत सोनवणे, किरण ताजणे यांना जबर मारहाण करण्यात आली. या मारहाणीमध्ये गंभीर जखमी झालेल्या पत्रकार किरण ताजणे यांची मंत्री छगन भुजबळ यांनी नाशिकच्या अपोलो रुग्णालयात भेट घेऊन तब्येतीची विचारपूस केली. तसेच या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त करत मारहाण करणाऱ्या गुंडांना कठोरात कठोर कारवाई करण्याच्या सूचना पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांना दिल्या.

त्र्यंबकेश्वर येथे कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर आयोजित साधू महंतांच्या बैठकीचे वार्तांकन करण्यासाठी नाशिक येथून पत्रकार त्र्यंबकेश्वर येथे

### मारहाण करणाऱ्यांवर कठोर कारवाईचे मंत्री भुजबळांचे पोलिसांना आदेश

गेले असता स्वामी समर्थ केंद्राजवळ असलेल्या पार्किंगवरील गुंड प्रवृत्तीच्या कर्मचाऱ्यांकडून त्यांना अडवण्यात आले. पत्रकारांनी आपली ओळख देऊन बैठकीचे वार्तांकन करण्यासाठी जात असल्याची माहिती दिली. पत्रकार गाडीच्या खाली उतरल्यावर 'झी' वृत्त वाहिनीचे पत्रकार योगेश खरे, 'साम' वृत्त वाहिनीचे पत्रकार अभिजित सोनवणे व 'पुढारी' वृत्तवाहिनीचे पत्रकार किरण ताजणे यांना जबर मारहाण केली. मुंबईवरून नाशिककडे दिशेने येत असतांना मंत्री छगन भुजबळ यांना या घटनेची माहिती मिळताच त्यांनी नाशिक ग्रामीण पोलिस अधीक्षक बाळासाहेब पाटील व जिल्हाधिकारी जलज शर्मा यांना दूरध्वनीद्वारे संपर्क करत या आरोपींवर कारवाई करण्याचे आदेश दिले.

## रत्नागिरी जिल्ह्यात ७८१ ठिकाणी स्वयंचलित हवामान केंद्रे कार्यान्वीत होणार

■ महासागर प्रतिनिधी, रत्नागिरी, दि. २० :
केंद्र व राज्य शासनाच्या पुढाकाराने रत्नागिरी जिल्ह्यात ७८१ ठिकाणी लवकरच स्वयंचलित हवामान केंद्रे उभारण्यात येणार आहेत. कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या वेदर इन्फॉर्मेशन अँड नेटवर्क डेटा सिस्टीम या महत्त्वाकांक्षी योजनेत रत्नागिरी जिल्ह्याचा समावेश करण्यात आल्याने याचा जास्तीत जास्त फायदा शेतकरी वर्गाला होणार आहे.

वेदर इन्फॉर्मेशन अँड नेटवर्क डेटा सिस्टीम ही महत्त्वाकांक्षी योजना संपूर्ण देशात राबविण्यात येत आहे. याबरोबर महाराष्ट्र राज्यात देखील राज्य सरकारच्या मदतीने ही योजना राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात राबवली जात आहे. हवामानदृष्ट्या संवेदनशील मानल्या जाणाऱ्या या रत्नागिरी जिल्ह्यात तब्बल ७८१ ठिकाणी स्वयंचलित हवामान केंद्रे उभारली जाणार आहेत. ही योजना जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी मोठा दिलासा देणारी ठरणार आहे. या योजनेसाठी सध्या ५५९ ग्रामपंचायतींनी केंद्रांसाठी जागा निश्चित केली असून, ७२ टक्के काम पूर्ण झाले आहे. ही केंद्रे उपग्रह व इंटरनेट कनेक्टिव्हिटीच्या आधारे माहिती संकलित करून थेट केंद्रीय सर्व्हरला पाठवली जाणार आहे. त्यानंतर तज्ज्ञांच्या विश्लेषणातून हवामानविषयक सूचना एसएमएस, मोबाइल ॲप्स व स्थानिक यंत्रणेद्वारे शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवली जाणार आहेत.

## महानिर्मितीच्या गारे-पालमा सेक्टरमध्ये कोळसा खाणीचा शुभारंभ

### छत्तीसगढमधील सर्वात मोठ्या खाणीच्या कामकाजास प्रारंभ

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २० :
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित (महानिर्मिती) ने आज रायगड जिल्ह्यातील तमनार तहसील येथील गारे-पालमा सेक्टर-II कोळसा खाणीच्या कामकाजास औपचारिक प्रारंभ केला. या खाणीतील बॉक्स कटिंग उपक्रमाचा शुभारंभ महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्णन बी. (भा.प्र.से) यांच्या उपस्थितीमध्ये पार पडला. या प्रसंगी संचालक (वित्त) मनेश



विश्वनाथ वाघिरकर, संचालक (प्रकल्प) अभय हरणे, कार्यकारी संचालक डॉ. नितीन वाघ, पंकज सपाटे, मुख्य अभियंता एस.एम. पडोळे व प्रशासकीय अधिकारी, वरिष्ठ अधिकारी यांची उपस्थित होती.

या प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या सर्व पर्यावरणीय, वन, खाण व प्रशासकीय मंजुऱ्या महानिर्मितीने प्राप्त केल्या आहेत. आज खाणीचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले असून आवश्यक परवानग्यांच्या आधारे बॉक्स कटिंगचे काम यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आले. याप्रसंगी स्थानिक ग्रामस्थ व प्रशासनिक अधिकारीही उपस्थित होते. या खाणीतून जानेवारी महिन्यापासून कोळसा उत्पादनास सुरुवात होणार आहे.

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या निमित्त महानिर्मितीचे अभिनंदन केले असून सुरक्षित आणि गतिमान कार्यान्वयन करण्याचे निर्देश दिले आहेत. गारे-पालमा सेक्टर-II खाण प्रकल्प हा छत्तीसगढमधील सर्वात मोठ्या प्रकल्पांपैकी एक असून याची वार्षिक उत्पादन क्षमता २३.६ दशलक्ष टन इतकी आहे. या खाणीतून मिळणारा कोळसा महाराष्ट्राच्या ऊर्जा गरजांची पूर्तता करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरणार असून चंद्रपूर, कोराडी आणि परळी येथील औष्णिक वीज निर्मिती संचांना कोळसा पुरवठा सुनिश्चित केला जाणार आहे. यामुळे राष्ट्रीय ग्रीडमध्ये ३२०० मेगावॅटहून अधिक वीज उपलब्ध होईल. या खाणीच्या कार्यान्वयनामुळे भारताची कोळसा आयातीवरील अवलंबित्व मोठ्या प्रमाणात कमी होणार असून देशाला देशांतर्गत कोळसा संसाधनांद्वारे ऊर्जा स्वावलंबनाच्या मार्गावर नेणारे हे ऐतिहासिक पाऊल ठरणार आहे. हा आत्मनिर्भर भारत या दृष्टिकोनाकडे एक महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात आहे.

# अस्तित्वाच्या लढाईसाठी सकल ओबीसी समाजाचा मोर्चा

## मनुवादी भाजप सरकार आरक्षणाच्या विरोधात : विजय वडेट्टीवार यांचा पत्रकार परिषदेत घणाघात

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २० :

374 जातींमध्ये 54 % ओबीसी समाजाला 27% आरक्षण असताना, मराठा समाजाला ओबीसी मधून आरक्षण देण्याच्या सरकारच्या शासन निर्णयामुळे ओबीसी समाजाच्या संविधानिक, राजकीय आरक्षणावर गदा येत आहे. यामुळे 2 सप्टेंबरच्या या काळ्या शासन निर्णयाविरुद्ध सकल ओबीसी समाज 10 ऑक्टोबरला यशवंत स्टेडियम ते संविधान चौक येथे भव्य मोर्चा काढणार आहे. अशी माहिती व काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी पत्रकार परिषदेत दिली.




मनोज जरांगे यांनी हैदराबाद गॅझेटियर लागू करण्याची मागणी केली आहे. यानुसार जो शेती करतो ते सर्व सरसकट ओबीसी आहेत.हे अन्यायकारक आहे. यावेळी त्यांनी जातिनिहाय जनगणना व 50%आरक्षण मयार्दा उठविण्याची मागणी केली. चौकशी अहवालाच्या फॉर्मनुसार तहसीलदारांनी एका महिन्याला 1000 ओबीसी समाजाचे दाखले द्यावे अशी तजबीज केलेली आहे.

त्यामुळे बोगस ओबीसींची भरती आमच्या समाजात होणार आहे. त्यामुळे या अन्यायाला विरोध करण्यासाठी व स्वतःच्या अस्तित्वाच्या लढाईसाठी सकल ओबीसी समाज दहा ऑक्टोबरला भव्य मोर्चा काढत आहे यामध्ये अधिकाधिक ओबीसी बांधवांनी सहभाग घेण्याचे आवाहन त्यांनी पत्रकार परिषदेत केले.

### माजी मंत्री अनिल देशमुख यांचा आक्रमक पवित्रा

छगन भुजबळ हे मंत्रिमंडळात असल्यावर त्यांनी कॅबिनेटमध्ये ओबीसी समाजाच्या न्यायासाठी मागणी करायला हवी. एकीकडे शासनाने काढलेल्या जीआर चा विरोध करतांना ते देवेंद्र फडणवीस हे आशेचा किरण आहे असे म्हणतात हे हास्यास्पद आहे.

# बौद्ध सुवर्णयुग महिला फाउंडेशनच्या ५ वर्षांची पूर्णता



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २० :

समाजसेवा, स्त्री अपलिफ्टमेंट आणि बौद्ध मूल्यांचं संवर्धन करणाऱ्या बौद्ध सुवर्णयुग महिला फाउंडेशन या संस्थेने आपला यशस्वी पाच वर्षांचा प्रवास पूर्ण करत सहाव्या वर्षात भव्यदिव्य प्रवेश केला आहे. या टप्प्यावर संस्थेच्या सर्व सदस्यांनी एकत्र येत एकात्मतेचा, कृतज्ञतेचा व सामाजिक बांधिलकीचा सुंदर क्षण साजरा केला.संस्थेच्या वतीने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, या पाच वर्षांच्या प्रवासात आम्ही एकमेकांना साथ दिली, समाजात सकारात्मक बदल घडवण्याचा प्रयत्न केला आणि अनेक चांगली कामं केली. हा प्रवास शक्य झाला तो सर्व सहयोगी, मार्गदर्शक व शुभचिंतकांच्या पाठिंब्यामुळे.

या प्रवासात योगदान देणाऱ्यांमध्ये सुनंदा कोचे, डॉ. अर्चना परमानंद रामटेके सुखदेवे, छाया बेहरे खोब्रागडे, ललिता उईके, योगिता शेंडे, अर्चना पंतावणे टेंभुर्णे, सोनाली बेहरे ठाकरे, शोभना टेंभुर्णे, रेखा लोखंडे, रजनी तयडे, प्रिया गजभिये, अनुपमा रामटेके आदी कार्यकर्त्यांची महत्त्वाची भूमिका राहिली आहे.फाउंडेशनचा उद्देश समाजातील उपेक्षित घटकांसाठी कार्य करणे, महिलांना सक्षम करणे व बौद्ध तत्वज्ञानानुसार चांगल्या गोष्टी समाजात रुजवणे हा आहे. आगामी काळातही संस्थेने आपली सामाजिक बांधिलकी अधिक बळकट करत रहावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.कार्यक्रमाच्या निमित्ताने सर्व सहकाऱ्यांचे व समाजाच्या प्रत्येक घटकाचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले.

# पूर्व नागपूर येथे काँग्रेस पक्षाचा निषेध कार्यक्रम



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २० :

पूर्व नागपूर परिसरातील हसनबाग चौक येथे नागपूर शहर काँग्रेस कमिटी ब्लॉक क्रमांक १ तर्फे भारताचे पंतप्रधान यांचा निषेधात्मक वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी रखडलेल्या रस्त्याचे कामे आणि ऐन रोडवर असलेल्या जीवघेण्या खड्याविरोधात निषेध करण्यात आला.

डिप्टी सिग्नल येथील रोड वरच्या खड्यात पडून महेंद्र फॅटिंग नावाच्या युवकाचा मृत्यू झाला. यावेळी त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी शहराचे प्रतिनिधी नागपूर शहर काँग्रेस कमिटीचे महासचिव मुकेश गजभिये, सामाजिक कार्यकर्ते प्रविण बेलेकर, नागपूर शहर शांतता कमिटीचे सदस्य शेख मुजीब वारसी, मनीष वानखेडे, पूर्व नागपूर काँग्रेस ओबीसी विभाग कार्याध्यक्ष पंकज चापले, नितीन रामटेककर,राजेश उकुंडे, सामाजिक कार्यकर्ते सुरेश जिचकार, शुभम गजघाटे, काळू भाई, राकीम भाई व बहुसंख्य नागरिक उपस्थित होते.

# नागपूर विभागात आमला येथे विशेष स्वच्छता मोहीम व वृक्षारोपण कार्यक्रम

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २० :

मध्य रेल्वेच्या नागपूर विभागामार्फत दिनांक 20 सप्टेंबर 2025 रोजी आमला रेल्वे स्थानक व परिसरात "रेल्वे स्वच्छता पंधरवडा" अंतर्गत विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेअंतर्गत स्वच्छतेबरोबरच पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने वृक्षारोपण कार्यक्रमही आयोजित करण्यात आला. या उपक्रमात आमला शहरातील अनेक सामाजिक व शैक्षणिक संस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. गायत्री परिवार आमला, केंद्रीय विद्यालय आमला येथील प्राचार्य व एनसीसी विद्यार्थी, लायन्स क्लब, कृष्ण लीला फाउंडेशन आमला तसेच रेल्वे पर्यवेक्षक, कर्मचारी व स्वच्छता कर्मचारी यांनी सामूहिकरीत्या या कार्यात योगदान दिले. सर्वांच्या एकत्रित प्रयत्नामुळे परिसर स्वच्छ व आकर्षक स्वरूपात परिवर्तित करण्यात आला. या



मोहिमेदरम्यान आधी कचऱ्याने व घाणीने व्यापलेल्या जागांची सफाई करण्यात आली व नंतर त्या ठिकाणी स्वच्छता व हिरवळ निर्माण करण्यात आली.

वृक्षारोपण उपक्रमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेशही दिला गेला. या कार्यक्रमातून समाज व रेल्वे प्रशासन यांनी एकत्र येऊन समाजहिताचे कार्य कसे करता येते, याचे उत्कृष्ट उदाहरण सादर झाले.

या प्रसंगी रेल्वे प्रशासनाने सर्व सहभागी संस्था व व्यक्तींचे मनःपूर्वक आभार मानले तसेच भविष्यातही असेच सहकार्य मिळावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

"रेल्वे स्वच्छता पंधरवडा" अंतर्गत नागपूर विभागात असे अनेक उपक्रम आयोजित केले जात असून यामागील उद्दिष्ट प्रवाशांमध्ये व सर्वसामान्यांमध्ये स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण करणे आणि "स्वच्छ भारत" अभियानाला चालना देणे हे आहे.

# ताजबागमध्ये बाबा ताजुद्दीन यांची सव्वीसवी पुण्यतिथी उत्साहात साजरी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २० :

हजरत बाबा सय्यद मोहम्मद ताजुद्दीन यांच्या दर्ग्याचा २६ वा दिवस श्रद्धेने आणि आनंदाने साजरा करण्यात आला. यानिमित्ताने ताजबाग येथील हजरत बाबा ताजुद्दीन (रह.) यांच्या दर्ग्याच्या प्रांगणात ध्वजारोहण समारंभ पार पडला. ध्वजारोहण समारंभात हजारो भाविक सहभागी झाले होते. भाविकांनी बाबा ताजुद्दीन (रह.) यांच्या दर्ग्याचे दर्शन घेतले आणि नमाज अदा केली. सकाळी ८:३० वाजता हजरत बाबा ताजुद्दीन ट्रस्ट कार्यालयात पगडी बांधण्याचा समारंभ पार पडला. सलात-ओ-सलाम पठण करण्यात आले. २६ व्या दिवसानिमित्त ट्रस्टने दर्गा परिसरात लंगर खानामध्ये लंगर वाटप केले. संध्याकाळी दर्ग्यामध्ये शमा मेहफिल, कव्वाली, मिलाद शरीफ आणि विविध धार्मिक



कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी हजरत बाबा ताजुद्दीन ट्रस्टचे अध्यक्ष प्यारे झिया खान, सचिव ताज अहमद राजा, उपाध्यक्ष डॉ. सुरेंद्र जिचकार, विश्वस्त हाजी फारुखभाई बावला, मुस्तफा भाई टोपीवाला, हाजी इम्रान खान ताजी यांची प्रमुख उपस्थिती होते.

# विमेन्स कॉलेज ऑफ आर्ट अँड कॉमर्समध्ये हिंदी दिवस साजरा



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २० :

विमेन्स कॉलेज ऑफ आर्ट अँड कॉमर्स, नंदनवन येथे हिंदी दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. मिलिंद गुल्लाने यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून खान सर उपस्थित होते, तर अध्यक्षस्थानी डॉ. प्रभाकर मोटघरे सर होते. या प्रसंगी आयोजित काव्यवाचन स्पर्धेत १२ हून अधिक विद्यार्थिनींनी आपली प्रतिभा सादर करून उपस्थितांची मने जिंकली. स्पर्धेचे परीक्षण प्राध्यापिका श्रद्धा अग्रवाल व डॉ. ब्राह्मणकर मॅडम यांनी केले. कार्यक्रमाचे संयोजन डॉ. युगेश्वरी डबली (तुलसकर) यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन भूमिका वर्मा हिने केले व आभार प्रदर्शन हर्षिता करमे हिने मानले. प्राध्यापक, प्राध्यापिका, कर्मचारी तसेच विद्यार्थिनींच्या सक्रिय सहकार्यामुळे हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.

# बनावट फेविक्विकची विक्री

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २० :

शहरात नामांकित कंपनीच्या नावाने बनावट फेविक्विकची विक्री केली जात होती. कंपनीकडून तक्रार मिळताच पोलिसांनी इतवारी येथील राम ट्रेडिंग कंपनी व उमरेड रोड, दिघोरी येथील त्रिमूर्ती हार्डवेअरवर धाड टाकून १६४५ नग बनावट फेविक्विक जप्त केला. पोलिसांनी या प्रकरणी अल्ताफ रोशन शेख (५१) रा. दिल्लीच्या तक्रारीवरून कॉपीराईट कायद्यांतर्गत गुन्हा नोंदविला आहे.

फिर्यादी अल्ताफ शेख हे पीडिलाईट इंडस्ट्रीज कंपनीत वरिष्ठ व्यवस्थापक पदावर कार्यरत आहेत. नागपुरात त्यांच्या कंपनीच्या नावाने बनावट फेविक्विक विकले जात असल्याची गुप्त माहिती त्यांना मिळाली होती. त्यांनी चौकशी केली असता दिघोरीच्या त्रिमूर्ती हार्डवेअर येथून हा माल विकण्यात येत असल्याचे समोर आले. त्यांनी हुडकेश्वर पोलिसात तक्रार दाखल केली. पोलिसांनी त्रिमूर्ती हार्डवेअर येथे छापा टाकला. झडतीमध्ये ४९ नग बनावट फेविक्विक जप्त करण्यात आले. चौकशीत उघड झाले की हा माल राम ट्रेडिंग कंपनी, इतवारी येथून आणण्यात आला होता. यानंतर पोलिसांनी राम ट्रेडिंग कंपनीवरही छापा मारला. येथून तब्बल १५९६ नग बनावट फेविक्विक जप्त करण्यात आले. दोन्ही ठिकाणाहून पोलिसांनी एकूण १६४५ नग बनावट माल जप्त केला असून त्याची अंदाजे किंमत ८ हजार २५० रुपये इतकी आहे. या प्रकरणी कैलास मनोहरलाल वासवानी (४०) रा. कस्तुरबानगर, जरीपटका याच्याविरुद्ध कॉपीराईट कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बनावट माल कुठून आणला गेला व तो कोणकोणत्या ठिकाणी पुरवला गेला याचा शोध पोलिस घेत आहेत.

# प्रवीण बागडे यांना प्रबुद्ध साहित्यरत्न पुरस्कार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २० :

साहित्य हे केवळ भावनांचे चित्रण नसते, तर ते समाजाला दिशा देणारे, विचारांना चालना देणारे आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवणारे सामर्थ्यवान साधन असते. या सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने लेखन करणारे साहित्यिक प्रवीण बागडे यांना यंदाचा प्रबुद्ध साहित्यरत्न पुरस्कार नांदेड येथे झालेल्या दैनिक प्रबुध्द परिवार या वर्तमानपत्राच्या 16 व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित सन्मान सोहळ्यात प्रदान करण्यात आला. बागडे यांच्या लेखनात केवळ भाषेची समृद्धी दिसून येत नाही, तर त्यांच्या प्रत्येक लेखात माजाच्या वेदना, संघर्ष आणि परिवर्तनाची आर्त हाक ऐकू येते. जात, धर्म, वर्ण यांच्या पलीकडे जाऊन समानतेचा विचार, उपेक्षितांना न्याय मिळवून देण्याची तळमळ, तसेच तरुण पिढीला जागृत करणारे विचार हे त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य आहे. त्यामुळेच त्यांचे लेखन आजच्या



काळात अधिक परिणामकारक ठरत आहे.

आजच्या धावपळीच्या, बाजारपेठेच्या आणि स्वार्थाच्या साहित्य प्रवाहातही प्रवीण बागडे यांसारखे साहित्यिक समाजहिताची ज्योत जिवंत ठेवतात, हीच खरी साहित्यिक परंपरेची ताकद आहे. त्यांची लेखणी हा केवळ शब्दांचा खेळ नाही, तर वाचकांच्या मनात परिवर्तनाची ठिणगी पेटवणारा दीपस्तंभ आहे. प्रबुद्ध साहित्यरत्न पुरस्काराने प्रवीण बागडे यांच्या लेखनाचा गौरव तर झाला आहेच, पण त्याचबरोबर समाजपरिवर्तनासाठी कार्यरत असलेल्या सर्वच लेखकांना नवी ऊर्जा आणि प्रेरणा मिळाली आहे. पुरस्कार स्वीकारताना प्रवीण बागडे यांनी भावना व्यक्त करतांना हा पुरस्कार माझ्यासाठी केवळ सन्मान नाही, तर जबाबदारी आहे. लेखणी ही वैयक्तिक अभिव्यक्तीची साधने नाही, ती समाजातील आवाज दाबल्या गेलेल्या लोकांचे प्रतिनिधित्व करणारी ताकद आहे. या ताकदीचा उपयोग परिवर्तनासाठी करण्याचा प्रयत्न पुढेही सुरू राहील. कार्यक्रमाला अनेक नामवंत साहित्यिक, सामाजिक कार्यकर्ते, विद्यार्थी आणि रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. टाळ्यांच्या गजरात प्रवीण बागडे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. उपस्थितांनी हा सन्मान केवळ एका साहित्यकाराचा नसून संपूर्ण समाजाभिमुख लेखनाचा असल्याची भावना व्यक्त केली. या प्रसंगी विशेषंकाचे प्रकाशन व साहित्यीक, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ता यांना सन्मानित करण्यात आले.

# ओप्पो इंडियाचा भव्य फेस्टिव्ह सेल सुरू

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २० :

सणासुदीच्या उत्साहात भर घालण्यासाठी ओप्पो इंडियाने आपला सर्वात मोठा फेस्टिव्ह सेल जाहीर केला आहे. 'पे झिरो, वरी झिरो, विन रु. १० लाख' या नावाने सुरू झालेला हा सेल १९ सप्टेंबर ते ३१ ऑक्टोबर २०२५ पर्यंत रिटेल स्टोअर्स, ओप्पो ई-स्टोअर, फ्लिपकार्ट आणि ॲमेझॉनवर उपलब्ध असेल.

या सेलमध्ये ग्राहकांना अनेक आकर्षक ऑफर्स मिळत आहेत. यामध्ये नव्याने लाँच झालेल्या एफ ३१आणि रेनो १४ सिरीज आणि ए ५ सिरीजसह अनेक फोन्सवर शून्य डाउन पेमेंट आणि व्याजमुक्त ईएमआयचा लाभ घेता येईल. याव्यतिरिक्त, फ्लिपकार्टच्या बिग बिलियन डेज सेलचा भाग म्हणून २२ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत के सिरीज, ओप्पो एन्को बड्स ३ प्रो आणि पॅड एसई वर खास डील्स असतील.

या सेलचे मुख्य आकर्षण म्हणजे 'माय ओप्पो एक्सक्लुझिव्ह



दिवाळी रॅफल'. या रॅफलमध्ये प्रत्येक खरेदीदाराला १० लाख रुपयांपर्यंतची रोख बक्षिसे किंवा इतर आकर्षक ओप्पो डिव्हाइसेस जिंकण्याची संधी आहे.

या संदर्भात बोलताना ओप्पो इंडियाच्या पीआर आणि कम्युनिकेशन्सचे प्रमुख गोल्डी पटनायक म्हणाले, "आमचे वापरकर्ते हे आमच्यासाठी नेहमीच महत्त्वाचे आहेत आणि हा फेस्टिव्ह सेल ब्रँडवरील त्यांच्या विश्वासाबद्दल त्यांचे आभार मानण्याचा एक मार्ग आहे. आम्ही आशा करतो की, या ऑफर्समुळे ग्राहकांना सणासुदीतील प्रत्येक क्षण आनंदाने साजरा करता येईल.

# रेल्वे संरक्षण दल स्थापना दिन-२०२५ चा भव्य समारंभ

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २० :

रेल्वे संरक्षण दलाचा स्थापना दिन दरवर्षी २० सप्टेंबर रोजी साजरा केला जातो. या क्रमाने, आज तारीख आहे. २०.०९.२०२५ रोजी आग्नेय मध्य रेल्वे, बिलासपूर द्वारे रेल्वे संरक्षण दल स्थापना दिन-२०२५ चे आयोजन हे बिलासपूर येथील रिझर्व्ह लाईन बॅरेक्स परिसराच्या मैदानात आयोजित करण्यात आले होते. या प्रसंगी, आरपीएफ बिलासपूरचे महानिरीक्षक-सह-प्रधान मुख्य सुरक्षा आयुक्त मुनावर खुर्शीद यांनी परेडचे संचालन केले. सलामी घेण्यात आली. त्यानंतर, त्यांनी भाषण दिले, ज्यामध्ये त्यांनी दलाच्या सदस्यांना प्रामाणिकपणा, सचोटी आणि तांत्रिक कौशल्याने त्यांचे कर्तव्य पार पाडण्याचे आवाहन केले.

त्यांनी त्यांना त्यांची कर्तव्ये पार पाडण्यासाठी प्रेरित केले. त्यांनी दलाच्या सदस्यांना आधुनिक सुरक्षा पद्धतींबद्दल शिक्षित करण्यासाठी एक



सुरक्षा परिषद देखील आयोजित केली. प्रयोगांना प्रोत्साहन देण्यात आले. या समारंभात, विविध क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या ४० अधिकारी आणि जवानांना प्रमाणपत्रे देण्यात आली. त्यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आणि यावेळी वृक्षारोपण कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले. स्थापना दिनाचे औचित्य साधून ५० हून अधिक अधिकारी आणि दलाच्या सदस्यांनी त्यांच्या सामाजिक जबाबदारीचा भाग म्हणून रेल्वेला १००० कोटी रुपयांची देणगी दिली. गरजू रुग्णांना मदत करण्यासाठी बिलासपूर येथील रुग्णालयात रक्तदान करण्यात आले. या कार्यक्रमाला महानिरीक्षक-सह-प्रधान मुख्य सुरक्षा आयुक्त, उपमहानिरीक्षक-सह-मुख्य सुरक्षा आयुक्त, वरिष्ठ विभाग उपस्थित होते. बिलासपूर सुरक्षा आयुक्त/रेसब, ज्यामध्ये विभाग आणि रेल्वे संरक्षण दलाचे मुख्यालय आणि सहाय्यक सुरक्षा आयुक्त/रेसब यांचा समावेश आहे. इतर अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सेंटर पॉइंट स्कूलच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २० :

इंटरनॅशनल इन्फॉर्मेटिक्स ऑलिम्पियाड २०२४-२५ या स्पर्धेत सेंटर पॉइंट स्कूल, वर्धमान नगरच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत शाळेचे नाव उज्ज्वल केले आहे. या स्पर्धेत विविध गटांतील विद्यार्थ्यांनी सुवर्ण, रजत आणि कांस्य पदकांची कमाई करत आपल्या बुद्धिमत्तेची छाप पाडली.

वर्ग पाचवीतील समर मिठाई याला सुवर्णपदक, रीयांश अग्रवाल याला रजतपदक, तर अमनदीप बत्रा याला कांस्यपदक मिळाले. वर्ग सहावीतील वंशिका हटवार हिने सुवर्णपदक, आणि आनिका गद्देवार हिला रजतपदक मिळाले.

वर्ग सातवीतील हरेश अस्वाने याला सुवर्णपदक, आणि हितांश सावर्गी याला रजतपदक प्राप्त झाले.या यशाबद्दल शाळेच्या प्राचार्या सौ. कांचन उके यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

विद्यार्थ्यांनी त्यांच्या यशाचे श्रेय उपप्राचार्या दीपा चक्रवर्ती, जयति चक्रवर्ती, संगणक विभाग प्रमुख अपर्णा श्रीवास्तव, तसेच शिक्षक सीमा भड, प्रज्ञा चक्रवर्ती, पूजा कुंभारे आणि राजेश्री कोटक यांना दिले. शाळेच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे पालकवर्ग आणि शिक्षकांमध्ये आनंदाचे वातावरण असून, विद्यार्थ्यांचे हे यश इतरांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.


**Change Of Name**

MY OLD NAME WAS **ZEENAT FIRDOS QURESHI**. NOW MY NEW NAME IS **ZEENAT AYAN ALI.**
**ADD :** A/2 FARAZ APARTMENT, CHURCH ROAD,BEHIND TIRUPATI BANK, JAFAR NAGAR, NAGPUR - 440013

MY OLD NAME WAS **NAZIA TABASSUM SHAMSHER KHAN.** NOW MY NEW NAME IS **NAZIA SHAHEZAD KHA PATHAN.**
**ADD :** CHANDIKA MANDIR MAGE GALPURA CHOWK KATOL NAGPUR 441302.

MY OLD NAME WAS **SERAJ YUSUF PATEL.** NOW MY NEW NAME IS **SIRAJ YUSUF PATEL.**
**ADD :** NEAR BUS STOP, SARASWATI NAGAR, KATOL, 441302.

I WANT TO CHANGE MY NAME IN MY PASSPORT **NO. P3427067.** MY OLD NAME WAS **MOHAMMAD AMAN PIRANI.** NOW MY NEW NAME IS **AMAN HANIF PIRANI.**
**ADD :** DARGA MOHALLA BASMAT HINGOLI 431512.

I WANT TO CHANGE MY NAME IN MY PASSPORT **NO. K3562007.** MY OLD NAME WAS **ASMA BANU PIRANI.** NOW MY NEW NAME IS **ASMA BANO MOHAMMAD HANIF PIRANI.**
**ADD :** NEAR POST OFFICE DARGA MOHALLA BASMAT HINGOLI 431512.

MY OLD NAME WAS **RANU ALIAS HIMANSHU SUNIL UKEY.** NOW MY NEW NAME IS **HIMANSHI SUNIL UKEY.**
**ADD :** PLOT NO.7 B SIAL LAYOUT RAJ NAGAR NAGPUR 440013.

MY OLD NAME WAS **MANGLA VASANTRAO RATU.** NOW MY NEW NAME IS **MANGLA VASANTRAO RAUT.**
**ADD :** FLAT NO 305 RUDRASHAKTI ENCLAVE SHYAM NAGAR MANISH NAGAR NAGPUR 440037.

# गरबा : प्रवेशाचे राजकारण!



नवरात्रोत्सवातल्या गरब्यामध्ये मुस्लिमांना प्रवेश नाही, अशी भूमिका विश्व हिंदू परिषदेने घेतल्याने नव्या वादाला तोंड फुटणार आहे. देशात धार्मिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे नेते संजय राऊत यांनी केलाय, तर काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी त्यांना धर्माच्या नावावर राजकारण करून पोळी शेकायची आहे, असा आरोप केला.

---------------

देशभरात सोमवार २२ सप्टेंबर रोजी घटस्थापना होईल. त्या पार्श्वभूमीवर गरबा आयोजकांनीही जोरदार तयारी सुरू केली. राज्यभरात ठिकठिकाणी छोट्या शहरांपासून ते थेट मेट्रो सिटीपर्यंत गरब्यासाठी स्टेज, मंडप उभारणी सुरू आहे. मात्र, तत्पूर्वीच आरोप-प्रत्यारोपाची राळ उठल्याचे दिसून येते.

नवरात्रोत्सव फक्त हिंदूचा आहे. त्यामुळे गरब्यामध्ये मुस्लिमांना प्रवेश नको. गरब्यामध्ये प्रवेश देण्यापूर्वी आधारकार्ड तपासा. त्यानंतर प्रवेश द्या. मुस्लिम तरुणांनी गरब्यामध्ये प्रवेश केला, तर त्यांना पोलिसांच्या ताब्यात द्या, अशा सूचना विश्व हिंदू परिषदेने गरबा आयोजकांना दिल्याचे समजते. त्याचे पडसाद राजकीय क्षेत्रातही उमटताना दिसत आहेत. येणाऱ्या काळात महापालिका निवडणुका आहेत. त्यामुळे उद्धव ठाकरेंची शिवसेना, काँग्रेस आक्रमक झाली असून, त्यांनी या भूमिकेला विरोध केला आहे.

**बजरंग दलाची निगराणी**

प्रत्येक गरब्यावर बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांची करडी नजर असणार आहे. विश्व हिंदू परिषद या संदर्भात पोलिसांशी भेट घेऊन त्यांनाही पत्र देणार असल्याचे समजते. विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दल या दोन्ही राष्ट्रीय स्वयंसेवक संघ परिवारातील शाखा आहेत.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडून यावर अजून तरी कोणीही प्रतिक्रिया दिलेली नाही. त्यांची भूमिका काय? याकडे साऱ्यांचे लक्ष आहे. मध्यप्रदेश, गुजरात आणि महाराष्ट्रातही यापूर्वी अनेकदा विश्व हिंदू परिषदेने अशी भूमिका घेतली होती.

काही हिंदुत्ववादी संघटनांनी गरब्याच्या कार्यक्रमांत येणाऱ्यांचे ओळखपत्र बघून केवळ हिंदूंनाच प्रवेश द्यावा असे आवाहन केले आहे. हिंदूंच्या वंशविच्छेदावर उठलेल्या लव्ह जिहादवर निर्बंध आणण्यासाठी काही राज्यांत याविषयी कायदा करण्यात आला आहे. महाराष्ट्र सरकारही हा कायदा करण्यास अनुकूल आहे. नवरात्रीच्या काळात धर्मांध प्रवृत्ती गरब्याच्या कार्यक्रमांत शिरतात आणि हिंदू मुलींना लक्ष्य करतात, त्यांना प्रेमाच्या जाळ्यात ओढतात. दरवर्षी अशा प्रकारच्या घटना मोठ्या प्रमाणात घडतात, असे या संघटनांच्या काहीजणांचे स्पष्ट मत आहे.

**विष पेरण्याचे काम**

उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचे नेते संजय राऊत यावर आक्रमक झालेत. ते म्हणाले की, या देशामध्ये अशाप्रकारे धार्मिक, धर्मांध वातावरण निर्माण करण्याचे काम चालू आहे आणि हीच त्यांची रोजी रोटी आहे. मी अगदीच सर्वधर्मसमभावाच्या गोष्टी कधीच करणार नाही.

संजय राऊत पुढे म्हणाले की, 'ज्या प्रकारे विष पेरण्याचे काम चालले आहे, ते महाराष्ट्राला आणि देशाला भूषणावह नाही, असे उत्तर राऊत यांनी माध्यमांशी बोलताना दिले. ठाकरे गटाने या विषयावर दोन वर्षांपूर्वीही अशीच भूमिका घेतली होती. त्याचीच पुनरावृत्ती राऊत यांनी आज केली.'

**आपली पोळी शेकाचीय**

काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार म्हणाले की, 'मुस्लिमांना गरब्यात प्रवेश नका देऊ. त्यांना आगच लावायची आहे. त्यांना समाजामध्ये दरीच निर्माण करायची आहे. धर्माधर्मामध्ये आग लावून धर्माच्या नावावर राजकारण करायचे आहे आणि आपली पोळी शेकायची आहे. त्यामुळे विश्व हिंदू परिषद काही नव्याने बोलतेय असे नाही.'

विजय वडेट्टीवार पुढे म्हणाले की, 'देश अस्थिर करण्यासाठीच यांचा जन्म झालेला आहे. देशातले वातावरण दूषित करून सत्तेसाठी वाट्टेल त्या स्तरावर जायचे अशी भूमिका घेऊन भाजपच्या सर्व संघटना काम करतात. त्यांना हा देश जोडून राहावा, देशातील मतभेद मिटावे, देश संविधानावर चालावा अशी मानसिकताच त्या लोकांची नाही.'

मुळात गरबा हा नृत्य प्रकार आता ईव्हेंट म्हणून साजरा व्हायला लागला आहे. एका विशिष्ट धर्माच्या मुलींना दुसऱ्या समाजाकडून प्रेमाच्या जाळ्यात ओढून विवाह करण्याच्या काही घटना घडल्या असतीलही. त्यावरून, विशिष्ट समाजाला गरबामध्ये प्रवेश नाकारणे योग्य नव्हे.

विरोध दर्शवणाऱ्या अशा संघटना आणि त्यांच्याशी निगडीत राजकीय पक्षाच्या कित्येक बड्या नेत्यांच्या मुलींनी मुस्लिम तरूणांशी निकाह केल्याची उदाहरणे आहेत. गरबा प्रवेशाच्या आडून राजकारण करण्याचा ही एक वेगळीच खेळी आहे.

■ ■ ■

# : पितृपक्ष :

## अंधश्रद्धेचा वारसा की विवेकाचा अपमान?

**गजानन हरणे**
**खडकी, अकोला.**
**9822942623**

दरवर्षी भाद्रपद शुद्ध पौर्णिमेपासून ते अश्विन कृष्ण अमावस्येपर्यंत येणारा पितृपक्ष हा काळ हिंदू समाजासाठी विशेष मानला जातो. या काळात मृत पूर्वज पितृलोकातून पृथ्वीवर येतात, असे मानले जाते.

त्यांच्या आत्म्यांची तृप्ती आणि शांती व्हावी म्हणून श्राद्ध, तर्पण, पिंडदान अशी कर्मकांडे केली जातात. परंपरेनुसार या १५ दिवसांत कुठलेही शुभकार्य केले जात नाही. जणू आपलेच पितर अशुभ ठरवले गेले आहेत!

आज प्रश्न असा आहे की, या कर्मकांडांचा खरोखर आत्म्यांच्या तृप्तीशी संबंध आहे काय? की हा धर्माच्या नावाखाली चालवलेला भीतीचा व्यापार आहे?

**दरवर्षी होणारे विधी : तृप्ती की दांभिकता?**

श्राद्धविधीचे मूळ तत्त्व असे सांगितले जाते की, पिंडदानाशिवाय आत्म्याला मुक्ती मिळत नाही. मग प्रश्न असा निर्माण होतो की जर एकदाच पिंडदानाने आत्मा तृप्त होत असेल, तर दरवर्षी तेच विधी करण्याची गरज का?

आत्म्यांना वर्षातून एकदाच भूक लागते का?

मुक्त झालेला आत्मा पुन्हा अपूर्ण का ठरतो?

या प्रश्नांची उत्तरे कोणाकडेच नाहीत. त्यामुळे हे स्पष्ट होते की, विधींचा खरा उद्देश पितरांची तृप्ती नसून, समाजावर भीती व अपराधगंड लादून पंडित-पुरोहितांचा, भटांचा ब्राम्होद्योग टिकवणे हा आहे.

**स्त्रियांसाठी बंदी , पुरुषसत्ताक परंपरा**

श्राद्ध विधीत स्त्रियांना स्थान नाही. पुराणांत स्पष्ट सांगितले आहे की, पुत्राशिवाय पितरांना स्वर्गप्राप्ती होत नाही. यामुळे मुलगा नसल्यास पितरांना मुक्ती मिळणार नाही, अशी भीती निर्माण केली गेली. हे थेट स्त्रियांना दुय्यम मानणाऱ्या मानसिकतेतून आलेले आहे. ज्या मातांनी आपल्याला जन्म दिला, त्यांनाच श्राद्धकमार्चा अधिकार नाही, हीच त्या व्यवस्थेची शोकांतिका आहे.

**विज्ञानाच्या कसोटीवर श्राद्ध**

विज्ञानाने आजवर आत्म्याचे अस्तित्वच सिद्ध केलेले नाही. मग आत्मा कावळ्यात येतो किंवा कावळा पितरांचा दूत आहे, असा समज कसा ग्राह्य धरायचा? कावळा हा वर्षभर मृत प्राणी, घाण, सडके अवशेष खाऊन परिसर स्वच्छ ठेवतो. तो मांसाहारी जास्त आहे, शाकाहारी कमी. तरीसुद्धा पितृपक्षात त्याला शुद्धतेचे प्रतीक मानले जाते.



ज्या पक्ष्याला आपण १२ महिने गलिच्छ आहाराशी जोडतो, त्यालाच एका दिवसापुरता शुभ ठरवणे म्हणजे प्रचंड विरोधाभास.याहून गंमतीशीर म्हणजे एकाच कावळ्याने जर अनेक पिंड खाल्ले, तर तो अनेक आत्म्यांचा वासस्थान ठरतो काय? मुस्लीम, खिश्चन धर्मीयांचे आत्मे कावळ्यात येत नाहीत का? पिंडावर येणारा कावळा स्त्री आत्म्याचा की पुरुष आत्म्याचा आहे, हे कसे ठरते? अशा साध्या प्रश्नांची उत्तरेही धर्ममार्तंड देऊ शकत नाहीत.

**संतपरंपरेची कानउघडणी**

आपल्या संतांनी या दांभिकतेवर कठोर टीका केली. तुकाराम महाराज म्हणतात ....

*जित्या नाही अन्न मेल्यावरी पिंडदान*
*हे तो चाळवाचाळवी*

एकनाथ महाराज सांगतात...

*जिता मायबापा न घालिती अन्न*
*मेल्या प्रेतावरी करिती पिंडदान*

कबीर उपरोधाने म्हणतात

*जिंदा बापाको रोटी न खिलावे,*
*मरे बाप पाछतायो...*

गाडगेबाबा ठणकावून म्हणाले...पिंडदान नका करू. मृत पूर्वजांच्या स्मृती जपा, त्यांच्या चांगल्या कामांचे अनुकरण करा. गरिबांना अन्न द्या, मुलांना शिक्षण द्या हाच खरी श्राद्ध आहे. हे विचार आजही तितकेच लागू आहेत.

**गाडगेबाबांचा प्रसंग : हास्यातून उपहास**

गो. नी. दांडेकरांनी लिहिलेल्या चरित्रात एक प्रसंग येतो. गाडगेबाबा पंढरपूरला गेले असताना त्यांनी पाहिले की, भटजी अन्न आकाशात फेकून मृत आत्म्यांना पाठवत आहे. बाबा त्याच्यावर पाणी उडवू लागले. भटजी रागाने ओरडला... हे काय करतोस? गाडगेबाबा शांतपणे म्हणाले माझ्या अमरावतीच्या संत्र्याच्या बागेला पाणी घालत आहे. तेव्हा लोकांनी विचारले, इतके दूर पाणी कसे पोहोचेल?

बाबा म्हणाले... जर तुमचे अन्न स्वर्गात पोहोचते, तर माझे पाणी अमरावतीला का पोहोचू नये? हा प्रसंग त्या अंधश्रद्धेचे मर्म चटकन उलगडून दाखवतो.

**सामाजिक वास्तव जिवंतपणी दुर्लक्ष, मृत्यूनंतर आडंबर**

आजच्या समाजात अनेक मुले जिवंत पालकांना वृद्धाश्रमात ठेवतात, त्यांच्याशी उर्मट वागतात, त्यांना नीट जेवणही देत नाहीत. पण तेच पालक मेल्यावर लोकलज्जेपोटी मोठा थाटामाट करून श्राद्धविधी करतात. हा केवळ अपराधगंडाचा खेळ आहे. जिवंत असताना सन्मान न देणारा समाज, मृत्यूनंतर कावळ्यांना खीर-पुऱ्या घालून कर्तव्यपूर्ती करतो. हा दांभिकपणा इतर धर्मात नाही, तो फक्त हिंदू धर्मात आहे.

**आर्थिक व्यवहार , भटजींचा व्यवसाय**

श्राद्धविधीचे खरे लाभार्थी म्हणजे पुरोहित. विधी सकाळी घ्या, कारण कावळे तेव्हा भुकेले असतात. विधी तीर्थक्षेत्रावर घ्या, कारण तिथले कावळे माणसांना सरावलेले असतात.

हे स्पष्ट दाखवते की, हा आत्म्यांशी काहीही संबंध नसून, अन्न खात्रीने कावळ्याला मिळावे यासाठी आखलेला व्यवहार आहे. इतिहास साक्षी आहे. हजारो वर्षे हे विधी करूनही समाज दारिद्रयातच आहे, श्रीमंती फक्त भटांच्या पोटात गेली आहे.

**विवेकाचा आवाज**

गाडगे महाराजांनी लोकांच्या डोळ्यावरचे पट्टे काढणारे प्रश्न विचारले, मृत शरीराची राख झाल्यावर त्याच्या नावाने तुम्ही जे अन्न देता, त्याचा उपभोग कोण घेतो? आत्म्याला नाक, तोंड, पोट असते काय? असेल तर मृत्यू म्हणजे काय? हे प्रश्न आजही समाजाच्या विवेकाला जागे करण्यासाठी पुरेसे आहेत.

**योग्य पर्याय, खऱ्या अर्थाने श्राद्ध**

पितृस्मरण हा एक मानवी भाव आहे. पण तो अंधश्रद्धेने नव्हे, तर विवेकाने व्यक्त व्हायला हवा. पूर्वजांची स्मृती जपा. त्यांच्या चांगल्या विचारांचे अनुकरण करा.त्यांच्या नावाने सामाजिक कार्य करा. गरिबांना अन्न, शिक्षण द्या. अडला ना, दीन दलीत गोर गरीब दिव्यांग गरजूंना वेळेवर मदत करा हेच खरे पितृऋण फेडणे आहे.

**निष्कर्ष**

पितृपक्ष, श्राद्ध, पिंडदान ही कर्मकांडे आज विज्ञानाच्या कसोटीवर टिकत नाहीत. उलट ती समाजाला अंधश्रद्धेच्या अंधारात ढकलतात. संत, समाजसुधारक, तर्कवादी, विज्ञानवादी विचारवंत यांनी वारंवार कानउघडणी केली तरीही आपण अजून जागे झालो नाही. २१व्या शतकातील खरी गरज म्हणजे, श्रद्धा नव्हे, विवेक. कर्मकांड नव्हे, समाजोपयोगी कृती.

भूतकाळाच्या भीतीत जगणे नव्हे, विज्ञानाच्या प्रकाशात पुढे जाणे. आपण जर वेळेवर जागे झालो नाही, तर भविष्यातील पिढ्या आपल्या या आंधळेपणावर हसतील.

मग कालाय नमः आज काळ बदललेला आहे वैज्ञानिक दृष्टिकोन आपण स्वीकारला पाहिजे. अनेक नवनवीन विज्ञानाने शोध लागलेले आहेत. जुन्या काळात या गोष्टी माहीत नसल्यामुळे आपले पूर्वज हे सगळं करत होते .परंतु आज आपण एकविसाव्या शतकात जगत असताना सुद्धा त्याच अंधश्रद्धा पाळत असेल तर आपल्यासारखे मूर्ख आपणच.

श्राद्ध, तेरवी,गोड जेवण या सारख्या अनेक अंधश्रद्धा ह्या काळाच्या दृष्टीने थांबवणे गरजेचे आहे. ते आपण सर्वांमिळून थांबवण्यासाठी पुढे येणे काळाची गरज आहे. मी माझ्या आई-वडिलांचे तेरवी, श्राद्ध, गोड जेवण आधी रूढी परंपरा पाडल्या नाहीत त्यांना जाऊन आज २० वर्ष पूर्ण झाले तरी माझ्या घरावर, माझ्यावर काही फरक, परिणाम झालेला नाही. आपणही सर्वजण हिंमत करून या अनिष्ट चालीरीती रूढी परंपरा डोक्यातून बाहेर फेकून द्या व विवेक बुद्धीने जीवन जगावे ही सर्वांना नम्र विनंती.

---------------

(लेखक हे साहित्यिक, समाजसेवक, समाजसुधारक, कवी, वक्ता, विश्लेषक, प्रबोधनकार. आंदोलक , प्रचारक, वारकरी आणि योगा शिक्षक आहेत. )

■ ■ ■

## संस्कार हरवत चालले का?

**वाचक लिहितात**

काल संध्याकाळची गोष्ट. गॅलरीत उभी असताना एक शाळकरी मुलगी सायकलवरून जात होती. अचानक तिच्या सायकलची चेन निघाली आणि ती थोडक्यात पडता पडता वाचली पण तिच्या पायाला मात्र दुखापत झाली. त्या क्षणी जे चित्र बघायला मिळाले ते पाहून खुप वाईट वाटले आणि चीडही आली. मनात विचार आला, खरच मुलांवर संस्कार होणे खुपच आवश्यक आहे. कारण तिथे बाजुला जी किशोरवयीन मुले बसली होती त्यांनी त्या मुलीची मदत करणे तर सोडाच पण ती फिदीफिदी हसायला लागली. काय म्हणायचे याला?

चुक मुलांची होती की पालकांची? पालकांनी जर योग्य संस्कार मुलांवर केले असते तर असे घडले नसते.पण थोड्याच वेळात वेगळं चित्र बघायला मिळालं आणि ते सुखावणारं होतं.

त्याच ठिकाणी एक तरुणी तिच्या घरासमोर गप्पा मारत उभी होती. घटना घडल्यानंतर क्षणाचाही विलंब न करता तिने त्या मुलीला सायकल उचलण्यास मदत केली, तिची आस्थेने विचारपूस केली आणि लगेच तिच्या छोट्या भावाला आतून आवाज देऊन त्या मुलीच्या सायकलची चेन बसविण्यास सांगीतले.

कृती लहानशीच होती पण संस्कारामधील फरक दाखवणारी होती आपल्याकडे शिक्षणाला, करिअरला आणि यशाला खूप महत्त्व दिलं जातं, पण खरे संस्कार मात्र मागे पडत आहेत का, हा प्रश्नही तेवढाच महत्त्वाचा आहे.

आजच्या पिढीला मोबाईल, तंत्रज्ञान आणि ज्ञान मिळत आहे; पण त्यासोबत जर दयाळूपणा, संवेदनशीलता आणि माणुसकीचे संस्कार दिले नाहीत तर हे शिक्षण अपूर्णच राहील. म्हणूनच आजच्या समाजाला खरी गरज आहे ती संस्कारांची झ कारण समाज टिकवून ठेवतात ते संस्कारच!

मुलांना केवळ उच्च शिक्षण देणे पुरेसे नाही तर त्यांना माणुसकी संवेदनशीलता आणि सहकार्य हे जोपर्यंत शिकवणर नाही तोपर्यंत हे शिक्षण अपूर्णच राहील. आणि हे संस्कार जेव्हा मुलांवर होतील तेव्हाच त्यातून एक सशक्त समाज निर्माण होईल

■ **डॉ. सौ. स्वाती देशमुख**
**नागपूर.**

# द किंग ऑफ स्टॅण्डअप कॉमेडी राजू श्रीवास्तव



प्रसिद्ध स्टॅण्ड अप कॉमेडियन राजू श्रीवास्तव यांचा आज २१ सप्टेंबर रोजी तिसरा स्मृतिदिन. दोन वर्षापूर्वी आजच्याच दिवशी त्यांची प्राणज्योत मालवली होती. त्यांच्या अकाली निधनाने मनोरंजन विश्वावर शोककळा पसरली होती.

द किंग ऑफ स्टॅण्ड अप कॉमेडी अशी ओळख असलेल्या राजू श्रीवास्तव यांचा २५ डिसेंबर १९५३ रोजी उत्तरप्रदेश मधील कानपुर येथे जन्म झाला. राजू श्रीवास्तव यांचे वडील कवी होते. बलई काका नावाने त्यांच्या अनेक कविता प्रसिद्ध झाल्या होत्या. राजू श्रीवास्तव लहान असताना आपल्या वडिलांच्या कविता म्हणत. शालेय वयातच त्यांना नकला करण्याचा छंद लागला. शाळेतील शिक्षकांच्या व गावातील माणसांच्या ते हुबेहूब नकला करत.

पुढे ते अमिताभ बच्चन यांची नक्कल करू लागले. अमिताभ बच्चन यांचा हुबेहूब आवाज काढून त्यांनी केलेली नक्कल लोकांना इतकी आवडली की लोक त्यांना ज्युनिअर अमिताभ म्हणू लागले. अमिताभ बच्चन यांच्याप्रमाणेच त्यांनी चित्रपट सृष्टीतील इतर कलाकारांची देखील नक्कल करण्यास सुरुवात केली.

त्यांचा हा नकलाचा कार्यक्रम प्रेक्षकांना आवडू लागला. कानपूरमधील प्रेक्षक त्यांना कॉमेडीसाठी बोलवू लागले. त्यांचे कार्यक्रम लोकप्रिय होऊ लागले तेंव्हा त्यांच्या एका मित्राने त्यांना त्यांच्या कॉमेडीची सीडी बनवून विकण्याचा सल्ला दिला. मित्राने दिलेला हा सल्ला त्यांच्यासाठी टर्निंग पॉईंट ठरला. राजू श्रीवास्तव यांनी त्यांच्या कॉमेडीची सीडी मार्केटमध्ये आणल्यानंतर त्यांच्या सिडीला प्रेक्षकांचा तुफान प्रतिसाद मिळाला.

मुंबईतही त्यांच्या सीडी विकल्या जाऊ लागल्या. मुंबईतही त्यांना खूप प्रसिद्धी मिळाली त्यामुळे ते मुंबईत आले आणि चित्रपटांसाठी ऑडिशन देऊ लागले. तेजाब आणि मैने प्यार किया या चित्रपटात त्यांना छोट्या भूमिका मिळाल्या.

त्यांनतर बाजीगर, मिस्टर आझाद या चित्रपटातही त्यांनी भुमीका केल्या मात्र या भूमिकांनी त्यांना समाधान दिले नाही त्यामुळे ते टीव्हीकडे वळले.

देख भाई देख या विनोदी मालिकेत त्यांना काम करण्याची संधी मिळाली. त्यानंतर त्यांनी शक्तिमान या मालिकेत काम केले. चित्रपट आणि टीव्हीवर काम करताना त्यांनी त्यांची स्टॅण्ड अप कॉमेडी काही सोडली नव्हती ते स्टॅण्ड अप कॉमेडी करतच होते. २००५ साली टीव्हीवर द ग्रेट इंडियन लाफ्टर चॅलेंज नावाचा कॉमेडी शो आला होता. या शो मध्ये त्यांनी भाग घेतला. या शो ने त्यांना स्टार बनवले.

या शो मध्ये त्यांनी सादर केलेले गजोधर काका, पिंकी पार्लरवाली ही पात्रे खूप लोकप्रिय झाली. या शो नंतर त्यांचे देशभर नाव झाले. त्यांना अनेक कार्यक्रमांमध्ये बोलावले जायचे. या काळात त्यांची कॉमेडी किंग अशीच इमेज झाली होती. २००९ साली त्यांनी बिग बॉस शो मध्येही भाग घेतला होता. २००५ ते २०१० हा त्यांचा सुवर्णकाळ होता. या काळात त्यांची लोकप्रियता गगनाला भिडली होती.

त्याचा लाभ घेऊन राजकारणात उतरण्याचा त्यांनी निर्णय घेतला मात्र त्यांना राजकारण मानवले नाही त्यामुळे ते पुन्हा कॉमेडीकडे वळले. त्यांनी आपली स्टॅण्ड अप कॉमेडी पुन्हा सुरू केली.

आपल्या स्टॅण्ड अप कॉमेडीने त्यांनी प्रेक्षकांची मने जिंकली. राजू श्रीवास्तव यांच्याप्रमाणे अनेकांनी स्टॅण्ड अप कॉमेडी करण्याचा प्रयत्न केला पण राजू श्रीवास्तव यांच्या सारखी नक्कल आणि स्टँड अप कॉमेडी कोणालाही जमू शकली नाही.

२१ सप्टेंबर २०२२ रोजी त्यांचे अकाली निधन झाले. चित्रपट, टीव्ही आणि स्टेज शो मधून प्रेक्षकांना खळखळून हसवणारे राजू श्रीवास्तव यांचे असे अकाली जाणे प्रेक्षकांना चटका लावून जाणारे ठरले. स्टॅण्ड अप कॉमेडीचे किंग राजू श्रीवास्तव यांना तिसऱ्या स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!



**श्याम ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**


■ ■ ■

# आपल्या घरात बिना बिलाचे सोने ठेवता येते का?

## पेंटिंग व चित्रकार यांच्यावर कसा टॅक्स लावला जातो?

**सोप्या भाषेत इन्कमटॅक्स आणि इन्वेस्टमेन्ट**

**सीए. गोविंदप्रसाद एस. मुंदडा**
**सीए. आकाश जी. मुंदडा**
**जालना.**




सर्वात आधी वाचकांचे प्रश्न सर्वांच्या उपयोगासाठी देत आहोत.

**प्रश्न** - आपण बिना बिलांचे किती सोनं घरी बाळगू शकतो?

**शिवाजी वसंतराव निकम, जालना.**
**मो :- 9595555492**

■ सेन्ट्रल बोर्ड ऑफ डायरेक्ट टॅक्सेसने काढलेल्या 11 मे 1994 च्या परिपत्रकाप्रमाणे आपण बिना बिलाचे पुढीलप्रमाणे सोन्याचे दागिने घरात ठेवू शकतो. विवाहित महिलांना 500 ग्रॅम, अविवाहित महिलांना 250 ग्रॅम तथा पुरुषांना 100 ग्रॅम सोन्याचे बिना बिलाचे दागिने घरात ठेवता येतात. याचा आपण सविस्तर अभ्यास सुरुवातीला केलेला आहे.

तुमचा प्रश्न जर फक्त सोन घरी ठेवायचे किती ? याबद्दल असेल तर सोनं आपल्याला घरात निव्वळ बिस्कीट किंवा बिना दागिन्याचे ठेवता येत नाही. जर सरकारी फायदा हवा असेल तर बिन बिलाच्या सोन्याचे दागिने किंवा ज्वेलरी फार्म मध्येच सोनं ठेवता येईल. याच्या सविस्तर माहितीसाठी याच दैनिकाचे पूवीर्चे अंक आपण सविस्तर वाचावे.

**प्रश्न** - महागड्या पेंटिंगवर इन्कमटॅक्स लागतो का?

■ आजकाल पेंटिंगचे फॅड खूप झाले आहेत. नवीन पिढीसुद्धा याच्यात फार रस घेत आहे. पूर्वीच्या काळात पेंटिंग हा छंद होता. परंतु, मॉडर्न काळात हा छंद व्यतिरिक्त बिजनेस म्हणून केला जात आहे.

मोठ्यामोठ्या शहरात याचे हॉल तथा गॅलरी असून, तेथे यांचे प्रदर्शनच नाहीतर लिलावही केले जातात. वरील सर्व कारणामुळेच की काय, सरकारनेही या वर टॅक्स लावले आहेत.

**प्रश्न** - पेंटिंगचे मुल्यांकन इतिहासकार सांगतील, त्याप्रमाणे घेणे बरोबर आहे का?

■ वरील प्रश्न पेंटिंगच्या कलाकारांना किंवा चित्रकारांसाठी अत्यंत महत्वाचा आहे. ज्या चित्रकारांचा उदरनिर्वाह याच्यावरच आहे त्यांच्यासाठी तर हा प्रश्न अत्यंत महत्वाचा मानला जातो. सहसा मुल्यांकन हे आर्टिस्टचे रेप्युटेशन, आर्ट वर्क, चित्रकारांची स्थिती, प्रोवेनेन्स म्हणजे ओरिजिनची स्थिती जी सहसा इतिहासासंबधी असते. यात खुपसे घटक मोजले जातात.

इन्कमटॅक्स कायद्यात सहसा अधिकारी ऐतिहासिक मुल्य धरून मार्केट किंमत काढतात व त्यावर इन्कमटॅक्स लावला जातो. परंतु, अशा वेळेस चित्रकाराने ऐतिहासिक मूल्यांकनास मान्यता देऊ नये.

यामुळे विनाकारण टॅक्स जास्त लागु शकतो. अशाप्रसंगी पेंटिंग कलाकाराने सरकारमान्य मुल्यांकन करणारे अधिकारी यांची मदत घ्यायला हवी. ते अधिकारी सरकार मान्य असतात आणि ते practical व्यवहाराप्रमाणे इन्कमटॅक्ससाठी मुल्यांकन ठरवतात.

यासाठी फक्त ऐतिहासिक किंमत किंवा लिलावी किंमत किंवा गॅलरी बघुन मुल्याकंन करणे चित्रकाराच्या हिताचे नसते. यालाच सोप्या भाषेत असे म्हणता येईल की, पेंटिंगवरसुद्धा टॅक्स प्रमाणे लागेल.

सर्व चित्रकारांना किंवा अशा सर्व कलाकारांना एकच मापदंड मूल्यांकनासाठी नसते. प्रत्येकाचे मुल्यांकन हे एक प्रकारे चॅलेंजसारखे असते, असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही. या मुळे करदात्या कलाकारांनी या बाबीकडे विशेष लक्ष देणे महत्वाचे असते.

**प्रश्न** - इन्कमटॅक्स धाडीमध्ये अतिमूल्यांकनाचे पेंटिंग जप्त करता येतात का?

■ होय, इन्कमटॅक्स अधिकाऱ्यांना जप्त करण्याचे अधिकार आहेत.

पुढील लेखमालेत आपण Digital सोन्याबद्दल माहिती घेणार आहोत, जे आजकाल महत्वाचा विषय आहे. ज्या वाचकांचे प्रश्न असतील त्यांनी 9422218428 या वर फक्त व्हॉटस्ॲप करा म्हणजे त्यांची उत्तरे विनामुल्य याच लेखमालेत त्यांच्या नावासह प्रसिद्ध केले जातील, ही नम्र सूचना.

■ ■ ■

# भारतात तशीच परिस्थिती निर्माण झाली तर..



**बादल डकरे**
**चांदुर बाजार, अमरावती.**
**९९७५८४४६३८**

आज आपण पाहतो की बांगलादेश, श्रीलंका आणि नेपाळ या आपल्या शेजारील देशांनी गेल्या काही वर्षांत गंभीर आर्थिक संकटांचा सामना केला आहे. श्रीलंकेमध्ये २०२२ मध्ये सरकारने दिवाळखोरी जाहीर केली, बांगलादेशने IMF कडून मदत मागितली आणि नेपाळमध्ये परकीय चलनसाठा आटला होता. या देशांमध्ये महागाई प्रचंड वाढली, रोजगार कमी झाले, आणि सामान्य माणसांचे जीवन अत्यंत कठीण झाले. जर ह्याच प्रकारची परिस्थिती भारतात निर्माण झाली, तर त्याचे परिणाम भयंकर असतील.

भारताची अर्थव्यवस्था ही एक मोठी आणि वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे, परंतु ती देखील जागतिक बाजारावर आणि अंतर्गत धोरणांवर अवलंबून आहे. जर चुकीचे आर्थिक निर्णय घेतले गेले, अतिव्यय झाला, किंवा परकीय कर्जांवर अतिमोठा भर दिला गेला, तर भारताला देखील आर्थिक संकटाचा सामना करावा लागू शकतो.

जर भारतात श्रीलंकेसारखी परिस्थिती उद्भवली, तर सर्वप्रथम सामान्य जनतेवर त्याचा परिणाम होईल. जीवनावश्यक वस्तूंचे दर गगनाला भिडतील. पेट्रोल, डिझेल, अन्नधान्य, औषधे यांचे भाव सामान्य माणसाच्या आवाक्याबाहेर जातील. गरीब आणि मध्यमवर्ग सर्वाधिक त्रस्त होईल. रोजगार कमी होतील, उद्योगधंदे बंद पडतील, आणि बेरोजगारीची समस्या प्रचंड वाढेल.

शासन व्यवस्थेवरचा विश्वास डळमळीत होईल. लोकांमध्ये असंतोष वाढेल, निदर्शने आणि आंदोलनं सुरू होतील. श्रीलंकेत आपण पाहिलं की जनतेने राष्ट्रपतींच्या घरावर हल्ला केला. भारतातही जर अशीच परिस्थिती झाली, तर सामाजिक आणि राजकीय अस्थिरता वाढू शकते. धार्मिक, जातीय तेढ वाढण्याची शक्यता असते, जे देशासाठी आणखी घातक ठरेल.

या परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी सरकारला कठोर आर्थिक सुधारणा कराव्या लागतील, अनावश्यक खर्च कमी करावा लागेल, करसंकलन वाढवावं लागेल, आणि गरिबांसाठी थेट मदतीच्या योजना आणाव्या लागतील. आंतरराष्ट्रीय संस्था जसे की IMF किंवा World Bank कडून कर्ज घेण्याची वेळ येऊ शकते, पण त्यासाठी सरकारला अनेक कठोर अटींचा स्वीकार करावा लागेल.

भारतासारख्या देशात अशी परिस्थिती निर्माण होऊ नये, यासाठी सरकारने आर्थिक शिस्त पाळणे अत्यावश्यक आहे. पारदर्शक धोरणं, दीर्घकालीन योजना, आणि सर्वसामान्यांच्या हिताचे निर्णय घेणे गरजेचे आहे. त्याचबरोबर नागरिकांनीही आपली जबाबदारी ओळखून कर भरणे, स्थानिक उत्पादनांना प्राधान्य देणे, आणि आर्थिक सजगता बाळगणे आवश्यक आहे.

भारताची अर्थव्यवस्था सध्या मजबूत आहे, परंतु चुकलेले निर्णय, जागतिक दबाव, आणि अंतर्गत अडचणी यामुळे संकट येऊ शकते. त्यामुळे आपल्या शेजारील देशांपासून धडा घेत, भारताने काळजीपूर्वक आणि दूरदृष्टीने वाटचाल करणे आवश्यक आहे. अन्यथा, एकदा का संकट आलं, की त्यातून बाहेर पडणं खूप अवघड ठरतं.

**अशोकायन**

**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



## स्वस्थ नारी सशक्त परिवार

कुटूंबाचं व्यवस्थापन
करत असते नारी
तिचेच आरोग्य खालावले
तर घडी विस्कटते सारी ..

गृहीणीचे स्वास्थ बिघडले
तर घराचे चैतन्य हरपते
पुरुषांचा जीव होतो कासाविस
तेंव्हा तिचे महत्व पटते..

स्वस्थ नारी सशक्त परिवार
स्लोगन आहे भारी
समजुन घेतले प्रत्येकाने
तर कुटूंब घेईल उंच भरारी ..!



## अटलांटा इलेक्ट्रीकल्स लिमिटेडची प्राथमिक समभाग विक्री २२ सप्टेंबरपासून होणार सुरू

**मुंबई, २० सप्टेंबर :** अटलांटा इलेक्ट्रीकल्स लिमिटेड कंपनी प्राथमिक समभाग विक्रीसाठीची बोली/ऑफर सोमवार २२ सप्टेंबर २०२५ पासून सुरू करणार आहे. एकूण ऑफर साईज मध्ये प्रत्येकी २ रुपये दर्शनी मूल्याच्या ६८७ कोटी रु. (एकूण ऑफर साईज) किंमतीच्या इक्विटी शेअर्सचा समावेश आहे. त्यामध्ये ४०० कोटी रु. पर्यंतचे फ्रेश इश्यू आणि २८७ कोटी रु. मूल्याच्या ऑफर फॉर सेलचा समावेश आहे.

प्रति इक्विटी शेअरसाठी ७१८ रुपये ते ७५४ रुपये पर्यंतचा किंमतपट्टा निश्चित करण्यात आला आहे.

प्रमुख गुंतवणूकदाराच्या बोलीचा दिनांक शुक्रवार, १९ सप्टेंबर २०२५ आहे. बोली/ऑफर बुधवार, २४ सप्टेंबर २०२५ रोजी बंद होईल. बोली किमान १९ इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर १९ इक्विटी शेअर्सच्या पटीत लावता येईल.

कंपनीचा फ्रेश इश्यूमधून मिळणाऱ्या निव्वळ निधीचा उपयोग पुढीलप्रमाणे करण्याचा प्रस्ताव आहे: (i) साधारण ७९ कोटी रु. एवढ्या कंपनीने घेतलेल्या काही प्रलंबित कर्जाचे पूर्ण किंवा काही प्रमाणात आगाऊ परतफेड/नियोजित परतफेड करण्यासाठी, नवीन तंत्रज्ञान विकास आणि क्लाउड इन्फ्रास्ट्रक्चर यासाठी खर्च, अंदाजित रक्कम ७९ कोटी रु., (ii) कंपनीच्या अंदाजे २१० कोटी रु.एवढ्या खेळत्या भांडवलाच्या निधीसाठी, (iii) आणि उर्वरित रक्कम सर्वसाधारण कॉर्पोरेट उद्दिष्टांसाठी.

३,८१०,८९५ पर्यंतच्या इक्विटी शेअर्सच्या ऑफर फॉर सेल मध्ये अटलांटा यूएचव्ही ट्रान्सफॉर्मर्स एलएलपी यांच्याद्वारे ४३५,९०० पर्यंतचे इक्विटी शेअर्स (प्रवर्तक विक्री समभागधारक), हेमांग हरेंद्र शहा यांच्याकडून ६६६,५६० पर्यंतचे इक्विटी शेअर्स, निमिष हरेंद्र शहा यांच्याकडून ७७७,१८५ पर्यंतचे इक्विटी शेअर्स, धवल हर्षदभाई मेहता यांच्याकडून २१७,५०० पर्यंतचे इक्विटी शेअर्स (अवनी धवलभाई मेहता यांच्याबरोबर संयुक्तरित्या), गीताबेन हर्षदभाई मेहता यांच्याकडून ३२६,२५० पर्यंतचे इक्विटी शेअर्स (हर्षदभाई अमृतलाल मेहता यांच्याबरोबर संयुक्तरित्या) आणि जिग्नेश सुर्यकांत पटेल यांच्याकडून १,३८७,५०० पर्यंतचे इक्विटी शेअर्स (इतर विक्री समभागधारक) समावेश आहे. हे इक्विटी शेअर्स कंपनीच्या दिनांक १६ सप्टेंबर २०२५ रोजीच्या रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस द्वारे सादर करण्यात येत असून मुंबईत रजिस्ट्रार ऑफ कंपनीज, महाराष्ट्र यांच्याकडे दाखल करण्यात आले आहेत.

कंपनीचे रेड हेअरिंग प्रोस्पेक्टस द्वारे हे इक्विटी शेअर्स बीएसई लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड वर सूचीबद्ध करण्याचे प्रस्तावित आहे.

मोतीलाल ओसवाल इन्व्हेस्टमेंट डव्हायझर्स लिमिटेड आणि क्सिस कॅपिटल लिमिटेड हे या इश्यूचे बुक रनिंग लीड मॅनेजर्स आहेत.

येथे वापरल्या गेलेल्या परंतु परिभाषित न केलेल्या सर्व कॅपिटलाइज्ड शब्दांचा अर्थ आरएचपी मध्ये नमूद केल्यासारखाच असेल.

## अर्पित सातपुतेने पीबीपार्टनर्ससोबत स्वतःच्या करिअरला कलाटणी दिली, फक्त एका वर्षात स्वतःचे उत्पन्न दीड पटीने वाढवले

**नागपूर, २० सप्टेंबर :** पॉलिसीबझारची पीओएसपी शाखा पीबीपार्टनर्ससह संपूर्ण भारतात उदरनिर्वाहाचे नवीन मार्ग खुले होत आहेत, व्यक्ती पीओएसपी एजंट सहयोगी म्हणून स्थिर व लाभदायी करिअर घडवण्यास सक्षम होत आहेत. अशीच एक प्रेरक कथा महाराष्ट्रातील चंद्रपूर येथील मोटर विमा सल्लागार अर्पित सातपुतेची आहे, ज्याचा पीबीपार्टनर्ससोबतचा प्रवास प्रदेशामधील अनेक महत्त्वाकांक्षी एजंट्ससाठी प्रेरक उदाहरण आहेत.

पीबीपार्टनर्ससोबतचा प्रवास :

अर्पित सातपुतेने स्थिर व विकास-केंद्रित करिअर घडवण्याच्या ध्येयामधून प्रेरित होत एक वर्षापूर्वी पीबीपार्टनर्ससोबत त्याचा प्रवास सुरू केला. समर्पितता व सतत प्रयत्न करत त्याने प्लॅटफॉर्मचे टूल्स आणि पाठिंब्याचा स्वीकार केला, ज्यामुळे त्याला विमा क्षेत्रात त्याची उपस्थिती प्रबळ करण्यास मदत झाली.



एका वर्षात उत्पन्नामध्ये दीड पट वाढ :

पीबीपार्टनर्समध्ये सामील झाल्यापासून अर्पितने फक्त एका वर्षात त्याच्या उत्पन्नामध्ये उल्लेखनीय दीड पट वाढ केली आहे. तो म्हणाला, ''पीबीपार्टनर्सने मला माझे उत्पन्न दीड पटीने वाढवण्यास मदत केली आहे.''

पाठिंबा, जो बदल घडवून आणतो :

अर्पितच्या जीवनामधील विनासायास परिवर्तनाचे श्रेय त्याच्या रिलेशनशिप मॅनेजरकडून सतत मिळालेल्या पाठिंब्याला जाते. तो आत्मविश्वासासह म्हणाला, ''माझे रिलेशनशिप मॅनेजर नेहमी मदतगार व सहाय्यक राहिले आहेत.'' या विश्वासार्ह मार्गदर्शनामुळे त्याला पूर्णपणे ग्राहकांना सेवा देण्यावर आणि त्याचा व्यवसाय वाढवण्यावर लक्ष केंद्रित करता आले.

गतीशील, कार्यक्षम आणि लाभदायी :

अर्पितसाठी जीवनाला कलाटणी देणारी बाब म्हणजे पीबीपार्टनर्सचे उपक्रम जसे लॉयल्टी प्रोग्राम, ज्याला तो गेम-चेंजर मानतो. तो म्हणाला, ''लॉयल्टी प्रोग्राम सर्वोत्तम उपक्रम आहे. हा उपक्रम सातत्यपूर्ण प्रयत्नांना महत्त्व देतो आणि माझ्यासारख्या सर्व एजंट सहयोगींना अधिक कामगिरी करण्यास प्रेरित करतो.''

हे आर्थिक मनोबल, तसेच सातत्यपूर्ण मार्गदर्शन आणि मान्यतेने त्याचा आत्मविश्वास वाढवला आहे, तसेच त्याला दीर्घकालीन, शाश्वत करिअर म्हणून विम्याकडे पाहण्यास मदत केली आहे.

अर्पितच्या प्रवासामधून निदर्शनास येते की, पीबीपार्टनर्स द्वितीय व तृतीय श्रेणीच्या शहरांमधील व्यावसायिकांसाठी संधीचे दरवाजे खुले करत आहे, त्यांना भविष्यासाठी सुसज्ज विमा करिअर घडवण्यास सक्षम करते, ज्यामध्ये डिजिटल कार्यक्षमता, भक्कम पाठिंबा आणि अर्थपूर्ण रिवॉर्ड्स आहेत.

## क्रोमा स्टोअर्स दालनांमध्ये आयफोन १७ च्या खरेदीवर सवलती जाहीर

**नागपूर, २० सप्टेंबर :** टाटा ग्रुपचे भारतातील अग्रगण्य ओम्नी-चॅनेल इलेक्ट्रॉनिक्स रिटेलर क्रोमाने आज नवीन आयफोन १७ रेंजवर ग्राहकांसाठी खास ऑफर्सची घोषणा केली आहे. या ऑफर्स क्रोमा स्टोअर्स, TRiBE by Croma आउटलेट्स, Croma.com आणि Tata Neu ॲप वर उपलब्ध असतील. लाँच कॅम्पेन १९२७ सप्टेंबर या कालावधीत सेल विंडोने सुरू होईल. त्यानंतर २६ ऑक्टोबर पर्यंत विस्तारित ऑफर्स सुरू राहतील, तर निवडक लाभ त्यानंतरही चालू राहतील.

ग्राहक क्रोमा आणि TRiBE by Croma च्या देशभरातील ५६० हून अधिक स्टोअर्समधून, क्रोमाचे २०६ शहरांमध्ये पसरलेले समर्पित ॲपल अधिकृत रिसेलर तसेच Croma.com आणि Tata Neu वरून सहजपणे आयफोन १७ बघणे आणि खरेदी करू शकतात. TRiBE by Croma हे ॲपल ऑथराइज्ड रीसेलर असून, येथे प्रशिक्षित स्पेशालिस्ट्स आणि पूर्ण ॲपल पोर्टफोलिओसह प्रीमियम ॲपल शॉपिंग अनुभव दिला जातो. ते निवडीपासून सेटअपपर्यंत तज्ञ सहाय्य सुनिश्चित करतात.

१९२७ सप्टेंबर या कालावधीत ग्राहकांना १२,००० रु. पर्यंत एक्स्चेंज बोनस मिळू शकतो, Tata Neu एचडीएफसी कार्डवर १०% पर्यंत NeuCoins * मिळतील, तसेच क्रोमा आणि TRiBE स्टोअर्स, तसेच Croma.com आणि Tata Neu ॲप वर ऑनलाईन खरेदी केलेल्या पात्र आयफोन १७ खरेदीवर नो-कॉस्ट ईएमआय पर्याय* उपलब्ध असतील. या लाँच सेल विंडोदरम्यान विशेष सवलत म्हणून, ग्राहकांना निवडक ॲपल ॲक्सेसरीजवर २०% पर्यंत सूट मिळू शकते. त्यायोगे केस, चार्जर आणि ऑडिओ गिअर समाविष्ट करून आयफोन सेटअप पूर्ण करण्यासाठी ते आदर्श ठरते.

या घोषणेवर प्रतिक्रिया देताना इन्फिनिटी रिटेल लिमिटेडच्या प्रवक्त्यांनी सांगितले, दरवर्षी ग्राहक आयफोन खरेदीसाठी क्रोमा वर विश्वास ठेवतात. तिथे उत्तम एक्स्चेंज व्हॅल्यू, पारदर्शक फायनान्स ऑप्शन्स, खात्रीशीर ॲक्सेसरीज आणि तज्ञांचे मार्गदर्शन मिळते. आमच्या खास आयफोन १७ ऑफर्सद्वारे आम्ही अपग्रेड प्रवास अधिक सोपा केला असून तो क्रोमा स्टोअर्स, TRiBE by Croma, Croma.com आणि Tata Neu अशा सर्व चॅनेल्समध्ये उपलब्ध केला आहे. त्यामुळे ग्राहक त्यांच्या आवडीचा आयफोन निवडू शकतात आणि महत्त्वपूर्ण बचत व रिवॉर्ड्स खुले करता येतात.

## सॅमसंगने भारतात गॅलेक्सी स्मार्टफोन्सवर विशेष किमतींसह उत्सवी आनंदामध्ये अधिक उत्साहाची भर केली

**मुंबई, २० सप्टेंबर :** सॅमसंग या भारतातील सर्वात मोठ्या ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँडने आज निवडक गॅलेक्सी स्मार्टफोन्सवर अभूतपूर्व किमतींची घोषणा केली. विशेष किमतीसह ग्राहक लाँच झाल्यापासून आतापर्यंतच्या सर्वात आकर्षक दरांमध्ये गॅलेक्सी स्मार्टफोन्स खरेदी करू शकतात आणि एआय-समर्थित वैशिष्ट्यांचा आनंद घेऊ शकतात, ज्यामुळे दैनंदिन अनुभव अधिक सहजसाध्य, सर्जनशील आणि उत्पादनक्षम झाले आहेत.

गॅलेक्सी एस२४ अल्ट्रा, गॅलेक्सी एस२४ आणि गॅलेक्सी एस२४ एफई

काऊंटरपॉइण्ट रिसर्चच्या मते, गॅलेक्सी एस२४ अल्ट्रा भारतातील सर्वाधिक विक्री होणारा प्रीमियम स्मार्टफोन आहे. मूळ सुरूवातीची किंमत १,२९,९९९ रूपये असलेला हा स्मार्टफोन फेस्टिव्ह सेलदरम्यान ७१,९९९ रूपयांमध्ये उपलब्ध असेल. क्वॉलकॉम स्नॅपड्रॅगन ८ जेन ३ ची शक्ती असलेला गॅलेक्सी एस२४ फक्त ३९,९९९ रूपयांमध्ये उपलब्ध असेल, तर गॅलेक्सी एस२४ सिरीजप्रमाणे प्रगत एआय अनुभवाचा समावेश असलेला गॅलेक्सी एस२४ एफई फक्त २९,९९९ रूपयांमध्ये उपलब्ध असेल.

गॅलेक्सी ए५५ ५जी आणि गॅलेक्सी ए३५ ५जी आता जवळपास ४२ टक्के सूटसह उपलब्ध

गॅलेक्सी ए५५ ५जी २३,९९९ रूपयांच्या किमतीमध्ये उपलब्ध असेल, तर गॅलेक्सी ए३५ ५जी फक्त १७,९९९ रूपयांमध्ये उपलब्ध असेल. काऊंटरपॉइण्ट रिसर्चच्या मते, सॅमसंग गॅलेक्सी ए५५ ५जी आणि गॅलेक्सी ए३५ ५जी २०२४ मध्ये त्यांच्या किमती श्रेणीमधील पहिल्या क्रमांकाचे विक्री होणारे स्मार्टफोन होते. गॅलेक्सी ए५५ ५जी आणि ए३५ ५जी मध्ये आकर्षक ६.६ इंच एफएचडी+ १२० हर्ट्झ सुपर एएमओएलईडी डिस्प्ले, डॉल्बी स्टिरिओ स्पीकर्स आणि बाहेरील वातावरणामध्ये सुस्पष्ट, प्रखर व्हिज्युअल्ससाठी व्हिजन बूस्टर आहे. फोटोग्राफीसंदर्भात दोन्ही स्मार्टफोन्समध्ये ५० मेगापिक्सल मेन कॅमेरासह ओआयएस, अल्ट्रा-वाइड व मॅक्रो लेन्सेस, तसेच सुधारित नाइटोग्राफी आहे.



गॅलेक्सी एम३६ ५जी, गॅलेक्सी एम१६ ५जी आणि गॅलेक्सी एम०६ ५जी आता जवळपास ३० टक्क्यांच्या सूटसह उपलब्ध

गॅलेक्सी एम३६ ५जी फक्त १३,९९९ रूपयांमध्ये उपलब्ध असेल. तसेच गॅलेक्सी एम१६ ५जी १०,४९९ रूपयांच्या सुरूवातीच्या किमतीमध्ये उपलब्ध असेल. गॅलेक्सी एम०६ ५जी फक्त ७४९९ रूपयांमध्ये उपलब्ध असेल. भारतातील जनरेशन झेड ग्राहकांसाठी डिझाइन करण्यात आलेल्या गॅलेक्सी एम३६ ५जी मध्ये अनेक एआय इनोव्हेशन्ससोबत विविध विभागातील अग्रणी वैशिष्ट्ये आहेत, जसे अधिक टिकाऊपणासाठी कॉर्निंगएँ गोरिलाएँ ग्लास व्हिक्टसएँ+ संरक्षण.

गॅलेक्सी एफ३६ ५जी आणि एफ०६ ५जी आता जवळपास ३० टक्क्यांच्या सूटसह उपलब्ध

गॅलेक्सी एफ३६ ५जी फक्त १३,९९९ रूपयांमध्ये उपलब्ध असेल. गॅलेक्सी एफ०६ ५जी ७४९९ रूपयांच्या सुरूवातीच्या किमतीमध्ये उपलब्ध असेल. गॅलेक्सी एफ०६ ५जी मध्ये सर्व टेलिकॉम ऑपरेटर्सचे १२ ५जी बँड्स आहेत, ज्यामुळे किफायतशीर दरामध्ये परिपूर्ण ५जी अनुभव मिळतो.

गॅलेक्सी एस२४ अल्ट्रा, गॅलेक्सी एस२४, गॅलेक्सी एस२४ एफई, गॅलेक्सी ए३५ ५जी, गॅलेक्सी एम३६ ५जी, गॅलेक्सी एम१६ ५जी आणि गॅलेक्सी एफ३६ ५जी यावरील ऑफर्स २२ सप्टेंबर २०२५ पासून सुरू होतील.

## सोनी सब कलाकार त्यांचे आवडते नवरात्रीचे सण साजरे करण्याचे परंपरा शेअर करत आहेत

**मुंबई, २० सप्टेंबर :** नवरात्रीचा सळसळता, थिरकणारा सण जवळ आला आहे. हे देशभरात आनंदाचे, भक्तीचे आणि जल्लोषाचे पर्व आहे. दुर्गा मातेची आराधना करण्यास हा सण समर्पित आहे. नवरात्री हे सुष्टाच्या दुष्टावरील विजयाचे प्रतीक आहे. भारतीय लोकांच्या मनात या सणाचे विशेष स्थान असते. नवरात्रीचा आनंद साजरा करताना सोनी सबचे कलाकार या सणाशी संबंधित सुंदर आठवणींना उजाळा देत आहेत आणि आपल्या वैयक्तिक आठवणी शेअर करत आहेत. आपल्या परिवारासोबत उपवास करण्यापासून ते गरब्याच्या रात्री जागवण्यापर्यंतच्या या आठवणींमधून या सणाची भावना साकारते आणि आपल्या परांपरेशी आपले घट्ट नाते असल्याचा अनुभव या कलाकारांना येतो.

पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत दीप्तीची भूमिका करणारी गरिमा परिहार म्हणते, नवरात्रीचे माझ्या हृदयात विशेष स्थान आहे. माझी आई देवीची पूजा करते आणि मी देखील लहानपणापासून देवीची भक्त आहे. आईसोबत उपवास करणे आणि कुमारिका भोजन घालणे या माझ्यासाठी फार गोड आठवणी आहेत. यावर्षी पुष्पा इम्पॉसिबलच्या शूटिंगमुळे मला माझ्या मित्रमंडळींसोबत गरबा करायला जाणे जमणार नाही. मात्र नवरात्रीची सकारात्मक ऊर्जा आणि देवीवरील माझी श्रद्धा यामुळे हा सण नेहमीच अविस्मरणीय ठरतो.

उफ्फ ये लव है मुश्किल ... मालिकेत कैरी शर्माची भूमिका करणारी आशी सिंह म्हणते, माझ्यासाठी नवरात्री हा पहिल्यापासून एक विशेष सण आहे. माझ्या मते हे नऊ दिवस केवळ जल्लोषाने भरलेले नसतात, तर या काळात भक्ती, शिस्त आणि आंतरिक शक्तीचा देखील संचार असतो. गरबा आणि दांडियामुळे वातावरण सळसळत असते! लहानपणी रंगीबेरंगी चणिया-चोळी घालून तयार होऊन माझ्या मैत्रिणींसोबत गरबा करण्याचा मला कोण उत्साह असायचा! आजही माझे शूटिंगचे वेळापत्रक धकाधकीचे असले तरीही मला संधी मिळाली तर मी गरब्याचा आनंद नक्कीच घेईन.

उफ्फ ये लव है मुश्किल ... मालिकेत लताची भूमिका करणारी रिद्धिमा पंडित म्हणते, माझ्यासाठी नवरात्री म्हणजे भक्ती आणि सकारात्मकता. मला आठवते आहे, लहानपणी मी माझ्या आईला देवीसाठी नैवेद्य बनवण्यास मदत करत असे. या पूजेच्या निमित्ताने आम्ही सगळे कुटुंबीय एकत्र यायचो आणि सण साजरा करायचो. मला या सणाबद्दल सगळ्यात जास्त आवडणारी गोष्ट हीच आहे की, हा सण नृत्य, संगीत आणि पूजा या निमित्ताने सर्वांना एकत्र आणतो आणि सर्व जण मिळून जणू एक मोठे कुटुंब होते! माझ्यासाठी नवरात्रीचा अर्थ अंतर्मुख होऊन दुर्गा देवीची शक्ती आणि तिचे माहात्म्य अनुभवण्याचा आहे. दरवर्षी, देवीचा पराक्रम आणि सकारात्मकता माझ्या आयुष्यात बिंबवण्याचा माझा प्रयत्न असतो. मी आवर्जून पंडालमध्ये जाऊन आध्यात्मिक ऊर्जेचा अनुभव घेते. गरबा आणि दांडियामुळे आसपासचे वातावरण इतके चैतन्यमय होते, ते मला फार आवडते.

इत्ती सी खुशी मालिकेत नंदिताची भूमिका करणारी गौरी टोंक म्हणते, मी ठाण्यात राहते आणि नवरात्रीदरम्यान आमच्या सोसायटीच्या ऑफिसमध्ये देवीची मूर्ती स्थापित होते आणि दररोज तिची पूजा करण्यात येते. मला पहिल्यापासून पूजा-अर्चना आणि सण-उत्सवांमध्ये खूप स्वारस्य आहे, ज्यामुळे लोक तर मला पूजारीच म्हणतात. लोकांना भेटणे, त्यांच्यासोबत पूजा, आरती करणे यामुळे जी ऊर्जा उत्पन्न होते, ती मला फार आवडते. लहान असताना मी देवीच्या मूर्तीपुढे उभी राहून तिची अर्चना आणि गरबा करत असे. आज मी माझ्या मुलांना माझ्या सोबत पंडालमध्ये घेऊन जाते आणि दर्शनाचा अनुभव त्यांनाही मिळेल याची खातरजमा करते. कामात कितीही गुंतलेले असले तरी यासाठी मी आवर्जून वेळ काढते, कारण नवरात्री वर्षातून एकदाच येते. आम्ही गरबा आणि दांडिया खेळून या सोहळ्याचे समापन करतो. काय सुंदर अनुभव असतो तो!

## एचडीएफसी बँकेने १,००० हून अधिक शिक्षकांना सुरक्षित डिजिटल बँकिंग पद्धतींबद्दल प्रशिक्षण दिले

**मुंबई, २० सप्टेंबर :** भारतातील आघाडीची खाजगी क्षेत्रातील बँक असलेल्या एचडीएफसी बँकेने, भारतातील शाळा आणि महाविद्यालयांमधील १,००० हून अधिक शिक्षकांना सुरक्षित डिजिटल बँकिंग पद्धतींबद्दल जागरूक करण्यासाठी एक आभासी सत्र आयोजित केले.

या सत्राच्या माध्यमातून, शिक्षकांना सुरक्षित डिजिटल बँकिंग पद्धतींबद्दल मौल्यवान माहिती मिळाली. नागरिकांना सतर्क राहण्यास आणि सायबर स्कॅमर्सपासून स्वतःचे संरक्षण करण्यास मदत करणे हा या उपक्रमाचा उद्देश होता.

या सत्रात वास्तविक जीवनातील उदाहरणे, कथा आणि व्हिडिओंचा समावेश करण्यात आला होता, ज्यामुळे सहभागींना फसवणूक करणाऱ्यांनी वापरलेल्या विविध पद्धती समजून घेण्यास मदत झाली. एचडीएफसी बँक, गेल्या चार वर्षांपासून देशभरातील विविध ठिकाणी सुरक्षित बँकिंग उपक्रमांतर्गत सायबर फसवणूक जागरूकता सत्रे आणि कार्यशाळा आयोजित करत आहे.

यावर भाष्य करताना, मनीष अग्रवाल, वरिष्ठ कार्यकारी उपाध्यक्ष - क्रेडिट इंटेलिजेंस अँड कंट्रोल - एचडीएफसी बँक, म्हणाले, जागरूकतेचा अभावामुळे लोक सायबर फसवणुकीला बळी पडतात. म्हणूनच लोकांना संवेदनशील करणे आवश्यक आहे, जेणेकरून ते गोपनीय बँकिंग डेटा शेअर करणार नाहीत किंवा पडताळणी न केलेल्या लिंक्सवर क्लिक करणार नाहीत. या सत्रांचा उद्देश, शिक्षकांना ऑनलाइन जगात सुरक्षितपणे नेव्हिगेट करण्यासाठी योग्य ज्ञानाने सुसज्ज करणे हा आहे.

बँक, ग्राहकांना डिजिटल व्यवहार करताना सावधगिरी बाळगण्याचे आणि सुरक्षित बँकिंग सवयींचा अवलंब करण्याचे आणि त्यांची वैयक्तिक बँकिंग माहिती कोणालाही शेअर करण्याचे टाळण्याचे प्रोत्साहन देते. जर ग्राहक ऑनलाइन फसवणुकीला बळी पडले, तर त्यांनी तात्काळ बँकेला अनधिकृत व्यवहारांची तक्रार करावी आणि भविष्यातील नुकसानापासून बचाव करण्यासाठी पेमेंट मोडला ब्लॉक करून घ्यावे. ग्राहकांनी, गृह मंत्रालयाने (एमएचए) सुरू केलेल्या १९३० या हेल्पलाइन क्रमांकावर कॉल करून देखील तक्रार दाखल करावी आणि राष्ट्रीय सायबर क्राइम रिपोर्टिंग पोर्टल https://cybercrime.gov.in वर तक्रार सादर करावी.

## यंदाच्या उत्सव हंगामात, मेन ऑफ प्लॅटिनमच्या 'एमएस धोनी सिग्नेचर एडिशन'ची खरेदी करताना मोमेंटविथमाही साजरा करा


**मुंबई, २० सप्टेंबर :** प्लॅटिनम गिल्ड इंटरनॅशनल (पीजीआय) भारतातील 'मेन ऑफ प्लॅटिनम' ब्रँड या उत्सवाच्या हंगामात 'एमएस धोनी सिग्नेचर एडिशन' सह बाजारात पुन्हा दाखल होत आहे. आधुनिक प्रतिमेच्या चिरकाल वारशाचे दर्शन घडवणारी दागिन्यांची ही एक श्रेणी आहे. मौल्यवान दागिन्यांत शुद्धतेच्या सर्वोच्च मानकांपैकी एक असलेल्या ९५ टक्के शुद्ध प्लॅटिनममध्ये हे दागिने घडवलेले असतात. प्लॅटिनम नैसर्गिकरित्या पांढरे असते, ते कधीही फिकट होत नाही किंवा काळेही पडत नाही. यातील प्रत्येक दागिना निरंतर टिकून राहण्यासाठी डिझाइन केलेला आहे. अगदी तो ज्या महत्त्वासाठी ओळखला जातो, त्याप्रमाणेच तो घडवलेला असतो. मजबूत, दुर्मिळ आणि अजरामर असे हे प्लॅटिनम एम. एस. धोनीच्या कारकिर्दीला परिभाषित करणारे लवचिकपणा, संयमशीलता आणि आत्मविश्वास आदी गुण प्रतिबिंबित करतो.



संग्रहातील नवनवीन दागिने धोनीची कारकीर्द आणि शैलीच्या विशिष्ट जाणिवेतून प्रेरणा घेतात. जोडणी आणि ताकद दर्शविणाऱ्या शिल्पासारख्या ब्रेसलेटपासून (कडे) ते अचूकता आणि सूक्ष्म स्वभावाचे प्रतिबिंबित करणाऱ्या दुहेरी रंगछटेतील हे दागिने किमान डिझाइनमध्येही व्यक्तीचा विशिष्ट असा ठसा उमटवतात. दागिन्यांतील स्वच्छ रेषा, उद्देशपूर्ण तपशील आणि धोनीच्या स्वाक्षरीतील निर्विवाद कोरीवकाम हे या संग्रहातील प्रत्येक दागिन्याला अंतर्गत महानतेचे चिन्ह बनवते. या संग्रहाला वेगळे करणारी गोष्ट म्हणजे अभिरुचीपूर्ण शुद्धीकरण आणि खोल प्रतीकात्मकता यांचे मिश्रण करण्याची क्षमता.

यंदाच्या या हंगामात मेन ऑफ प्लॅटिनमने आणखी एक खासियत जोडली आहे. प्लॅटिनम दागिन्यांच्या संग्रहामधून प्रत्येक खरेदीसह, ग्राहकांना आयुष्यात एकदाच मिळणारी संधी जिंकण्याचा योग आहे. २०२६ च्या सुरुवातीला मुंबईत होणाऱ्या कार्यक्रमात एमएस धोनीबरोबर भेटीचा खास अनुभव जिंकण्याची ही संधी आहे. हा उपक्रम १८ सप्टेंबर ते १६ नोव्हेंबर २०२५ पर्यंत निवडक रिटेल स्टोअरमध्ये चालणार आहे, ज्यामुळे चाहत्यांना कौतुकाचे वैयक्तिक क्षणात रूपांतर करण्याची दुर्मिळ संधी मिळते.

## शब्दकोडे क्रमांक २२२३



आडवे शब्द:-
१) एकाचा राग दुसऱ्यावर काढणे
८) बकरी
९) संगीतातील ठेका
१०) पर्वत अस्सल माल
११) विळखा
१२) सरोवर
१४) गावाचा कारभार पाहाणारा
१६) रामदासस्वामींनी मनाचे श्लोक या गावात लिहिले
१७) वाढलेला व्याप अस्तावस्त पसरलेले सामान
१९) जाण
२१) दुर्गंधी येऊ लागलेला
२४) गुरांचे नख
२५) नवऱ्याला हाक मारण्याचा एक शब्द
२६) तुफान
२७) जुगाराचा एक प्रकार
२९) श्रीविष्णूचा एक अवतार
३१) संतोषजनक
३४) नवरदेव
३५) प्रभात
३७) अंतःकरण
३८) मीठाची चव
४०) लग्नादि कार्यासाठी जमलेला गोतावळा
४३) उत्सव
४४) अरण्य
४५) पतिव्रतेचा पुत्र
४७) वेळ, यम
४८) विधानसभेचा सदस्य
५१) कावळ्याचे ओरडणे
५३) होडी
५४) सुंदर युवती
५५) आघाडीला खेळणारा
५७) वैताग, बडबड
५८) एक पालेभाजी, मडके
५९) व्रात्य, मोकळा सुटलेला, निरुद्योगी
६०) समुद्र
६३) पुष्कळवेळा
६५) बाग, बगीचा
६८) अभिप्राय
६९) वाकडा नसलेला
७१) दुधाचे दही बनविणारा घटक
७३) दागदागिने
७५) मनोहरत्व
७६) धमनी, कापडी बंद
७७) पुरुष,
७८) गाय

उभे शब्द :-
१) पहिला ऋतू
२) सूचना, चिथावणी
३) गळीत धान्यातून निघालेला द्रवपदार्थ
४) मूल न होणारी गाय
५) वसाहत
६) नाथपंथी गोसावी
७) अंगापेक्षा मोठे झालेले वस्त्र
८) हिंमत, धैर्य
११) बशीचा जोडीदार
१३) विवाहातील एक विधि,
१५) मध्यस्थ, पंच
१६) चक्र
१८) आरक्षित
२०) खोलवर नसलेले, वरपांगी
२२) वाऱ्याने हलणाऱ्या पानांचा आवाज
२३) मुक्तता
२५) अवाजवी
२६) उत्तराधिकारी
२७) चिंतन
२८) कारखान्याचा मालक
३०) न आवडणाऱ्या माणसाचे गुणही दोष वाटतात (वा.प्र.)
३२) सापाची एक जात
३३) हस्त
३६) शरीर
३९) गाडीचे छत
४१) नाश
४२) कलावंत
४३) तलवारीचे म्यान
४४) कौसल्यापुत्र
४६) अत्यल्प, श्रीराम सीतेचा एक पुत्र
४७) गेरू
४८) मालाचे येणे-जाणे
४९) संथपणे, हलतडुलत
५०) वाळा
५२) इच्छा
५३) अपशकुन
५६) तिबेटी धर्मगुरू
५९) दानी, थोर मनाचा
६१) निमग्न, रममाण
६२) वार, दिवस
६४) गीत
६६) फुलांची छोटी टोपली
६७) वंदन
७०) दारूचा एक प्रकार
७२) यात्रेकरूंचा समूह
७४) झाडाभोवतीचा कट्टा

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



## बायरकडून अधिक स्मार्ट, कॅमॅलस हे वैविध्यपूर्ण कीटकनाशक बाजारात

**गोंदिया, २० सप्टेंबर :** शेती आणि आरोग्यसेवा अशा जीवन विज्ञान क्षेत्रात कार्यरत बायर या जागतिक कंपनीने भारतीय बागायती शेतकऱ्यांसाठी विशेषतः डिझाइन केलेले एक अद्वितीय विविध कीटकांसाठीचे कीटकनाशक कॅमलस बाजारात आणल्याची घोषणा केली आहे. कॅमलस चघळणारे आणि रसशोषक अशा दोन्ही कीटकांच्या नियंत्रणासाठी असून ते आजच्या बागायती पीक लागवडीमध्ये गरजेचे आहे.

भारतातील प्रमुख राज्यांमधील मूल्यवान भाजीपाला बाजारपेठांना लक्ष्य करून, कॅमलस ऑगस्ट २०२५ पासून पंजाब, हरियाणा, उत्तराखंड, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, छत्तीसगड, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, तेलंगणा आणि कर्नाटकमध्ये उपलब्ध असेल.

या उद्घाटनावेळी बोलताना बायरच्या भारत, बांगलादेश आणि श्रीलंका प्रभागाचे पीक विज्ञान विभागाचे समूह वाणिज्यिक प्रमुख मोहन बाबू म्हणाले, भारताच्या पीक सुरक्षेच्या गरजा पूर्ण करताना भाजीपाला पिके केंद्रस्थानी आहेत आणि जागतिक निर्यात अर्थव्यवस्थेत देशाचे स्थान मजबूत करण्याची प्रचंड क्षमता त्यांच्यात आहे. भाजीपाला पिकांचा वापर वाढत असताना पीक उत्पादकता आणि गुणवत्ता कायम राखणे अधिक महत्त्वाचे बनते. बायरमध्ये आम्ही भारतीय शेतकऱ्यांना नावीन्यपूर्ण आणि शाश्वत उपायांनी सक्षम करण्यासाठी वचनबद्ध आहोत. कॅमलससोबत आम्ही नव्या पिढीचे कीटकनाशक आणत आहोत . ते फक्त कीटक व्यवस्थापन मजबूत करत नाही तर भारत आणि जगासाठी लवचिक, उच्च-गुणवत्तेची भाजीपाला मूल्य साखळी तयार करण्यातही योगदान देते.

## राशीभविष्य

**मेष :** आज कामाच्या ठिकाणी अनावश्यक वाद टाळा, कारण सहकाजयाशी मतभेद होण्याची शक्यता आहे. वातावरण कधीकधी आनंदी, तर कधीकधी तणावपूर्ण असू शकते. तुमचे उत्पन्न वाढेल.

**वृषभ :** तुम्हाला सामाजिक कार्यात रस असेल. व्यवसायात गुंतलेल्यांना चढ-उतारांचा सामना करावा लागेल. धीर धरा, संयम राखा. रागावर नियंत्रण ठेवा. घाईघाईत नवीन व्यवसाय सुरू करू नका.

**मिथुन :** आज, तुमच्या आनंदी वागण्यामुळे घरात एक अद्भुत वातावरण निर्माण होईल. या राशीच्या नोकरदारांसाठी हा दिवस अनुकूल, लकी असेल. योग्य नियोजन करण्यात यशस्वी व्हाल.

**कर्क :** प्रेमसंबंधात अनावश्यक वाद टाळा, कारण यामुळे तणाव निर्माण होऊ शकतो. कुटुंबातील सदस्यांसह एखाद्या शुभ कार्यक्रमात सहभागी होण्याची संधी तुम्हाला मिळू शकते.

**सिंह :** आज कुटुंबातील वातावरण आनंददायी असेल. मोठ्या व्यवसायातून तुम्हाला आर्थिक फायदा होईल. तुम्ही तुमची कामे पूर्ण करण्यात खूप व्यस्त असाल. तुमच्या व्यवसायात नफा अपेक्षित आहे.

**कन्या :** सामाजिक कार्यात तुमच्या क्षमतेनुसार काम करा. आजचा दिवस तुमच्यासाठी थोडा संघषार्चा असेल. कामाच्या ठिकाणी गोष्टी सुरू होऊ शकतात, व्यत्यय येऊ शकतो. विवेकाने वागा.

**तुळ :** अज्ञात कारणांमुळे महत्त्वाच्या कामाच्या योजना पुढे ढकलल्या जाऊ शकतात. तुमच्या नशिबाचा तारा चमकेल. कठोर परिश्रमाचे फायदे मिळतीले. नोकरीत बदल आणि पदोन्नती शक्य आहे.

**वृश्चिक :** आरोग्याच्या दृष्टीने, तुम्हाला ताजेतवाने वाटेल. रसायनशास्त्राच्या विद्यार्थ्यांना हा दिवस फायदेशीर वाटेल. आयटीच्या विद्यार्थ्यांना आज नोकरीची ऑफर देखील मिळू शकते.

**धनु :** आज तुम्हाला मित्रांकडून काही चांगले सल्ले मिळतील. तुम्ही अनोळखी लोकांवर विश्वास ठेवणे टाळावे. गरजूंना मदतीचा हात पुढे कराल, ज्यामुळे त्यांचे जीवन सोपे होईल.

**मकर :** आज तुम्ही तुमच्या व्यवसायात नवीन नियोजन करून काम कराल. तुम्हाला चांगले आर्थिक लाभ होतील, ज्यामुळे व्यवसायाचे कामकाज सुरळीत होईल. रेस्टॉरंट व्यवसायात लक्षणीय नफा मिळेल.

**कुंभ :** शत्रू तुमच्याशी स्पर्धात्मक वृत्तीने वागतील. शिक्षण, आर्थिक आणि कृषी क्षेत्रात काम करणाजयांना फायदेशीर संधी मिळतील. बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये नोकरी शोधणाजयांना नोकरी मिळण्याची शक्यता आहे.

**मीन :** आज तुम्हाला तुमच्या प्रियजनांकडून आर्थिक मदत मिळेल. तुमच्या कारकिर्दीत तुमच्या वरिष्ठांकडून तुम्हाला मदत मिळेल. तुम्हाला नकारात्मक विचार टाळावे लागतील. आजचा दिवस छान जाईल.

# भक्तिमार्ग

## तयारी आदिशक्तीच्या जागराची

**नवरात्रोत्सवाची ओढ साऱ्यांनाच असते. अतिशय भक्तीभावाने आणि श्रध्देने साजरा केला जाणारा हा उत्सव. याच्या तयारीसाठी महिलावर्ग काही दिवस आधीपासूनच सज्ज असतो. घरादाराच्या स्वच्छतेपासून याची सुरूवात होते. नऊ दिवसांचे उपवास, देवीच्या स्त्रोत्रांचे पठण, गोंधळ्यांचा जागर आणि सर्वत्र आई राधा उदो, उदोचा जयघोष यामुळे वातावरण भारलेलं असतं. शक्तीच्या या उपासनेविषयी...**



विशेष लेख

श्रीगणेशाला भावपूर्ण निरोप दिल्यानंतर पितृपंधरवड्याला सुरूवात होते आणि याच काळात सर्वांना वेध लागतात नवरात्रोत्सवाचे. अतिशय भक्तीभावाने आणि श्रध्देने साजरा केला जाणारा हा नवरात्रोत्सव. या उत्सावाची नऊ दिवस मोठी धामधूम पहायला मिळते. एरव्ही एखाद्या दिवसाचा सणवार करायचा तर त्याची बरीच तयारी करावी लागते. मग नवरात्रासारखा नऊ दिवसांचा उत्सव साजरा करण्यासाठी अधिक तयारी करावी लागणं साहजिक आहे. अर्थातच, या तयारीचे वेध स्त्री वर्गाला आधीपासून लागलेले असतात. नवरात्राच्या तयारीला सुरूवात होते ती घरादाराच्या स्वच्छतेपासून. नवरात्राच्या निमित्ताने घराला आवर्जून रंगरंगोटी केली जाते. ग्रामीण भागात अजुनही मातीची घरं आहेत त्या ठिकाणी घर शेणा–मातीनं सारवली जातात. घरादाराच्या स्वच्छतेत हा भाग तर महत्त्वाचा असतोच. शिवाय घरातील भांडी, कपडे यांचीही स्वच्छता आवर्जून केली जाते. एरव्ही आपण केवळ रोजची भांडी आणि रोज वापरायचे कपडे यांच्याच स्वच्छतेवर भर देत असतो. कधी सुट्टीच्या निमत्ताने चार–दोन अधिक कपडे धुवायला घेतले जातात. परंतु संपूर्ण कपडे, सर्व भांडी धुवायची तर त्यासाठी नवरात्रोत्सव महत्त्वाचा ठरतो. हल्ली बहुतांश स्त्रिया नोकरी वा व्यवसायानिमित्त घराबाहेर असतात. सुट्ट्याही पहिल्यासारख्या नसतात. त्यात घरातील रोजची कामं करतानाही नाकी नऊ येतात. शिवाय छोटं कुटुंब असेल तर त्यातील स्त्रीला एकटीला संपूर्ण कपडे धुणं किंवा संपूर्ण भांडी घासणं शक्य होत नाही. मग ही कामं अन्य कोणाकडून तरी करून घेतली जातात. परंतु त्याही कामावर मर्यादा येत असल्याचं दिसून येतं. अर्थात, स्वच्छता किती झाली यापेक्षा त्यामागील उद्देश महत्त्वाचा ठरतो.

खरं तर हल्ली सण–उत्सवाची खऱ्या अर्थाने जाणीव होते ग्रामीण भागात. या भागात आपले पारंपरिक सण साजरे होताना पाहणे हा एक वेगळाच आनंद असतो. पावसामुळे सर्वत्र चांगला पाणीसाठा झालेला असतो. नद्या, ओढे वाहत असतात. शेत–शिवार हिरवाईने नटलेले असतात. अशा या उत्साही वातावरणात नवरात्रीच्या तयारीचा उत्साह आणखी वाढतो. नवरात्र सुरू होण्याच्या काही दिवस आधी गावाजवळील ओढ्यावर, नदीवर, तळ्याकाठी वा आपापल्या शेतात बहुतांश स्त्रिया एकत्र येतात. येताना घरातील सर्व कपडे धुण्यासाठी सोबत आणलेले असतात. वाहत्या, मोकळ्या पाण्यात सर्व जणी एकमेकींच्या सहकार्याने कपडे धुण्याचा कार्यक्रम पार पाडतात. धुतलेले कपडे काठावर लगेच वाळत घातले जातात. या ठिकाणी लवकर येणे, येताना जेवणाचा डबा बरोबर आणणे, मध्ये जेवण आणि थोडी विश्रांती, नंतर सायंकाळी धुवून वाळवलेले सर्व कपडे घेऊन घराकडे परतणं हा ठरलेला कार्यक्रम असतो. आज शहरांलगतच्या धरणांच्या पाणीसाठ्यालगत अशाच प्रकारे गर्दी पहायला मिळते. पुरेशी स्वच्छता झाल्याशिवाय नवरात्राचं पुरेपूर समाधान मिळत नाही, अशी अनेक स्त्रियांची भावना असते.

दुसरीकडे या दिवसात शेतांमध्ये पीक तरारून आलेलं असतं. झेंडूची शेती बहरलेली असते. नवरात्रात झेंडूला चांगली मागणी असल्याने या कालावधीत फुलं उपलब्ध व्हावीत, असं शेतकऱ्यांचं नियोजन असतं. त्यानुसार झेंडूच्या फुलांची काढणी, ती बाजारात नेणे, यासाठी लगबग सुरू असते. नवरात्रात घरोघरी घट बसवले जातात. या घटाचं महत्त्व मोठं आहे. या घटासाठी पवित्र ठिकाणची माती आणून त्यात गहू, हरभरे, जोंधळे, भात, जवस, सातू, राळे, उडीद, मका अशी सात धान्यं पेरायची. त्यावर कलश ठेवायचा. कलशात सप्त नद्यांचं पाणी भरायचं. पाण्यात सोनं, चांदी, मोती, प्रवाळ, चांदीचं–तांब्याचं नाणं घालायचं. हळद–कुंकू, गंध, फूल, अक्षता, सुपारी वहायची. घटावर अंबेची प्रतिष्ठापना करायची. रोज नव्या फुलांची माळ देवीच्या मस्तकी रूळेल अशी सोडायची. नऊ दिवस रोज नवी माळ. देवी एकदा स्थानापन्न झाली की तिला नऊ दिवस, नऊ रात्र हलवायची नाही. रोज सवाष्ण जेवू घालायची. देवीचं वैशिष्ट्य असं की ती नऊ दिवस आणि नऊ रात्र झोपत नाही. अर्थातच भक्तानेही नव–रात्र जागरण करायचं. नऊ दिवस उपवास करायचा. परंपरेनुसार अहोरात्र तेलाचा वा तुपाचा नंदादीप देवीसमोर तेवत ठेवायचा. प्रत्येकाच्या चालीरितीनुसार यात थोडाफार फरक असेल. पण मूळात ही पूजा सृजनाची, निर्माणशक्तीची !

ही देवी आदिमाता आहे. देवांनाही ङ्गत्राहि मामङ्क करुन सोडणाऱ्या महिषासुराचा वध करण्यास ती सिद्ध झाली आहे. तिचं रूपडं पहा. ती अष्टभुजा आहे. शिवाने दिलेले त्रिशूळ, विष्णूने दिलेले सुदर्शन चक्र, वायुदेवाने दिलेले धनुष्य आणि बाणांचा भाता, अग्निदेवाने दिलेली गदा, महाकाळाने दिलेली तलवार, यमाने दिलेली ढाल, इंद्राने दिलेला अंकुश, वरूणदेवाने दिलेला नागपाश आणि विश्वकर्म्याने दिलेली कुऱ्हाड अशी आयुधे आपल्या आठ हातांमध्ये घेऊन ती असुराचा नाश करण्यास सिद्ध आहे. सर्व शक्तींचे प्रतीक असलेला सिंह हेच तिचे वाहन आहे. हीच आदिमाता गावोगावी वेगवेगळ्या नावाने पुजली जाते. कोलकत्यातील दुर्गा किंवा कालीमातेचा नवरात्रोत्सव खूप जल्लोषात साजरा होतो. गोव्यात शांतादुर्गा, म्हाळसा, कामाक्षी इत्यादी देवींच्या मंदिरात नवरात्रोत्सव खूप वेगळ्या रुपात साजरा होतो. महाराष्ट्रात अनेकांची कुलदैवत असलेली कोल्हापूरची महालक्ष्मी, रेणापूरची रेणुकामाता, तुळजापूरची तुळजाभवानी ही देवीची तीन शक्तीपीठे आणि वणीची सप्तशृंगनिवासिनी जगदंबा हे देवीचे अर्धे शक्तीपीठ अशी साडेतीन शक्तीपीठे महाराष्ट्रात महत्त्वाची मानली जातात. त्या ठिकाणचा नवरात्रोत्सव बहारदार असतो. अमरावती, नागपूर, चंद्रपूर याबरोबरच आदिमातेची मंदिरे आहेत तिथे नवरात्रोत्सव जल्लोषात साजरा होतो. मंगलदायिनी, तेजस्विनी, रुद्रावतारी मर्दिनी अशी ही आदिशक्ती ! हिचं प्रत्येक रूपच मुळी पूजनीय ! कधी दुर्गा, कधी भवानी तर कधी गौरी म्हणून ही जगन्माता पूजली जाते. गुर्जर समाजातही रात्री गरबा, रासक्रीडा खेळून नवरात्री जागवल्या जातात. आपल्याकडे नवरात्रीचे नऊ दिवस सासुरवाशिणी, माहेरवाशिणी एकत्र येऊन हादग्याचा फेर धरतात. हत्तीची तसबीर मध्ये ठेवून किंवा हत्तीचे चित्र किंवा हत्तीची रांगोळी काढून त्याची पूजा करतात. त्यामागे हस्त नक्षत्राची पूजा करण्याचा उद्देश आहे. मुली, बायका फेर धरतात. फेर धरता धरता खास हादग्याची गाणी म्हणतात. गाणी म्हणून झाल्यावर प्रत्येकाने आणलेली खिरापत ओळखली जाते. ही खिरापत सर्वजणी मिळून एकत्र बसून खातात. यातील गाण्यांची रचना कथात्मक असते. घरात घडणाऱ्या घटनांचे ते वर्णन असते. त्यात पूर्वीच्या काळातील स्त्रीमनाचे भावविश्व उलगडून दाखवलं जातं. माहेरचं ओतप्रोत कौतुक आणि सासरचं काहीसं विरोधी चित्रण असतं. त्यात काहीशी अतिशयोक्ती असते. मैत्रिणींचं चिडवणं, हसरे–बोचरे चिमटे, सासू–सुनांचे रूसवे–फुगवे यात असतात. एकंदर हादग्याच्या गाण्यांची अशी वेगळीच मजा आहे.

खरं तर आजच्या घडीला स्त्रीची असलेली बलस्थाने, तिचं कर्तृत्व, तिच्यातील अनेकांगी सुप्त शक्ती वारंवार प्रत्ययास येऊनही या स्त्रीलाच कुटुंबात, समाजात तिच्या इतमामाप्रमाणे आदरणीय स्थान देण्यास आपण का कचरतो, याचा विचार या निमित्ताने व्हायला हवा. बाराही महिने स्त्रीत्वाचा आदर करण्याचा जागर मनामनात होणं हेच खरं आधुनिक नवरात्रीचं फलित असावं.

## मोक्षलक्षण

दासबोधातून...



आठव्या दशकातल्या सातव्या समासात समर्थांनी मोक्षलक्षणांबद्दल सांगितलं आहे. मनुष्यप्राण्याला मोक्षप्राप्ती हवी असते. जन्म–मरणाच्या बंधनातून सुटण्यासाठी मोक्ष मिळवणं गरजेचं असतं. हा मोक्ष म्हणजे नेमकं काय याचं सार्थ वर्णन श्री समर्थ रामदास करतात. सातव्या समासातल्या प्रत्येक ओवीतून त्यांनी या जगात आलेला जीव कसा वागतो आणि त्याने मोक्षप्राप्तीसाठी नेमकं काय करायला हवं याचं वर्णन केलं आहे.

प्राणी संकल्पे बांधला। जीवपणे बद्ध झाला। तो विवेके मुक्त केला। साधुजनी।।४।।

प्राणी संकल्पाने बांधला जातो आणि जीवपणे बद्ध होतो. त्याला साधुलोक, संतजन विवेकाने मुक्त करतात. म्हणजेच साधुसंतांच्या सहवासात राहिल्याने जीव अनेक बंधनांपासून मुक्त होतो, विवेकी होतो.

मी जीव ऐसा संकल्प। दृढ धरिता केले कल्प। तेणे प्राणी जाला अल्प। देहबुद्धीचा।।५।। मी जीव मज बंधन। मज आहे जन्ममरण। केल्या कर्माचे फळ आपण। भोगीन आता।।६।। पापाचे फळ ते दुःख। आणी पुण्याचे फळ ते सुख। पापपुण्य आवश्यक भोगणे लागे।।७।।

मी जीव आहे ऐसा संकल्प आणि दृढनिश्चय करून युगेच्या युगे लोटली आहेत. असा विचार केल्याने मनुष्यप्राणी अल्पज्ञ देहबुद्धीचा झाला आहे. मी जीव आहे, मला बंधन आहे. मला जन्म–मरण आहे. पूर्वी केलेल्या कर्माचं फळ मी आता भोगणार आहे. पापाचं फळ दुःख तर चांगल्या कर्मांचं, पुण्याचं फळ सुख असतं. आपल्या प्रारब्धाप्रमाणे आणि कर्माप्रमाणे पाप–पुण्य भोगावंच लागतं. समर्थांनी या समासात पाप आणि पुण्य या संकल्पनांवर भर दिला आहे. मनुष्य कर्माची फळं भोगतो हे सत्य समर्थ अधोरेखित करतात.

## स्वतःकडून ठेवा अपेक्षा...

भक्ती बोध

त्याने हे केलं नाही, तो नेहमी असाच वागतो, तिने असं करायला नको होतं, मीच नेहमी इतरांसाठी झटत असते असा विचार करून अनेकजण दुःखी होतात. आपण इतरांसाठी बरंच काही करतो, इतरांच्या मदतीसाठी धावतो. पण आपल्यावर वेळ आली की आपल्यासाठी कोणीही येत नाही हे शल्य मनात कायम असतं. पण, आपल्या मर्जीने किंवा आपल्या अपेक्षेप्रमाणे कोणीची चालत नाही. मुळात अशी अपेक्षा करणंच चुकीचं आहे. इतरांकडून अपेक्षा करणं म्हणजे वेळ वाया घालवणं. एका कथेद्वारे आपण हे जाणून घेऊ.

एकदा कासवाचं एक कुटुंब सहलीला निघालं. या कुटुंबाने पोटपूजेची सगळी व्यवस्था केली होती. सगळं सामान त्यांनी बांधून घेतलं आणि मजल दरमजल करत सगळे निघाले. सहलीच्या ठिकाणी पोहोचल्यानंतर सगळ्यांनी जेवण बाहेर काढलं. आपण सगळं आणलं



पण मीठ आणायला विसरलो, असं त्यांच्या लक्षात आलं. कुटुंबातल्या सर्वात छोट्या सदस्याला त्यांनी मीठ आणायला पाठवलं. पण ङ्गमी येईपर्यंत तुम्ही सगळं अन्न खाऊ न टाकालङ्क असं म्हणत तो जायला तयार होईना. सर्व सदस्यांनी त्याला विश्वासात घेतलं. ङ्गतू आल्याशिवाय आपण अन्न खाणार नाहीङ्क असं सांगितलं. छोटं कासव निघालं. बराच वेळ झाला तरी कासवाचा पत्ता नव्हता. बरीच वाट बघितल्यानंतर सर्वांनी जेवून घ्यायचं ठरवलं. गाठोडी सोडायला घेणार तेवढ्यात ते छोटं कासव शेजारच्या झाडीतून बाहेर आलं आणि म्हणालं, मी आलो नाही तर तुम्ही जेवून घेणार हे मला माहित होतं. त्यामुळे मी गेलोच नाही आणि आता जाणारही नाही. आपल्यातले अनेकजण या संशयी कासवाप्रमाणे असतात. इतरांनी आपल्या मर्जीने वागावं असं त्यांना वाटत असतं पण प्रत्यक्षात असं होत नसतं. आपण योग्य काम करण्याऐवजी इतरांकडून अपेक्षा ठेवतो. आपली कामं इतरांवर सोपवतो. इतरांनी असं वागायला हवं, तसं वागायला हवं असा विचार करून आपण दुःखी होतो. इतरांकडून अपेक्षा ठेवण्याऐवजी स्वतःवर विश्वास ठेवा. स्वतःकडून अपेक्षा ठेवा आणि त्या पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. यातून तुम्ही आनंद मिळवू शकाल.

## श्राद्धकर्मांसाठी पवित्र तीर्थस्थानं

तीर्थक्षेत्र

आज सर्वपित्री आमावस्या आहे. पितृपंधरवड्यात पितरांचं पिंडदान, श्राद्ध, तर्पण केलं जातं. देशभरातल्या विविध तीर्थस्थानी श्राद्धादी कार्य केली जातात. पण काही स्थानांचं वेगळं महत्त्व आहे. देशभरातली आठ तीर्थस्थानं ही श्राद्धकर्मांच्या दृष्टीने महत्त्वाची मानली जातात. या स्थानांची ओळख...

* महाराष्ट्रात खामगावपासून ७५ किलोमीटर अंतरावर मेघंकर हे तीर्थस्थान आहे. ब्रह्मपुराण, पद्मपुराण



यासारख्या ग्रंथांमध्ये या तीर्थस्थानाचं वर्णन करण्यात आलं आहे. या स्थानी श्राद्धकर्म केल्याने पितरांना मोक्ष मिळतो असं म्हणतात. या स्थानी भगवान विष्णूचं एक प्राचीन मंदिर आहे. या मंदिरात विष्णूची ११ फूट उंच पाषाणमूर्ती आहे.

* उत्तराखंडमधलं ब्रह्मकपाल हे श्राद्धकर्मांसाठी अत्यंत पवित्र असं स्थान मानलं जातं. हे स्थान बद्रीनाथच्या जवळ आहे. या स्थानाजवळून अलकनंदा नदी वाहते.

* कर्नाटकमधल्या लक्ष्मणबाण या स्थानी श्रीरामाने दशरथाचं श्राद्ध केलं होतं. या ठिकाणी लक्ष्मणाने बाण मारून कुंड तयार केलं होतं. याला लक्ष्मण कुंड असं म्हटलं जातं. या ठिकाणी रामाचं मंदिरही आहे. अत्यंत प्राचीन असं हे तीर्थस्थान श्राद्धकर्मांच्या दृष्टीने पवित्र मानलं जातं.

* मध्य प्रदेशातल्या क्षिप्रा नदीच्या किनाऱ्यावर सिद्धनाथ नावाचं तीर्थस्थान आहे. या ठिकाणी एक वटवृक्ष आहे. हा वृक्ष पार्वती देवीने लावला होता असं मानलं जातं. या स्थानी श्राद्धकर्मं केली जातात.

* राजस्थानमध्ये लोहागर नावाचं एक स्थान आहे. या स्थानाचं रक्षण ब्रह्मदेव करत असल्याचं मानलं जातं. या स्थानी श्राद्ध केल्यानंतर पितरांना मोक्ष मिळतं, असं मानलं जातं.

* बिहारमधल्या गयामध्ये श्राद्धकर्मं केली जातात. गया फल्गु नदीच्या किनारी वसलं आहे. या स्थानाचं वर्णन रामायणातही करण्यात आलं आहे. या स्थानी पिंडदान केल्याने पूर्वजांना वैकुंठाची प्राप्ती होते असं म्हटलं जातं.

* उत्तर प्रदेशमधलं प्रयाग स्थान प्रसिद्ध आहे. या स्थानी श्राद्धकर्मं मोठ्या संख्येने केली जातात. प्रयागला त्रिवेणीसंगम आहे. या स्थानी श्राद्ध केल्यानंतर मनुष्य जन्म–मृत्यूच्या बंधनातून मुक्त होतो असं म्हणतात.

* गुजरातमध्ये पिंडारक नावाचं स्थान आहे. हे स्थान द्वारकापासून सुमारे ३० किलोमीटर अंतरावर आहे. महाभारतातील युद्धानंतर पांडवांनी या स्थानी येऊन आप्तांचं श्राद्ध केलं होतं असं म्हणतात. या स्थानी केलेलं श्राद्ध मोक्षदायी मानलं जातं.

## अग्निहोत्र करताना...

परंपरा

हिंदू धर्मातल्या विविध परंपरांपैकी एक म्हणजे अग्निहोत्र. अग्नी हा पंचमहाभूतांपैकी एक. अग्नीला अत्यंत पवित्र मानलं जातं. अग्निहोत्राच्या माध्यमातून सूर्य आणि चंद्राद्वारे प्राप्त होणाऱ्या उच्च शक्तीयुक्त ब्रह्मांड ऊर्जेला योग्य पद्धतीने ग्रहण करता येऊ शकतं. अग्निहोत्राशी संबंधित बरंच संशोधनही करण्यात आलं आहे. अग्निहोत्र सूर्योदय आणि सूर्यास्ताच्या वेळी करायला हवं. अग्निहोत्राची वेळ साधण्यासाठी पंचागाची मदत घेता येऊ शकते.



अग्निहोत्र करताना...

सूर्योदय तसंच सूर्यास्ताच्या वेळी गायीच्या तुपात बुडवलेल्या अक्षता अग्नीमध्ये अर्पण केल्या जातात. यज्ञ करण्यासाठी तांब्याच्या चौकोनी भांड्यात अग्नी प्रज्वलीत केला जातो. यात गोवऱ्यांचा वापर केला जातो. अग्नीमध्ये दोनदा आहुती देताना वेदमंत्रांचा जयघोष केला जातो. सूर्योदय आणि सूर्यास्ताच्या वेळी म्हणायचे दोन मंत्र आहेत.

सूर्याय स्वाहा सूर्याय इदम न मम, प्रजापतये स्वाहा प्रजापतये इदम न मम हा मंत्र सूर्योदयाच्या वेळी म्हटला जातो. तर अग्नये स्वाहा, अग्नये इदम न मम, प्रजापतये स्वाहा प्रजापतये इदम न मम हा मंत्र सूर्यास्ताच्या वेळी म्हटला जातो.

अग्निहोत्रासाठी तांदूळ, गायीचं शुद्ध तूप, अर्ध पिरॅमिडच्या आकाराचं तांब्याचं पात्र आणि गोवऱ्या या वस्तूंची गरज असते. अग्निहोत्रामुळे आसपासचं वातावरण पवित्र होतं. अग्निहोत्रामागे वैज्ञानिक दृष्टीकोनही आहे. त्यामुळे नियमितपणे अग्निहोत्र करायला हवं.

## श्राद्ध करणं शक्य नसेल तर!

जाणून घ्या



श्राद्ध करण्याची एक विशिष्ट पद्धत आहे. धर्मशास्त्रात नमूद केल्याप्रमाणे श्राद्धकर्म केल्याने मृतात्म्याला शांती मिळते तसंच मृताच्या कुटुंबियांनाही दीर्घायुष्याचा लाभ होतो पण अनेकदा अशी श्राद्धकर्म करणं शक्य होत नाही. यामागे आर्थिक किंवा इतर काही कारणं असू शकतात. अशा वेळी काही पद्धतींनी तुम्ही पितरांना खूश करू शकता. या पद्धतींविषयी...

* श्राद्धकर्म करताना गुरुजींना संपूर्ण भोजन देणं शक्य नसेल तर कणिक, फळं, साखर, गूळ, भाज्या असे पदार्थ देता येतील. यासोबत दान म्हणून काही रक्कम देता येईल.

* आर्थिक चणचण असूनही श्राद्ध करण्याची इच्छा असेल तर पाण्यात काळे तीळ अर्पण करा. तसंच काळे तीळ घातलेले पदार्थ दान करा. या कृतीमुळे श्राद्धाचं पुण्य मिळू शकतं.

* श्राद्ध करणं शक्य नसेल तर गायीला चारा घालावा. यावेळी आपल्या पूर्वजांचं स्मरण करावं.

* यापैकी काहीही शक्य नसेल तर सूर्यदेवाला मनोभावे नमस्कार करावा. काही अडचणींमुळे श्राद्धकर्म करणं शक्य नसल्याचं सांगून आपला निरोप पूर्वजांपर्यंत पोहोवण्याची विनंती सूर्यदेवाला करावी. आपण पूर्वजांचं सतत स्मरण करतो, त्यांची उणीव भासते, त्यांच्यावर आपलं मनापासून प्रेम आहे असा संदेश त्यांच्यापर्यंत पोहोचवण्याची विनंती सूर्यदेवाला करावी. या साध्याशा कृतीमुळे पूर्वज समाधानी होतील, असं म्हटलं आहे.

## खरं आयुष्य जगण्यासाठी...

स्व मदत

घाई आणि काळजी या दोन्ही गोष्टी आपल्यासाठी मारक आहेत. पण असं असूनही या दोन्ही गोष्टी काही सुटत नाहीत. आपल्याला सतत कशाची तरी काळजी वाटत असते. तसंच आपण आपल्या कामांमध्ये घाई करत असतो. आपला आनंद नेमका कशात आहे हे जेसच्या कथेतून समजून घेऊ.

जेस खूप चांगली नोकरी करत होती. तिला मनासारखी नोकरी मिळाली होती. नोकरीनिमित्ताने तिला प्रवास करावा लागे. छान कपडे घालत असे. समारंभांना जात असे. तिचं आयुष्य अगदी उत्तम चाललं होतं. कसलीही कमतरता नव्हती. पण, सगळं असूनही ती आनंदी नव्हती. आयुष्यात कशाची तरी कमतरता आहे असं तिला वाटत असे. ती सतत तणावाखाली असायची. तिला कसली तरी घाई असायची. याबाबत तिने आत्मचिंतन करायचं ठरवलं. आपण भौतिक गोष्टींमध्ये आनंद शोधत असल्याचं तिला जाणवलं. २०१२ मध्ये ती खूप आजारी पडली. त्याच वर्षी तिच्या वडिलांचं आणि बहिणीचं कर्करोगाने निधन झालं. या घटनांनी ती पुरती हादरली. तिने स्वतःमध्ये डोकावून पहायचं ठरवलं.

आपण कशाच्या मागे धावत आहोत? आपल्याला आयुष्याकडून नेमकं काय हवं आहे, असे प्रश्न तिने स्वतःला विचारले. आयुष्यात विशिष्ट उंची गाठण्याच्या नादात आपण आयुष्यच जगलो नाही हे तिला जाणवलं. ती कायम तणावाखाली असायची. कसली तरी काळजी तिला लागून राहिलेली असायची. तिला ताण होता. हे सगळं कशासाठी, असा प्रश्न तिला पडला होता. मग तिने एक पाऊल उचलायचं ठरवलं. जेसने नोकरी सोडली. यामुळे ती स्वतःच्या देशात राहू शकणार होती. आता ती खूप आनंदी आहे. जीवनाचं खरं मूल्य तिला जाणवलं आहे. भौतिक गोष्टींमध्ये सुख नसतं हे तिला पटलं आहे.



आयुष्य म्हणजे फक्त वस्तू खरेदी करणं आणि कशाच्या तरी मागे सतत पळत राहणं नाही हे जाणून घ्या. आयुष्याचा अनुभव घ्यायला हवा. आपल्याला आवडणाऱ्या गोष्टी करायला हव्यात. आयुष्य जपायला हवं तसंच त्याचा आनंदही घ्यायला हवा. घाई हे काळजीचं मुख्य कारण आहे हे आपण जाणतो. तरी आपण घाई आणि काळजी करतो. या नादात आपण आयुष्यातले अनमोल क्षण वाया घालवतो. असं होता कामा नये. आयुष्य खऱ्या अर्थाने जगायला शिकलं पाहिजे.

# दामोदर कुठे यांचा सत्कार



■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. २० :

तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा कोहळा येथील शिक्षक दामोदर कुटे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. त्यामुळे संपूर्ण तालुक्यातुन त्यांना कौतुकाची थाप दिली जात आहे. शिक्षक दरवर्षी जिल्हा परिषदेकडून प्रत्येक तालुक्यातून एका शिक्षकाची निवड आदर्श शिक्षक म्हणून केली जाते आणि शिक्षक दिनानिमित्त त्याचा सत्कार जिल्हा परिषद पुरस्कार देण्यात येते. यावर्षी काटोल तालुक्यातुन जि. प. प्रा. शाळा कोहळा येथे कार्यरत असलेले दामोदर कुटे यांना हा पुरस्कार मिळाला.

याचेच औचित्य साधून संपूर्ण कोहळा ग्रामवासीयांनी आदर्श शिक्षक दामोदर कुटे सह शिक्षण विभाग पंचायत समिती काटोल यांचा भव्य सत्कार आयोजन केले. यामध्ये योग्य शिक्षकांची निवड केल्याबद्दल गटशिक्षणाधिकारी जावेद इक्बाल, विस्तार अधिकारी संजय चिखले व नरेंद्र बोढाळे तसेच केंद्रप्रमुख रमेश गाढवे, सहायक शिक्षक गजानन गणोरकर यांच्यासह अंगणवाडी सेविका व मदतनीस तसेच सर्व पर्यवेक्षकीय चमू चा कोहळा गावाकडून सत्कार आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक केंद्रप्रमुख रमेश गाढवे यांनी तर संचालन वनिता राऊत व योगेश पराते यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता करीता ग्रामपंचायतीचे सरपंच संजय धुर्वे, उपसरपंच तथा सरपंच संघटनेचे अध्यक्ष प्रमोद ठाकरे व ग्रा.पं.सचिव कु.डाखोळे, माजी सरपंच तथा समाजसेवक दुर्योधनजी ठाकरे, गावाचे पोलीस पाटील संदीप ठाकरे, शा. व्य. समितीच्या अध्यक्ष मनीषाताई ठाकरे तसेच शालेय व्यवस्थापन समितीतील सर्व मान्यवर सदस्य गण आणि ढवळापुर, मेंटपांजरा, झिल्पा केंद्रातील सर्व मुख्याध्यापक शिक्षक, महिला भगिनी उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता शिक्षक श्री. सुनील वंजारी व घनश्याम भडांगे यांनी प्रयत्न केले. याप्रसंगी गावातील समस्त नागरिक व महिला भगिनींची उपस्थिती होती.

# महादुला येथे पाणंद रस्ते मोहीम आणि भंडारबोडीत भुखंड पट्टे वाटप

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. २० :

शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्मदिन दि. १७ सप्टेंबर २०२५ ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती दि. २ ऑक्टोंबर २०२५ पर्यंतच्या कालावधीमध्ये "सेवा पंधरवाडा " राज्यभर राबविण्यात येत आहे. दि. १७ सप्टेंबर २०२५ ते २२ सप्टेंबर २०२५ या कालावधीत पहिला टप्पा "पाणंद रस्तेविषयक मोहिम " रामटेक तालुक्यात सुरू असून रस्त्याचे सर्वेक्षण करणे व पांधन रस्त्याची मोजणी, सिमांकन व चिन्हांकित करण्याची कार्यवाही सुरू आहे.

याप्रसंगी आज दि. २० सप्टेंबर ला



नागपूर जिल्हाधिकारी विपीन इटनकर यांनी रामटेक तालुक्यातील ग्रामपंचायत कार्यालय महादुला येथे प्रत्यक्ष भेट दिली. सेवा पंधरवाडा अंतर्गत पहिला टप्पा "पाणंद रस्तेविषयक मोहिम " अंतर्गत जिल्हाधिकारी विपिन इटनकर यांनी मौजा महादुला येथील पांधन रस्त्याची पाहणी केली व रोवरव्दारे भुमी अभिलेख विभागामार्फत पांधन मोजणीचे व सिमांकन करण्यात आले तसेच मोजणी केलेल्या पांधन रस्त्याच्या दुतर्फा वृक्षरोपन करण्यात आले.

त्यानंतर जिल्हाधिकारी विपिन इटनकर यांनी भंडारबोडी ग्रामपंचायत अंतर्गत सालईमेटा या गावाला भेट दिली. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत "सर्वांसाठी घरे-२०२२ " मौजा सालईमेटा येथील रहिवासी प्रयोजनसाठी शासकीय जमिनीवरील केलेले अतिक्रमणे नियमानुकूल करून जागेचे भुखंड पट्टे लाभार्थ्यांचे घरी जावून लाभार्थ्यांची भेट घेवून वितरीत करण्यात आले.

यावेळी जिल्हाधिकारी विपिन इटनकर,उपविभागीय अधिकारी प्रियेश महाजन,तहसीलदार रमेश कोळपे, गट विकास अधिकारी जयसिंग जाधव,देवलापार अपर तहसीलदार पुनम कदम, माजी जि.प.सदस्य संजय झाडे,महादुला सरपंच शरद डडूरे,भंडारबोडी सरपंच सुनिता मिसार, ग्रा.पं.सदस्य तथा माजी सरपंच महेंद्र दिवटे सह आदी ग्रामपंचायत सदस्य, महसुल विभागांतील नायब तहसीलदार भोजराज बडवाईक, नायब तहसिलदार अमित निबांळकर,नायब तहसिलदार महेश कुलदीवार,मंडळ अधिकारी भुषन निखाडे, सहा. गटविकास अधिकारी मारोती भुजाडे, ग्राम महसुल अधिकारी महादुला पाटील, ग्राम पंचायत अधिकारी ठवरे,भंडारबोडी ग्रामपंचायत अधिकारी पंजाब चव्हाण तसेच महादुला व भंडारबोडी येथील समस्त नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# किट्स (स्वायत्त) चा ४० वा वर्धापन दिवस संपन्न

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. २० :

कविकुलगुरू इंस्टिटयूट ऑफ टेक्नॉलाजी अण्ड सायंस (किट्स) युजीसी स्वायत्त महाविद्यालय रामटेकचा ४० वा वर्धापन दिवस १९ सप्टेंबरला किट्सच्या सिल्व्हर जुबली हॉल मध्ये संपन्न झाला.या वेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दिवंगत व्ही. राजेश्वरराव यांना अभिवादन करण्यात आले. दीप प्रज्वलन करून वर्धापन दिवसाचे उद्घाटन प्रमुख वक्ते व व्हीएनआयटी नागपूरचे प्रा.डॉ राहुल रालेगांवकर यांचे हस्ते झाले. कार्यक्रमाची अध्यक्षता प्राचार्य डॉ. अविनाश श्रीखंडे यांनी केली. या वेळी प्रामुख्याने आयक्यूएसी चे डीन डॉ. यशवंत जिभकाटे, विद्यार्थी डीन डॉ. पंकज आष्टणकर, विद्या विभाग डीन डॉ. विलास महात्मे सहीत विविध विभागाचे डीन,विभाग प्रमुख, प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येत उपस्थित होते.

प्रमुख वक्ते डॉ. राहुल रालेगांवकर यांनी ग्रामिण ते जागतीक अभियांत्रिकी



शिक्षणातील परिवर्तन या विषयावर व्याख्यान दिले. ते म्हणाले की शिक्षणातून भविष्याची भक्कम पायाभरणी झाली पाहीजे. विद्यार्थ्यांनी सतत स्टार्टअप व संशोधन केले पाहीजे. संशोधन हे जनकल्याण करीता असावे. आताचे जग हे स्पर्धात्मक युग आहे. किट्सची प्रशंसा करताना म्हणाले की ४० वर्षाच्या कालावधीत किट्स ने चांगले विद्यार्थी दिले. त्याचा फायदा जनसामान्यांना झाला आहे. प्रस्तावना प्राचार्य डॉ अविनाश श्रीखंडे यांनी केली.ते म्हणाले की किट्स रामटेकचे उद्घाटन भारत रत्न व पूर्व पंतप्रधान पी.व्ही. नरसिंहराव यांनी १९८५ ला केले होते.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दिवंगत व्ही. राजेश्वरराव यांच्या दूरदृष्टी तून व सचिव श्री व्ही.श्रीनिवास राव यांच्या मार्गदर्शनातून संस्थेला ए ग्रेड मिळाला व संस्था स्वायत्त झाली आहे. किट्स मधे यंदा १०० टक्के प्रवेश झाले व संस्था सचिव व्ही. श्रीनिवासराव व संचालक व्ही. प्रणव यांच्या मार्गदर्शनात संस्था विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्वक शिक्षणासहित सर्व सोयी एकाच छताखाली देत आहे.

# कारमध्ये युवकाचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
सावनेर, दि. २० :

पाटण सावंगी येथील महामार्गावर असलेल्या लाहोरी हॉटेल जवळ एका युवकाचा स्वतःच्या कारमध्ये संशयित मृत्यू झाल्याची घटना आज सकाळी उघडकीस आली.



पाटणसावंगी लाहोरी हॉटेल जवळील घटना

साजन मनोज मिश्रा वय 30 राहणार वार्ड नं. 3 जयभोले नगर, खापरखेडा असे मृतकाचे नाव आहे.

सविस्तर वृत्त असे की. साजन मिश्रा हा 19 सप्टेंबर च्या रात्री 12 च्या दरम्यान स्वतःची महिंद्रा बोलेरो गाडी क्रमांक एम एच 31 एङ 0438 ने घरी कोणाला काही न सांगता निघून गेला. तो घरी उशिरापर्यंत परत न आल्याने त्याचे वडील मनोज मिश्रा यांनी सकाळी 5 वाजता खापरखेडा आणि सावनेर रोडने साजन मिश्रा यांचा शोध घेतला.

त्याची बोलेरो गाडी एम एच 31 एङ 0438 पाटणसावंगी जवळच्या लाहोरी बार अँड रेस्टॉरंट जवळ उभे असलेल्या दिसून आली. वडील मनोज मिश्रा यांनी गाडी जवळ जाऊन गाडीचे दार उघडून बघितले असता ड्रायव्हरच्या शिटच्या बाजूच्या सीटवर मुलगा साजन मिश्रा बेशुद्ध अवस्थेत दिसून आला. वडिलांनी सहकाऱ्यांच्या मदतीने साजन मिश्रा यास नागपूरच्या मॅक्स हॉस्पिटल येथे उपचाराकरिता नेले. डॉक्टरांनी त्यांस तपासून मृत घोषित केले. साजन मिश्रा हा रेती व्यवसायिक होता. त्याचा गाडीमध्ये संशयित मृत्यू झाल्याची चर्चा वाऱ्यासारखी पसरली. तसेच लोकांमध्ये साधन मिश्रा यांचा घातपात झाल्याचे अफवा पसरली होती. परंतु ही अफवा खोटी असल्याचे शवविच्छेदन अहवालात निष्पन्न झाले असल्याचे पोलिसांनी सांगितले. सावनेर पोलीसांनी मर्ग चा मामला दर्ज केला पुढील तपास ठाणेदार उमेश पाटील यांच्या मार्गदर्शनात एपीआई मंगला मोकासे करीत आहे.

## श्री क्षेत्र हनुमान मंदीराला ब वर्ग दर्जा प्राप्त

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २० :

खडगाव येथील टेकडीवरील श्री क्षेत्र हनुमान मंदीराला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजना अंतर्गत ब वर्ग दर्जा प्राप्त झाला आहे. तसेच शासकीय जागेवर वास्तव्यास असलेल्या ७५ अतिक्रमण धारकांना पट्टे मंजूर करण्यात आले आहेत. शासनाच्या संदर्भीय निर्णयानुसार ग्रामीण तीर्थक्षेत्रांना ब वर्ग दर्जा देण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आले होते. राज्य निकष समितीच्या बैठकीत आवश्यक कागदपत्रांची तपासणी करून श्री क्षेत्र हनुमान मंदीरास ब वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा देण्याचा निर्णय घेण्यात आला.

# समर्थ गजानन सोसायटीत योग शिबिरास उत्साहपूर्ण सुरूवात



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २० :

येथील श्री समर्थ गजानन महाराज मंदिर परिसरात, परिसरातील महिलांच्या सहकार्याने सुख शांती समाधान संस्थेतर्फे योगगुरू सचिन माथूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली योग शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिराचे उद्घाटन सोमवार १५ सप्टेंबर रोजी करून योगासनांच्या सरावाला उत्साहपूर्ण सुरूवात झाली. या उपक्रमात अरूणा पगाडे, अरूण पगाडे, सातपैसे, धुळे, छकुली धुळे, तनूश्री सातपैसे, खूशी मरसकोलहे, अंजली पदमगिरवार यांच्यासह महिला व पुरुष सहभागी झाले.

# संपर्क स्मार्ट शाळा उत्कृष्ट शिक्षक व शाळांना सन्मान



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २० :

संपर्क फाउंडेशन तर्फे संपर्क स्मार्ट शाळा उत्कृष्ट शिक्षक, उत्कृष्ट शाळा व टॉप टीचर अवॉर्ड कार्यक्रमाचा भव्य सोहळा जिल्हा परिषद नागपूर येथील आबासाहेब खेळकर सभागृहात संपन्न झाला.

या कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्र राज्याचे राज्य समन्वयक मुकेश रावत, जिल्हा समन्वयक स्वप्नील चिकटे, प्रियंका मेंढे, प्रफुल तिमांडे, नयन मेश्राम व मोरेश्वर टेकाम यांनी केले. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून उपमुख्य कार्यकारी अधिकारी विपूल जाधव, तसेच सर्व पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी, नागपूर पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी सुनील ढेंगे, माजी शिक्षण विस्तार अधिकारी नारायण चाफले, सर्व शिक्षा अभियानाचे प्रमोद वानखेडे, केंद्रप्रमुख वाडी केंद्र दीपक धुडस यांची प्रमुख उपस्थिती लाभली. या सोहळ्यात वाडी केंद्रातील टॉप टीचर व स्टार टीचर पुरस्काराने सुजाता भानसे, रुपेश चौरे व राजेश तेलंगराव यांचा गौरव करण्यात आला. तर टॉप शाळा पुरस्कार महादेवनगर (टेकाम सर) व दवलामेटी (राजेश तेलंगराव) यांना मिळाला.

# ईसासनीत आमदार समीर मेघे यांचे हस्ते १.२५ कोटीच्या विकास कामाचे भुमिपूजन



■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. २० :

तालुक्यातील ग्राम पंचायत ईसासनी परिसरातील राय टाऊन न.२, भिमनगर, पंचशिलनगर, शांतीनगर, वागदरा, बुद्ध नगरी, बहूजन नगर , गजानन नगर, विनोबानगर येथे आमदार समीर मेघे यांचे हस्ते १.२५ कोटी किमतीच्या सिमेंट रस्ते, खंडीकरण रस्ते,आर ओ प्लांट आदीसह विविध विकास कामाचे भुमिपूजन व लोकार्पण नुकतेच पार पडले.

यावेळी माजी जि प सदस्या अर्चनाताई गिरी,सरपंच अरविंद ढोणे, उपसरपंच राहूल कूळसंगे,माजी जि प सदस्य अंबादास उके, माजी जि प सदस्य धनराज आष्टनकर,पं स उपसभापती पौर्णिमाताई दिक्षित, माजी उपसभापती सुरेश काळबांडे, भाजपा अजामो डिगडोह मंडळ अध्यक्ष लिलाधर दाभे, भाजपा डिगडोह महामंत्री चंद्रशेखर राऊत, माजी उपसरपंच तथा भाजपा डिगडोह शहर अध्यक्ष कैलाश गिरी, भाजपा जिल्हा मंत्री विनोद ठाकरे, भाजपा महिला जिल्हा उपाध्यक्ष सौ गिताताई हरणखेडे, ग्रा प सदस्या प्रितीताई राऊत, इंदुबाई चौधरी, मिनाताई मेश्राम, भाजपा महिला ईसासनी शहराध्यक्षा शशिकलाताई ठाकरे, ग्रा प सदस्य लहानू जीवतोडे, दादाराव मसराम, सिध्दार्थ वाणी, योगेश्वरी गायधने, सौ अश्विनीताई उइके, जयश्रीताई चव्हान, जयराम जामळे, ग्रा प सदस्य अजय जनबंधू आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता शोभना राऊत, वनमाला मेंढे, ज्योती खडसे, शुभांगी माटे, अर्चना माहूले, सिमाताई जगताप, अविनाश माहूरले, विनोद मुंशी, सुशांत गिरी, माधवराव वैध,भाजपा अजामो डिगडोह मंडळ महामंत्री प्रल्हाद काळबांडे,पेठकर, जितू पटले, सौ रेखाताई मोहोड, रेखाताई चव्हान, अमित राठी, अर्चना मेश्राम, इंदूबाई पटले, प्रमोद दुबे, दुर्गा भुसारी आदींनी अथक परिश्रम घेतले.

# मौदा शहरालाला मेट्रो जोडावी



■ महासागर प्रतिनिधी, मौदा, दि. २० :

मौदा हे तालुक्याचे ठिकाण असून एक औद्योगिक शहर म्हणून नाव रूपाला आलेले राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 53 नागपूर भंडारा या दोन शहराच्या मध्यभागी मौदा शहर आहे मागील दहा-पंधरा वर्षात मौदा शहरात अनेक औद्योगिक कारखाने उभे राहिले आहे शहरातील अनेक चाकरमाने शालेय विद्यार्थी हे दररोज नागपूरला येजा करतात वाढत्या प्रवासाच्या दृष्टीने एसटी महामंडळाच्या बसेस या मार्गावरून कमी संख्येने धावतात त्यामुळे मौदा बस स्थानक हे नेहमी प्रवाशाने गजबजलेली असते बरेचदा त्याचा त्रास प्रवाशांना सहन करावा लागतो. मौदा ते नागपूर हे केवळ 30 किलोमीटर अंतर आहे सध्या याच मार्गावर असणाऱ्या कडोली गावापर्यंत मेट्रो चे काम सुरू आहे या ठिकाणाहून मौदा हे केवळ 20 किलोमीटर अंतरावर आहे त्यामुळे ही मेट्रो मौदापर्यंत वाढविण्यात यावी, अशी मागणी मौद तालुक्यातील नागरिकांनी केली आहे.

> वाढते उदोग वाढती लोकसंख्या यामुळे मौदा शहला मेट्रोची खुप आवश्यकता आहे या विषयी आम्ही निवेदन मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांना देणार आहो.
> **देवेन्द्र गोडबोले**, माजी जीप सदस्य

## लाव्हा एकता गणेश उत्सव मंडळातर्फे आरोग्य शिबिर

■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. २० :

लाव्हा येथील एकता गणेश उत्सव मंडळाच्या वतीने शालिनीताई मेघे रिसर्च सेंटर यांच्या सहकार्याने आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचा १५० नागरिकांनी लाभ घेतला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच ज्योत्सना नितनवरे, माजी जि.प. सदस्य सुजित नितनवरे भाजप गोधनी मंडळ उपाध्यक्ष मंगेश खोरगडे,माजी उपसरपंच पांडुरंग बोरकर, युवा मोर्चा अध्यक्ष रोहन वानखेडे ,गणेश मंडळ अध्यक्ष सुरज वानखेडे उपस्थित होते. शिबिरात शालिनीताई मेघे रिसर्च सेंटर वानाडोंगरीचे डॉ. अश्विन रडके व डॉ. अजय ठाकरे यांनी रुग्णांना मार्गदर्शन व तपासणी केली. आयोजनासाठी अमित वानखेडे, अभिनय पांडे, प्रतीक डवरे, ऋषिकेश वानखेडे, अक्षय वानखेडे, शुभम गोरले, साहिल वानखेडे, गौरव वानखेडे, कार्तिक डावरे, राहुल वानखेडे, वीरेंद्र बनकर, श्रेयांश वानखेडे, चेतन गोरले, विकी गोरले, गौरव घोरसे, राज रजक, विलास गोरले आदींनी सहकार्य केले.

# कोतेवाडा येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रमाची अंमलबजावणी

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. २० :

तालुका देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त हिंगणा तालुक्यातील गट ग्राम पंचायत कोतेवाडा येथे विविध उपक्रम राबवून उत्सवात कार्यक्रम साजरा करण्यात आला. कोतवाडाचे सरपंच देवेन्द्र आष्टणकर यांच्या अध्यक्षेत संपन्न झालेल्या या कार्यक्रमाला मा.तहसीलदार सचिन कुमावतजी यांच्यासह विविध कार्यालयाचे पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी ग्रामस्थांसह महिलांचा मोठा सहभाग दिसून आला. कार्यक्रमाची सुरुवात गावातील जेष्ठ नागरिकांचा औक्षवन सोहळा व त्यांचे हस्ते वाढदिवसाचा केक कापण्यात आला. तत्पूर्वी मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानाचे अनुषंगाने विशेष ग्रामसभा घेण्यात आली. सदर अभियानाप्रसंगी मुख्यमंत्री महोदयांनी



व्हिडीओ कॉन्फरेन्सीद्वारे संबोधित केले.

कार्यक्रमाच्या निमित्ताने शासनाच्या महाराजस्व अभियानाला देखील प्रारंभ करण्यात आला. या उपक्रमांतर्गत महसूल विभागाकडून विविध सेवा व सुविधा ग्रामपातळीवर नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तहसीलदार कुमावत यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, पंतप्रधान मोदी यांच्या कार्यप्रेरणेने समाजातील शेवटच्या घटकापर्यंत सरकारी योजना पोहोचाव्यात, हा या अभियानाचा उद्देश आहे. तसेच जिल्ह्याधिकारी कार्यालयातून आलेल्या तहसीलदार पाटील मॅडम यांनीही उपस्थितांना संबोधित केले.याप्रसंगी गावातील नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण दिसून आले तसेच मा. सरपंच देवेन्द्र आष्टणकर यांनी गावकऱ्यांच्या वतीने पंतप्रधानांच्या दीघार्युष्याची कामना करत वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्यात. शासनाच्या "एक पेड माँ के नाम" या महत्त्वाकांक्षी उपक्रमांतर्गत वृक्षारोपणाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. पर्यावरण संवर्धन आणि हरित क्रांतीचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी मान्यवरांच्या हस्ते विविध वृक्षांचे रोपण करण्यात आले. यावेळी सरपंच देवेंद्र आष्टनकर यांचेसह मा.तहसिलदारकुमावत साहेब, जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे मा.पाटील मॅडम, विभागीय आयुक्त कार्यालयातर्फे निकम साहेब, पंचायत समितीचे विस्तार अधिकारी चव्हाण, ग्रा.पं.अधिकारी ठाकरे, तलाठी भोयर मॅडम, पोलीस पाटील, उपसरपंच, सर्व सदस्यगण, बचत गटांचे सर्व सहकारीगण, ग्रा.पं.कर्मचारी, अंगणवाडी व आरोग्य सेविकांसह शेकडोंच्या संख्येने गावकरी उपस्थित होते.

## डिगडोहमध्ये स्वच्छता अभियान संपन्न

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. २० :

तालुक्यातील भाजप डिगडोह मंडळ च्या वतीने सेवा पंधरवाडा अभियानांतर्गत साईनगर डिगडोह प्रभाग ०४ येथे स्वच्छतेचा कार्यक्रम राबविण्यात आला. याप्रसंगी स्वच्छता व निरोगी जीवन यांवर मंडळ अध्यक्ष महेश लोखंडे यांनी युवकांना मार्गदर्शन केले. परिसरातील कचरा व प्लास्टिक झाडुन स्वच्छता करण्यात आली. नागरिकांनी कचरा गाडीचा लाभ दैनंदिन कचरा टाकण्यासाठी घ्यावा. असे आवाहन सुरेश काळबांडे यांनी केले. स्वच्छता अभियानात प्रामुख्याने महेश लोखंडे, सुरेश काळबांडे, विनोद ठाकरे, कैलास गिरी, चेतनलाल पांडे, राजेश बोरकर, संदीप साबळे, रोहित शिंगणे, शिवरकर, स्वप्नील चौधरी, हर्ष मेंढे, राजू कोल्हे, खोडे, नकुल पांचाळ दिपक सायखेडे, अमोल लसणापुरे व इतर नागरिक उपस्थित होते.

# महाराजस्व अभियानाचा लाभ घ्यावा तहसिलदार गणेश जगदाळे

■ महासागर प्रतिनिधी
कामठी, दि. २० :

ग्रामीण भागातील रहिवाशांनी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाचा भरपुर प्रमाणात लाभ घ्यावा असे आवाहन कामठीचे तहसिलदार गणेश जगदाळे यांनी केले. तालुका प्रशासनाच्या वतीने ग्राम पंचायत कढोली येथे बुधवारी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाअंतर्गत सेवा पंधरवाडा अभियन शुभारंभ प्रसंगी केले. पंतप्रधान नरेंद मोदी यांचा वाढदिवस १७ सप्टेंबर ते महात्मा गांधी जयंती २ ऑक्टोबर पर्यंत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत सेवा पंधरवाडा राबविण्यात येत आहे. अभियानाचा शुभारंभ तहसिलदार गणेश जगदाळे यांनी दीप प्रज्वलन व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत गाडगे महाराज, डॉ.बाबासाहेब




आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करुन करण्यांत आला. या कार्यक्रमाला नागपुर जिल्हा भाजप महामंत्री अनिल निधान, नायब तहसिलदार राजाराम बमनोटे, सरपंच लक्ष्मण करारे, पटवारी एस .बोकडे, उपसरपंच महेश कृपाले, ग्राम पंचायत सदस्य आरती घुले, मीनाक्षी ठाकरे, संगीता चौधरी, इंदिरा रंगारी, बबन वानखेडे, छाया ढोके, गोविंदा ठाकरे, राकेश गावंडे, ग्राम विकास अधिकारी उदय चांदुरकर आदी उपस्थीत होते. सरपंच लक्ष्मण करारे यांनी प्रास्ताविक तर संचालन व आभार प्रदर्शन उदय चांदुरकर यांनी केले.या कार्यक्रमात शिव पांधन रस्त्यांची मोजणी, संजय गांधी निराधार योजना, विविध शासकीय योजनांबाबत मार्गदर्शन करून नागरिकांना मोठ्या प्रमाणात लाभ घेण्याचे आवाहन केले.

RNINo-20789/71 महासागर नागपूर
मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

# हलबा समाजाला शिक्षणातूनच गवसेल प्रगतीचा मार्ग








## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे प्रतिपादन : हलबा समाज महासंघाच्या सुवर्ण महोत्सवी सोहळ्याचे उद्घाटन

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २० :** कुठल्याही समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण हा सर्वांत मोठा दुवा आहे. हलबा समाजाने आपल्या समस्या सोडविण्यासाठी अनेक वर्ष संघर्ष केला, पण शिक्षणाची कास धरली त्यामुळेच समाजातील अनेक लोक मोठ्या पदांपर्यंत पोहोचले. अनेकांनी उद्योग क्षेत्रात नाव कमावले. पुढेही शिक्षणातूनच प्रगतीचा मार्ग गवसणार आहे, असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केले.

हलबा समाज महासंघाच्या सुवर्ण महोत्सवी सोहळ्याचे उद्घाटन गडकरी यांच्या हस्ते झाले. दिनदयाल नगर येथील हलबा समाज महासंघाच्या सांस्कृतिक भवनात झालेल्या या सोहळ्याला माजी आमदार विकास कुंभारे, हलबा समाज महासंघाचे अध्यक्ष डॉ. देवराम नंदनवार, महासचिव डॉ. रमेश पराते यांची प्रमुख उपस्थिती होती.

गडकरी म्हणाले, हलबा समाजाचा उदरनिर्वाह पूर्वी हातमागावर होता. माझ्या धापेवाडा गावासह बेला, खापा येथे हलबा समाजाचे लोक मोठ्या प्रमाणात राहतात. पण हातमागाचा व्यवसाय संपुष्टात आला. मात्र या परिस्थितीत अनेक अडचणी असताना हलबा समाजाने शिक्षणाची कास धरली. मुलांना उत्तम शिक्षण देण्याचा प्रयत्न झाला आणि त्याचे चांगले परिणामही आज आपण बघतोय.

समाजाला प्रत्येक क्षेत्रात प्रगती करायची असेल तर मुलांना चांगले शिक्षण देतानाच त्यांच्यातील उद्यमशीलता वाढवावी. त्यातूनच आर्थिक प्रगती होईल, असेही ते म्हणाले.

हलबा समाज हातमाग व पावरलुमच्या साड्यांसाठी प्रसिद्ध होते. ही ओळख पून्हा निर्माण करण्यासाठी धापेवाडा येथे धापेवाडा टेक्सटाईल नावाने हातमाग व पॉवरलूमचा कारखान्यावर काम सुरु आहे. येथे तयार साड्यांवर झारखंड येथे प्रिंटचे काम केले गेले. त्यामुळे ही साडी इतकी सुंदर झाली की त्याला सर्वत्र मागणी वाढली आहे. सध्या साड्यांसाठी प्रतिक्षा यादी आहे.

दरम्यान धापेवाडातील टेक्सटाईल्सची वास्तू सुमारे सहा महिन्यात पूर्ण होणार आहे. येते कार्यक्रमासाठी सुप्रसिद्ध अभिनेत्री हेमा मालिनी यांना आणण्याबाबत बोलणे झाल्याचे त्यांनी सांगितले.

येथे येतांना हेमा मालिनी यांना धाडेवाडात तयार साडी परिधान करूनच यायला सांगितले आहे. त्यांनी याबाबत कबूलीही दिली आहे. हेमा मालिनी येथील साडीवर आल्यास आपोवार या साडीची मार्केटिंग होईल, असेही गडकरी म्हणाले. या साडीची किंमत बाहेर २ ते ३ हजार रुपये आहे. परंतु ही साडी गरीब व मध्यमवर्गीय महिलांना केवळ ४०० रुपयांत उपलब्ध केली जाईल. त्यातही विणकरीचे काम करणाऱ्या महिलेला ६० रुपये प्रति साडी मजूरी, १० रुपये ट्रस्टच्या खात्यात जाईल. या प्रकल्पामुळे पून्हा नागपूरसह विदर्भाला सूती हातमाग व पॉवरलूम साडीची ओळक देण्याचा प्रयत्न असल्याचेही नितीन गडकरी यांनी सांगितले.

## पडळकरांच्या टीकेमुळे भाजपची मानसिकता उघड

देशमुखांचा संताप



■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २० :** भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरद पवार) ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांच्या अर्वाच्य भाषेत टीका केली. त्यावर संपूर्ण महाराष्ट्रातून प्रतिक्रिया उमटत आहेत.

महाराष्ट्र हे सुसंस्कृत राज्य आहे. फुले, शाहु, आंबेडकरांच्या विचाराची परंपरा राज्याला लाभली आहे. परंतु सध्या राजकारणात काही विकृत लोक आले असून ते सुसंस्कृत राज्याच्या राजकारणाला गढूळ करण्याचे काम करत आहे. भाजपाचे आमदार गोपीचंद पडळकर यांनी नुकतेच आमच्या पक्षाचे जेष्ठ नेते जयंत पाटील साहेब यांच्यावर गलीच्छ शब्दात टिका केली. याचा विरोध करीत सुसंस्कृत महाराष्ट्राला गोपीचंद पडळकर ही लागलेली किड असल्याची टिका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी केली आहे.

ज्येष्ठ नेते जयंतराव पाटील यांच्याबद्दल गोपीचंद पडळकर याने केलेल्या बेताल वक्तव्यातून त्याची आणि त्याच्या पक्षाची मानसिकता आज महाराष्ट्राला बघायला मिळाली. मी या वक्तव्याचा तीव्र शब्दांत निषेध करतो. महाराष्ट्राला लाभलेली सुसंस्कृत राजकारणाची समृद्ध परंपरा पायदळी तुडवण्याचे काम या वाचाळवीरांकडून सुरू आहे. अशी विकृती पोसण्याचे काम करणाऱ्या सत्ताधाऱ्यांनी याचा एकदा अंतर्मुख होऊन विचार केला पाहिजे आणि यांच्यावर कठोर कारवाई केली पाहिजे.

सत्तेतील अनेक मंत्री, आमदार व नेते हे मनात येईल ती वक्तव्य करीत आहे. यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणाला जी थोर परंपरा आहे त्याला छेद देण्याचे काम भाजपा व सत्ताधाऱ्याकडुन वांरवार होत आहे. याला जर वेळीच आवर घातला नाही तर राजकारणाचा स्तर हा अतिशय खालच्या स्तरावर जाईल असे मतही अनिल देशमुख यांनी यावेळी व्यक्त केले.

यापुर्वी राजकारणात असे कधीच घडले नाही. सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात टोकाचा वाद जरी झाला तरी अशी भाषा कोणी वापरली नाही. मतभेद जरी असले तरी मनभेद कधीही सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात झाले नाही. राज्याच्या विकासासाठी सत्ताधाऱ्यांनी नेहमी विरोधकांना सोबत घेण्याचे काम केले आहे. विरोधक हे आपले कट्टर दुश्मनच असल्याच्या भावनेतून त्यांना संपविण्याचे काम सत्ताधाऱ्याकडून करण्यात येत आहे. यातूनच पडळकर यांच्यासारखी विकृत्ती जन्माला येते. अशी विकृत्ती जर वेळीच ठेचली गेली नाही तर भविष्यात राजकारण आणि राजकारणी व्यक्तीकडे सामान्य नागरीकांचा पाहण्याचा दृष्टीकोण बदलेल. यामुळे अश्या विकृत्तींना वेळीच ठेचण्याची गजर असल्याचेही अनिल देशमुख म्हणाले.

## मैत्रिणीशी बोलण्याच्या वादातून तरुणाची हत्या

**चार आरोपींना शिताफीने अटक**

**२३ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी**

■ **महासागर प्रतिनिधी, सावनेर, दि. २० :** वारंवार इशारा देऊनही, मैत्रिणीशी बोलणे थांबवले नसल्याच्या रागातून चार आरोपींनी एका तरूणाची निर्घृण हत्या केल्याची घटना शुक्रवारी रात्री घडली.

नागपूर महामार्गावरील मालेगाव शिवारातील मालू पेपर मिलजवळ शुक्रवारी रात्री ९ वाजता चार आरोपींनी तरुणाला घेरले आणि त्याच्यावर चाकूने हल्ला केला. सहाय्यक पोलीस अधीक्षक अनिल मस्के, एसडीपीओ सागर खर्डे घटनास्थळी पोहोचले. आरोपींना पकडण्यासाठी वेगवेगळ्या दिशेने चार पोलिस पथके पाठवण्यात आली. पोलिसांनी रात्रीच चारही आरोपींना अटक केली. सर्व आरोपींना सावनेरच्या न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने सर्व आरोपींना २३ तारखेपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले.

करण सिंह रमेश सिंह परसराम (३०), शक्तीनगर वसाहत, वाघोडा खदान, असे मृतकाचे नाव आहे. तो एका गिरणीत काम करत होता. आरोपीच्या महिला मैत्रिणीशी बोलत असे. यासाठी आरोपींनी त्याला मनाई केली होती. तरीही तो बोलायचा त्यामुळे आरोपींनी काटा काढण्याचे ठरवले. आरोपी आधीच मिल परिसरात लपून बसले होते. करण सिंह गिरणीतून बाहेर येताच, चारही आरोपींनी त्याला घेरले आणि चाकूने वार करून त्याची हत्या केली. खून करून सर्व आरोपी पळून गेले. पोलिसांनी रात्रीच जितेंद्र उर्फ जितू राकेश रावत (२७), अंकित कदम पात्रे (२४), रा. पाटणसावंगी, अनिकेत विनोद वानखेडे (२६), रा. बोरुजवाडा, अंश कांबळे (२५), रा. आगेवाडा या आरोपींना अटक केली. त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली असून हत्येत वापरलेला चाकूही जप्त करण्यात आला आहे.

डी. बी. पथकाचे प्रमुख पीएसआय स्वप्नील गेडाम, जमादार सुरेंद्र वासनिक, अंकुश मुळे, सचिन लोणेरे, अशोक निस्तांये, रोशन काळे, सतीश देवकाते, भावेश शेंडे, नितेश परखड यांनी रात्री बारा वाजता चार आरोपींना अटक करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. पोलीस स्टेशन अधिकारी उमेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय दीपक निंबाळकर हे तपास करत आहेत.

## आ. पडळकरांच्या प्रतिमेला चपलेचा प्रसाद




■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २० :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे(शरदचंद्र पवार) ज्येष्ठ नेते आणि आमदार जयंतराव पाटील यांच्याविरोधात अर्वाच्य भाषा वापरल्याच्या आरोपावरून आज नागपूरच्या व्हरायटी चौकात जोरदार निदर्शने करण्यात आली. या निदर्शनांमध्ये पक्षाचे स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी केलेल्या वादग्रस्त वक्तव्यावर संतप्त प्रतिक्रिया देत राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी निषेध फलक हातात घेऊन जयंतराव पाटील यांचा अवमान खपवून घेतला जाणार नाही, अश्लील भाषेचा वापर करणाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे, अशा घोषणा दिल्या.

यावेळी पक्षाचे शहराध्यक्ष धनेश्वर पेठे, ग्रामीण जिल्हाध्यक्ष प्रवीण कुंटे पाटील, युवानेते आणि महिला आघाडीच्या कार्यकर्त्यांनी गोपीचंद पडळकर यांच्या चपलांचा मार देऊन संताप व्यक्त केला. आंदोलनादरम्यान पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. काही वेळ वाहतुकीवर परिणाम झाला होता.

पक्षाचे स्थानिक नेते दुनेश्वर पेठे म्हणाले की, गोपीचंद पडळकर यांची भाषा लोकप्रतिनिधीला शोभणारी नाही. त्यांनी तात्काळ जाहीर माफी मागावी अन्यथा आंदोलन तीव्र केले जाईल.

या घटनेमुळे राज्यातील राजकीय वातावरण पुन्हा एकदा तापण्याची चिन्हे आहेत. जयंतराव पाटील हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अत्यंत मान्यवर नेते असून त्यांच्या विरोधात अशा प्रकारे बोलणे हे अत्यंत निंदनीय असल्याची प्रतिक्रिया कार्यकर्त्यांनी दिली.यावेळी जिल्हा कार्याध्यक्ष किशोर बेलसरे उपस्थित होते.

## तरुणाईमध्ये साहित्याची आवड निर्माण होण्यासाठी प्रयत्न

**लोकरंग**



९९ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनच्या अध्यक्षपदी यंदा जेष्ठ लेखक आणि कादंबरीकार विश्वास पाटील यांची निवड झालेली आहे. पानिपत सारखी प्रचंड खपाची कादंबरी लिहून साहित्य विश्वात आपले वेगळे स्थान निर्माण करणाऱ्या विश्वास पाटील यांच्या संभाजी, झाडाझडती, पांगिरा, महानायक अशा असंख्य कादंबऱ्या तितक्याच लोकप्रिय आहेत. साहित्यविश्वात एक ऐतिहासिक लेखक अशी ओळख बनलेल्या विश्वास पाटील यांची संमेलनाध्यक्ष पदी झालेली निवड म्हणूनच महत्वपूर्ण आहे. म्हणूनच आजचा साप्ताहिक संवाद विश्वास पाटील यांच्याशी.

**मराठी साहित्य संमेलन शताब्दीकडे वाटचाल करत असताना अध्यक्ष म्हणून काय वाटतं?**

■ आपल्या देशात आसाम वगळता इतर कोणत्याही भाषेचा अशा प्रकार साहित्याचा उत्सव होत नाही. आषाढीला पंढरपूरला अगदी नित्यनेमाने जाणाऱ्या वारकऱ्याप्रमाणेच महाराष्ट्रातील तमाम साहित्य प्रेमी मराठी साहित्य संमेलनाला अगदी आवर्जून हजेरी लावतात, वाचक मंडळी एकत्र येतात.

तीन दिवस चालणाऱ्या संमेलनात साहित्याचा आस्वाद घेतात. परिसंवादांना उपस्थित राहतात आणि पुस्तकं देखील विकत घेतात. केवळ मराठी भाषेच्या प्रेमापोटी हि मंडळी संमलेनाच्या निमित्ताने एकत्र येतात. जी गोष्ट कॉर्पोरेट क्षेत्रातील व्यावसायिक स्वरूपाच्या कार्यक्रमापेक्षा देखील अनन्यसाधारण आहे.

**९९ व्या साहित्य संमेलनाकडून आपल्या अपेक्षा काय आहेत?**

■ ९९ व्या साहित्य संमेलनाचा अध्यक्ष म्हणून माझी पहिली जबाबदारी म्हणजे आज मोबाईलच्या रिल्समध्ये अडकलेल्या आणि सोशल मीडिया यामध्ये भरकटलेल्या आजच्या तरुणाईला साहित्याकडे वळविण्यासाठी प्रयत्न करणे आहे. केवळ दोन तीन मिनिटांची एखादी रिल्स पाहून क्षणिक आनंद घेण्यापेक्षा कथा, कादंबऱ्या, कवितासंग्रह वाचून आयुष्यचा आनंद घेण्यासाठी तरुणांना साहित्याकडे वळविणे गरजेचे आहे. याशिवाय प्रत्येक राज्याची जशी प्रादेशिक भाषा आहे जसे कि कोलकात्याची बंगाली, चेन्नईची तमिळ, गुजरातची गुजराथी त्याप्रमाणेच महाराष्ट्रात आल्यानंतर मराठी भाषा प्रत्येकाने आत्मसात करून ती बोलायलाच हवी यात गैर काही नाही आणि त्या दृष्टीने प्रयत्न होणे गरजेचे आहे असं वाटत.

**मराठी साहित्य टिकविण्यासाठी माध्यमांतर हा एकमेव पर्याय उरलेला आहे असं वाटतं का?**

■ आपल्या मराठी भाषेचा इतिहास हा अति प्राचीन आहे. अगदी संत ज्ञानेश्वरांपासून ते आजच्या तरुण लेखकापर्यंत प्रत्येकाने मराठी भाषेसाठी आपल्या परीने योगदान दिलेलं आहे. सार्वजनिक जगण्यात मराठी भाषेचा वापर हा असायलाच हवा . मराठी भाषा लोकसाहित्यातून टिकून राहिली. पुढे मराठी नाटक असेल किंवा बदलती दृकश्राव्य माध्यम असतील, मराठी भाषा प्रवाहाप्रमाणे टिकून राहिलेली आहे.

आता तर या भाषेला अभिजात दर्जा मिळालेला आहे, त्यामुळे आपल्या व्यवहारातून आणि जगण्यातून हि भाषा जगाच्या पाठीवर कायम टिकून राहण्यासाठी आपण सगळ्यांनी मिळून प्रयत्न करायलाच हवेत त्यासाठी माध्यमांचा मोठा आधारच होईल. ■ ■

## एमसीएक्स अहवालानुसार भारत २७५३ कोटींच्या धातू व्यापारासह किंमत बेंचमार्क म्हणून उदयास



भारताचा अग्रगण्य कमॉडिटी डेरिव्हेटिव्ह्ज एक्स्चेंज मल्टी कमॉडिटी एक्स्चेंज ऑफ इंडिया एमसीएक्सने आपला महत्वाचा अहवाल प्रकाशित केला आहे इंडस्ट्रियल स्ट्रेंथः फायनान्शियल डेप्थ बेस मेटल्स डेरिव्हेटिव्ह्ज सर्व्हिंग २० ट्रिलियन मार्केट.

हा अहवाल सेबीचे अध्यक्ष श्री. तुहिन कांता पांडे यांच्या हस्ते प्रसिद्ध करण्यात आला. अहवालात भारताच्या पायाभूत सुविधा, नवीकरणीय ऊर्जा आणि उत्पादन क्षेत्रांच्या महत्त्वाकांक्षांना चालना देण्यात ॲल्युमिनियम, कॉपर, झिंक, शिसे आणि निकेल यांसारख्या बेस मेटल्सची निर्णायक भूमिका अधोरेखित केली आहे.

२७५३ कोटींच्या दररोजच्या बेस मेटल्स टर्नओव्हरसह, एमसीएक्स किंमत शोध आणि जोखीम व्यवस्थापनासाठी विश्वासार्ह व्यासपीठ म्हणून समोर आले आहे.

अहवालात नमूद केले आहे की नियमनबद्ध देशांतर्गत एक्स्चेंजवर व्यापार होणारे रुपये-मूल्यांकन केलेले डेरिव्हेटिव्ह्ज भारतीय बाजारातील सहभागींसाठी आंतरराष्ट्रीय बेंचमार्कऐवजी संदर्भ किंमती म्हणून वाढत्या प्रमाणात वापरले जात आहेत.

भारताचा बेस मेटल्स बाजार सुमारे २० ट्रिलियन (यूएसडी २३० अब्ज), म्हणजेच देशाच्या जीडीपीच्या सुमारे ६% एवढा आहे. एमसीएक्सने हेजिंगसाठी द्रव बाजार उपलब्ध करून दिला आहे, जिथे केवळ कॉपर आणि झिंक डेरिव्हेटिव्ह्जच भौतिक बाजाराच्या २.५ ते ३ पट एक्स्पोजरचे प्रतिनिधित्व करतात.

त्याच्या डिलिव्हरी यंत्रणेद्वारे सुमारे पाच लाख टन भौतिक डिलिव्हरी आधीच सुलभ केल्या गेल्या आहेत, ज्यामुळे एक्स्चेंज डिलिव्हरी ऑफ लास्ट रिसॉर्ट म्हणून स्थापित झाले आहे. रुपयांमध्ये कॉन्ट्रॅक्ट उपलब्ध करून देऊन, एमसीएक्स भारतीय कंपन्यांना परदेशात हेजिंग करण्याची गरज दूर करते आणि चलन रूपांतरण व क्लिअरिंग खर्चात १.५ ते २% बचत होते, ज्यामुळे मोठ्या कॉर्पोरेट्ससाठी दरवर्षी जवळपास १ अब्ज डॉलर्सची बचत होऊ शकते. ■ ■

## सचिन खरातांना धमकी



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २० :** मराठा आणि ओबीसी आरक्षण मुद्यावरून राज्यात सुरू असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर, रिपब्लिकन पार्टी खरात गटाचे राष्ट्रीय अध्यक्ष सचिन खरात यांच्याबद्दल सोशल मीडियावर अपमानास्पद वक्तव्य करत, त्यांच्या तोंडाला काळे फासण्याची धमकी देण्यात आली आहे.

या धमकीनंतरही आपण आपली भूमिका कायम ठेवणार असल्याचे सांगत, धमक्यांना भीक घालणार नसल्याचे सचिन खरात यांनी स्पष्ट केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या खासदार यांनी देखील या प्रकरणाची दखल घेतली असून, सचिन खरात यांना पोलिस संरक्षण देण्याची मागणी केली आहे. एका व्यक्तीने माझ्या परिवाराबद्दल खालच्या शब्दांत उल्लेख करून चुकीची विधाने केलेली आहेत. तसेच मला काळे फासण्यात येईल, असा इशारा दिल्याचे सचिन खरात म्हणाले.

## हाल बेहाल




■ **नागपूर :** पाऊस थांबण्याचे नाव घेत नाही. तूफान पावसामुळे रस्त्यांची पार वाट लागली असून, तातपुरती मलमपट्टी केली जात आहे. मात्र वाहनचालकांना कसरत करावी लागते.

## रोकडे ज्वेलर्सचे ऑल न्यू महाल शोरूम ऐतिहासिक उद्घाटनासाठी सज्ज




■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २० :** रोकडे ज्वेलर्सच्या बडकस चौक, महाल, नागपूर येथील शोरूमचे शुक्रवार २६ सप्टेंबर रोजी उद्घाटन होत आहे. त्यानिमित्ताने ग्राहकांसाठी अनेक आकर्षक योजना आणण्यात आल्या आहेत.

२५ वर्षांपूर्वी, रोकडे ज्वेलर्सने महालमध्ये आपले पहिला फ्लॅगशिप शोरूम सुरू केले होते जो विदर्भाच्या दागिन्यांच्या संस्कृतीचे केंद्र ठरले. गेल्या पावशतकात महालच्या ग्राहकांचा विश्वास हा रोकडेंच्या प्रवासाचा आधार राहिला आहर. आज तेच शोरूम अधिक मोठ्या, भव्य आणि आकर्षक रूपात परत येत आहे. महालच्या मध्यवर्ती ठिकाणी १६ हजार चौ. फुटांपेक्षा अधिक क्षेत्रफळात उभारलेले शोरूम विदर्भातील सर्वात मोठे दागिने शोरूम ठरले आहे.

मार्कंडराव रोकडे यांनी शतकापूर्वी स्थापन केलेले रोकडे ज्वेलर्स आज पाच पिढ्यांच्या नेतृत्वाखाली विदर्भातील सर्वात विश्वासार्ह दागिने घराणे बनले आहे. महाल, इतवारी, एअरपोर्ट, लक्ष्मीनगर, हिंगणा, कोराडी व भंडारा येथे त्यांचे शोरूम असून, गोंदिया येथेही लवकरच नवे शोरूम सुरू होणार आहे. विश्वास, विविधता, गुणवत्ता, सेवा व पारदर्शकता हे रोकडे ज्वेलर्सचे शाश्वत मूल्य आहेत. या धोरणांमुळेच असंख्य कुटुंबांचा विश्वास व प्रेम त्यांना लाभले आहे.


२६ सप्टेंबर रोजीचा उद्घाटन सोहळा सेलिब्रिटींच्या उपस्थितीमुळे अधिक खास होणार असून, लोकप्रिय अभिनेत्री प्राजक्ता माळी दुपारी १२ वाजता शोरूममध्ये येतील तर ख्यातनाम अभिनेत्री सोनाली कुलकर्णी सायंकाळी ५ वाजता सोहळ्यात सहभागी होतील.

या ऐतिहासिक प्रसंगी ग्राहकांसाठी एक आगळावेगळी एकदिवसीय ऑफर जाहीर करण्यात आली आह. पहिल्यांदाच दागिने शोरूम सकाळी ६ वाजता ग्राहकांसाठी खुले होईल. सकाळी ६ वाजता येणाऱ्या ग्राहकांना सोन्या चांदीच्या दागिन्यांच्या मेकिंग चार्जवर तब्बल ६०% सवलत मिळेल. प्रत्येक तासागणिक ही सवलत ५ टक्क्याने कमी होत जाईल व शेवटी ३० % वर स्थिर राहील.

हिऱ्यांच्या दागिन्यांवर दिवसभर मेकिंग चार्ज पूर्णतः माफ असेल. या दिवशी गोल्ड सेव्हिंग प्लॅन सुरू करणाऱ्या ग्राहकांना पहिल्या हप्त्यावर २५% सवलत मिळेल. हा नवा शोरूम फक्त एक ठिकाण नसून, महालच्या ग्राहकांनी गेल्या २५ वर्षांत दाखवलेल्या विश्वास आणि निष्ठेचा उत्सव आहे. ही एका नव्या पर्वाची सुरुवात आहे. जिथे परंपरा आणि आधुनिक तेज एकत्र येतात. असे रोकडे ज्वेलर्स व्यवस्थापनाने सांगितले.

भव्य उद्घाटन एक अविस्मरणीय उत्सव ठरणार आहे. २६ सप्टेंबर रोजी सकाळी ६ वाजल्यापासून रोकडे ज्वेलर्स, बडकस चौक, महाल, नागपूरच्या नव्या शोरूममध्ये ग्राहकांनी संपूर्ण विश्वासासह सहभागी व्हावे, असे आवाहन रोकडे ज्वेलर्सच्या वतिने करण्यात आले आहे.

## पर्यटकांचं आकर्षण सोलापूर




पंढरपूर, अक्कलकोट येथील प्रमुख देवस्थानांसह सोलापूर शहर व जिल्ह्यात लहान-मोठी तीर्थक्षेत्रे आहेत. सर्वांत मोठे उजनी धरणदेखील सोलापूर जिल्ह्यात आहे. कृषी, वैद्यकीय, आध्यात्मिक पर्यटनाला सोलापूर जिल्ह्यात खूप मोठी संधी आहे.

सोलापूर शहर व जिल्ह्याला आध्यात्मिक पर्यटनाचा खूप मोठा वारसा लाभलेला आहे. तुळजापूर, गाणगापूर यासह सोलापूरच्या शेजारी मोठी तीर्थक्षेत्रे आहेत. सुखात आणि दुःखात असताना देवाकडे जाणाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यात कायमस्वरूपी पर्यटक, भाविक येत असतात. तिरुमला तिरुपती देवस्थान आणि शिर्डी या ठिकाणी ज्या पद्धतीने आध्यात्मिक पर्यटन आहे, अगदी तशीच स्थिती सोलापूरची देखील आहे.

सोलापूर परिसराला आध्यात्मिक पर्यटनाचे जेवढे महत्त्व आहे त्यापेक्षा अधिक महत्त्वाचे येथील निसर्ग पर्यटन देखील आहे. हिप्परगा तलावासोबत कुरनूरचे पक्षी वैभव आता विशेष झाले आहे. नान्नज, वंगेवाडी भागातील माळरानातील जैवविविधता, विदेशी पक्षी यांसह अनेक पक्ष्यांची वाढलेली संख्या ही पक्षी पर्यटनासाठी एक मोठी संधी आहे. ही माळराने म्हणजे पक्षी निरीक्षणाची मोठी संधी आहे. निसर्ग पर्यटनाचा टक्का वाढला पाहिजे. जिल्ह्यातील निसर्गप्रेमी विद्यार्थी, नागरिक व महिलांना हा निसगार्चा ठेवा पर्यटक म्हणून अनुभवता आला पाहिजे.

शहरातील स्मृतीवन, सिद्धरामेश्वर तलाव, सिद्धेश्वर वनविहार, भुईकोट किल्ला यांसारखी ठिकाणे पर्यटन वाढीचे नवे मानदंड बनले पाहिजेत. या पर्यटनस्थळी बाहेर गावातील पर्यटकांसाठी माहिती फलक असावेत. या स्थळांच्या इतिहासावची या ठिकाणी माहिती द्यायला हवी. ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

# पूजा नको, सन्मान हवा


**नवरात्रीचे दिवस अनेकार्थाने महत्त्वपूर्ण असतात. यामागे पौराणिक कथा आहेत, सामाजिक संकेत आहेत, बदलत्या ऋतूमानाचा विचार आहे आणि त्याचबरोबर हा महिलांच्या शक्तीचा गौरव आहे. समाजचक्राचे एक अंग असणाऱ्या सामर्थ्याची ही उपासना आहे. मात्र एकीकडे देवीची पूजा करणारा समाज आज महिलांबाबत कमालीचा असंवेदनशील दिसतो. स्त्रीप्रश्न गंभीर रुप घेत आहेत. तेव्हा या उत्सवाचा अर्थ लावायचा कसा?**

नवरात्र विशेष

**रमा सरोदे,** प्रसिद्ध विधिज्ञ

नवरात्रीच्या पावन पर्वाची सुरुवात म्हणजे स्त्रीशक्तीला केलेले वंदन आहे. घराघरामध्ये नऊ रात्री आणि नऊ दिवस सुरु राहणारा हा महोत्सव महिलेचे समाजातील उन्नत स्थान आणि महात्म्य अधोरेखित करणारा आहे. आता तर घरे आणि राऊळांच्या बरोबरीने रस्तोरस्ती याचे साजरीकरण बघायला मिळते. मात्र एकीकडे असे असूनही समाजामध्ये स्त्रियांची विदारक स्थिती लपून राहिलेली नाही. महिलाप्रश्नाचे स्वरुप अधिकाधिक गहन होत असल्याचे वास्तव जळजळीत आहे. म्हणूनच आदिमायाशक्तीची उपासना करणाऱ्या समाजाने याची दखल घ्यायला हवी.

गेल्या वर्षभराचा आढावा घेतला तर कोलकात्यातील बलात्काराची घटना कामाच्या ठिकाणी महिला सुरक्षित नसल्याचे दाखवून गेली. या केसमधून यासंबंधीचे वेगवेगळे कंगोरे लक्षात आले. टॉलिवूडच्या संदर्भात जस्टीस हेमा यांचा अहवाल आला आणि बदला घेण्याची वाढती प्रवृत्ती बघायला मिळाली. आपल्यावर झालेल्या अन्याय, अत्याचाराबद्दल उघडपणे कोणी बोलले तर अत्याचारी मानसिकता बदलत नाही तर अधिक आक्रमक होते, हे या अहवालाने दाखवून दिले. आपल्यावरील अन्यायाचा पाढा वाचणाऱ्या अभिनेत्रींना काम न मिळण्याच्या तेथील घटना समोर आल्याच खेरीज ज्येष्ठ कलाकार अशा घटनांमध्ये सामील नसले तरी त्यांनी याविरुद्ध कोणतीही ठोस भूमिका न घेतानाही दिसले. खरे तर आपल्या कामाचे ठिकाण महिलांसाठी सुरक्षित



करायचे असेल तर प्रत्येकाने खंबीर भूमिका घ्यायला हवी. किमान भूमिका घेणाऱ्यांमागे खंबीरपणे उभे तरी राहायला हवे. मात्र तसे होताना दिसले नाही. म्हणूनच आजही याबाबत पहिले पाढे पंचावन्न अशीच स्थिती असून कायदा असूनही त्याची अंमलबजावणी होत नसल्याची खंत आहे.

वैष्णवी हगवणे प्रकरणानंतर हुंडाबळीचा विषय पुन्हा एकदा ऐरणीवर आल्याचे आपण पाहिले. हुंडा मागणे, देणे आणि घेणे हा मुळातच गुन्हा आहे. मात्र असे असूनही लोकांचे गुन्हेगारीकरण सामान्यपणे स्विकारले जात असल्याचे वास्तव यानिमित्ताने बघायला मिळाले. कारण कायदा असला तरी मुळात आपण हुंडापद्धती सांस्कृतिकदृष्ट्या स्विकारली आहे. त्यामुळे कायदा असला तरी हुंडा देणारेही काही बोलत नाहीत, घेणारेही बोलत नाहीत आणि बघणारेही केवळ बघ्याची भूमिका घेतात. अशा प्रत्येक घटनेवेळी समाज गुन्हेगारी प्रवृत्ती सामान्य समजत स्विकारत असतो. त्यामुळेच महिलांविषयक परिस्थिती पुर्वी होती तेवढीच आजही गंभीर आहे, असे म्हणावे लागेल.

असे असले तरी अलिकडचे न्यायालयाचे काही निकाल मात्र आश्वासक वाटतात. अलिकडेच महिलांच्या घरकामाला प्रतिष्ठा देण्याची भूमिका मद्रास उच्च न्यायालयाने मांडली. हे महत्त्वाचे वाटते, कारण महिलांचे घरकाम हे कधीच मुख्य काम समजले जात नाही. त्यातून पैसे मिळत नाहीत. मात्र घरकाम हे देखील नोकरीत केल्या जाणाऱ्या कामासारखे असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केल्याची बाब नोंद घेण्याजोगी म्हणायला हवी. दुसरा स्त्रीधनाबद्दलचा निकाल महत्त्वाचा वाटतो. या निर्णयात महिलेचा तिच्या स्त्रीधनावर हक्क असून कितीही वर्षांनंतर ती स्त्रीधन मागू शकते, असे न्यायालयाने स्पष्ट केले. याद्वारे कायद्याने स्त्रीला तिच्या धनाचे अभय मिळाले. मात्र असे अपवाद वगळले तर महिलाविषयक प्रश्न गुंतागुंतीचे होत असून अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ होताना दिसणे ही काळजीची बाब म्हणावी लागेल.

सध्या आपण इंटरनेटच्या जगात वावरतो. तेव्हा त्याच्या प्रभावाच्या परिणामांचीही चर्चा झाली पाहिजे, कारण हा विषय 'प्रायव्हसी लॉ'च्या संदर्भात आहे. त्याचा वापर करुन गैरव्यवहार, फसवणूक, छळ होण्याचे प्रमाण वाढते आहे. महिलाविषयक संवेदनशील माहिती मिळवत त्याचा गैरवापर करण्याचे प्रमाण तर नोंद घेण्याइतके वाढले आहे. काळजीची बाब म्हणजे अशा प्रकारची गुन्हेगारी समाजाच्या सर्व स्तरांवर वाढताना दिसत आहे. हीच परिस्थिती नात्यांमध्ये बदल घडवून आणण्यासही कारक ठरत आहे. स्वाभाविकच वैवाहिक नात्यांवर होणारा याचा परिणाम जोडप्याला घटस्फोटापर्यंत घेऊन जाताना दिसतो. हा बदल निश्चितच तंत्रज्ञानाशी संबंधीत आहे. म्हणजेच महिलांविषयक गुन्ह्यांची मानसिकता बदलली नसून काळानुरुप अधिक हिणकस पद्धतीने वाढताना दिसत आहे.

आजच्या जगात आपण स्वत:ला प्रगत समजतो. आपले राज्य प्रगत आणि प्रयोगशील आहे. मात्र इथे बालविवाहाचे प्रमाण वाढत आहे. आजही बालविवाह होतात, बघणारे ते निमुटपणे बघतात आणि यंत्रणाही याविरुद्ध काही करत नाही. अशा किंवा हुंड्याच्या घटनाच कौटुंबिक हसाचाराचा पाया ठरतात. त्यात अन्याय सोसणाऱ्या मुलींच्या मनाचे स्वास्थ्य प्रभावित होते. मात्र त्याविषयी आपल्याकडे साधे बोललेही जात नाही. खरे तर कोणत्याही प्रकारच्या अन्यायामध्ये मानसिक अस्वास्थ्याचा समावेश असतो. कामाचे ठिकाण, नातेसंबंध, लग्नव्यवस्था अशा प्रत्येक ठिकाणी अन्याय होत असेल तर महिलेचे मानसिक स्वास्थ्य बिघडते. याविषयी न्याय देणारा कायदाही आहे. मात्र अनेकीना त्याची माहितीही नाही, कारण कधीच कोणी त्याविषयी बोलत नाही. एक प्रकारे हे प्रकार सामान्य समजले जात असल्यामुळेच त्याबाबत समाजात पराकोटीचे औदासिन्य दिसते. त्यामुळेच असे गुन्हे गुन्हेच मानले जात नाहीत.

आजही महिला आपल्या संरक्षणाबद्दल, अभय देणाऱ्या कायद्यांबद्दल सजग झाल्याचे चित्र दिसत नाही. गुन्हे वाढत असले तरी गुन्हेगारांना शिक्षा होण्याचे प्रमाण वाढत नसल्याचे एक अहवाल सांगतो. युनायटेड नेशन्सच्या अहवालानुसार जगात प्रत्येक तीन महिलांमध्ये एकजण हसाचाराचा सामना करत असल्याचे समोर आले आहे. अशी परिस्थिती असताना नोंदवल्या जाणाऱ्या गुन्ह्यांची संख्या किती कमी आहे, हे स्पष्टपणे दिसते. म्हणजेच आजच्या प्रगत युगातही बायकांना अन्यायाविरुद्ध दाद मागण्याचे मार्ग कमी आहेत. त्या आर्थिकदृष्ट्या सक्षम आहेत वा नाहीत, हा प्रश्न वेगळा, कारण बरेचदा कमावत्या महिलांचाही स्वत:च्या पैशावर हक्क नसतो. एखादी महिला कमावत असली आणि तिचे क्रेडिट वा डेबिट कार्ड, रोख रक्कम, अन्य ऐवज नवऱ्याच्या ताब्यात असेल; तिला आर्थिक निर्णयस्वातंत्र्य नसेल तर तिची घरात काहीच सत्ता राहात नाही. ती फक्त कमावते. अशा महिलेला आर्थिक सक्षम म्हणता येत नाही. मग ती अन्याय मुकाटपणे सोसत राहते. अगदीच असह्य झाले तर धैर्य दाखवून तक्रार नोंदवायचा निर्णय घेतेवेळेही तिच्या मनात आधी मुलांचा विचार येतो. लोक काय म्हणतील, या चिरंतन प्रश्नामुळेही बऱ्याचजणी गप्प राहून अन्याय सहन करतात. या सगळ्याचा विचार करुनच आता यंत्रणेने कायद्यात बदल घडवून आणला पाहिजे, असे प्रकर्षाने वाटते.

कबहुना, राजकीय पक्षांनीही हा विषय प्राधान्यक्रमावर ठेवायला हवा. मात्र असे होताना दिसत नाही. कबहुना, गेल्या दोन लोकसभा निवडणुकांमध्ये तर मतांसाठी महिलांचा वापर करुन घेतल्याचे दिसले. अगदी 'ऑपरेशन सदूर'बाबत बघायचे तर हा शब्ददेखील पुरुषप्रधान संस्कृतीतून आल्याचे दिसले, कारण कुंकू पुन्हा एकदा तिच्या सौभाग्याशी, पतीच्या अस्तित्वाशी आणि सांस्कृतिकदृष्ट्या स्त्रीसाठी जोडला गेलेला विषय आहे. 'सदूर' या शब्दामध्ये विधवा, परितक्त्या वा अन्य गटातील महिलांना स्थान नाही. असे असताना हा विषय सर्वसमावेशक कसा म्हणता येईल? म्हणजे यातूनही पुरुषप्रधान संस्कृतीचाच पगडा दिसून आला. कोणत्याही लष्करी कारवायांची नावे अशी नसतात. त्यामुळेच सरकारने पुन्हा एकदा बायकांचा भावनिक वापर करुन घेतल्याचे दिसले. प्रत्यक्षात शासकीय ध्येय, योजना, कार्यपद्धती आखताना बायकांचा विचार केला जात नाही. त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रशस्त मार्ग निर्माण होत नाही. त्यांच्यावरचे गुन्हे थांबत वा कमी होत नाहीत. या पातळीवर स्थिती खालावत असताना केवळ भावनिक अंगाने महिलांचा वापर करण्याची प्रवृत्ती देशामध्ये आश्वासक आणि सुरक्षित वातावरण कधीच निर्माण करु शकणार नाही.

आम्ही वकीलमंडळी अनेक खटले हाताळतो. या निमित्ताने वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये त्रासात अडकलेल्या महिलांचे प्रश्न जवळून समजतात. काही वेळा अत्याचारग्रस्त बाईमागे तिचे कुटुंब, मित्रपरिवार खंबीरपणे उभा दिसतो. मात्र हे सार्वत्रिक चित्र नाही. बरेचदा कोणाचाही पाठबा नसताना ती स्त्री एकटीच लढत असते. बऱ्याचदा अर्थनिर्भर बायकाच ही हमत दाखवताना दिसतात. मात्र कोणाचा ना कोणाचा आधार घेऊन जगणारी स्त्री अन्यायाविरुद्ध दाद मागताना आजही दहा वेळा विचार करते, हे वास्तव आहे. कोणी तरी आपल्यावर नियंत्रण ठेवत



असल्याच्या मानसिक दबावात जगत असल्यामुळे ती परिस्थितीच्या कचाट्यातून बाहेर पडतच नाही. या जबरदस्त पगड्यातून ती आजही निघू शकत नाही. नवरात्रोत्सव साजरा करणाऱ्या समाजाने या सर्व प्रश्नांचा साकल्याने विचार करायला हवा. केवळ नारेबाजी करुन नव्हे, तर स्त्रीला सर्वांगाने सक्षम करण्याचा विडा उचलला तरच या उत्सवाचे साजरीकरण योग्य पद्धतीने होईल, असे आपण म्हणू शकतो.

✦✦✦

# वाढती सत्तांतरे आणि भारतासाठी धडा

**दक्षिण आणि पूर्व आशियातील देशांमध्ये गेल्या तीन वर्षांपासून भू-राजनीतीक संघर्ष सुरू आहे. २०२२ पासून सुरू झालेल्या तीन विद्यार्थी चळवळींनी तीन देशांमध्ये सत्तांतर घडवले. गेल्या वर्षी श्रीलंका, बांगलादेश आणि आता नेपाळमध्ये आंदोलने झाली. विद्यार्थी आणि नागरिकांनी सत्ताधाऱ्यांना हुसकावून लावले. या प्रदेशातील सर्वात मोठा देश असलेल्या भारतासाठी या तीन देशांमधील संघर्ष आणि सतांतरे एक धडा आहे.**

वर्तमान

**आरिफ शेख**

भारताशेजारच्या तीन देशांमध्ये गेल्या तीन वर्षांमध्ये झालेल्या रक्तरंजित संघर्षाला काही समान कारणे आहेत. सर्व चळवळी नोकऱ्या आणि रोजगारवाढीच्या संधींचा अभाव, वाढत्या किमती, भ्रष्टाचार आणि वाईट प्रशासनामुळे निराश झालेल्या तरुणांमुळे झाल्या आहेत. बांगलादेश आणि नेपाळमध्ये एक समानता अशी होती, की उच्चभ्रू आणि त्यांची मुले संधींचा फायदा घेत आहेत, या समजुतीमुळे निदर्शने सुरू झाली. स्वातंत्र्यसैनिक आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी शिक्षण आणि रोजगारात आरक्षणामुळे गेल्या वर्षी बांगलादेशमध्ये अशी आग पेटली होती. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाने आणि शेख हसीना सरकारच्या आंदोलन हाताळण्याच्या पद्धतीमुळे बांगलादेशमधील आग शमली नाही. नेपाळमध्ये स्वतःला 'जनरेशन-झी' (नवीन पिढी) म्हणवणारे निदर्शक तरुण 'नेपो किड्स' म्हणजेच उच्चभ्रू वर्गातील मुलांविरुद्ध आहेत. 'सोशल मीडिया'ने त्यांना एक व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. सरकारने त्यावर बंदी घातल्याने संताप आणखी वाढला. प्रश्न असा निर्माण होतो की निदर्शकांच्या हातात अत्याधुनिक शस्त्रे कशी पोहोचली? बांगलादेशमध्ये शस्त्रागार लुटले गेले आणि तुरुंगांवर छापे टाकून तपासाधीन इस्लामींना मुक्त करण्यात आले. या गोंधळात इंधनाचा पुरवठा कोणी केला आणि नदीकाठच्या दूरच्या भागात ते कसे पोहोचले, या प्रश्नांची उत्तरे मिळालीच नाहीत. बांगलादेशमध्ये निदर्शक विद्यार्थ्यांनी मोहम्मद युनूस यांची हंगामी पंतप्रधान म्हणून नियुक्ती केली. त्यांनी अभिमानाने आपल्या नेत्याची निषेध चळवळीचा 'मास्टरमाइंड' म्हणून ओळख करून दिली. नेपाळमध्ये तरुणाईने माजी मुख्य न्यायाधीश सुशीला कार्की यांना अंतरिम सरकारचे प्रमुख म्हणून निवडले; परंतु त्याला व्यापक मान्यता मिळालेली नाही.



अन्न आणि इंधनाची कमतरता आणि सरकारी दडपशाही असूनही श्रीलंकेचे तरुण संपूर्ण अशांतता काळातही अहिंसक राहिले. त्यांनी धार्मिक आणि वांशिक एकता दाखवली. त्यांना राष्ट्रपती गोटाबाया यांना पदच्युत करण्यात यश आले. नवे अध्यक्ष रानिल विक्रमसिंघे पूर्वी राष्ट्रपती होते. त्यांना बहुपक्षीय निवडणुका घ्याव्या लागल्या. त्यांचा एका तरुण प्रतिस्पर्ध्याकडून पराभव झाला. अनुरा सेनानायके यांच्या नेतृत्वाखाली श्रीलंका आर्थिक आणि राजकीय स्थिरता प्राप्त करण्याच्या मार्गावर असल्याचे दिसून येते. याउलट, बांगलादेशमध्ये अराजकता आणि धार्मिक अल्पसंख्याकांवर हल्ले सुरूच आहेत. लष्कर सुव्यवस्था राखण्यासाठी संघर्ष करत आहे. सूड उगवण्याच्या मोहिमेत युनूस सरकारने देशातील सर्वात मोठ्या राजकीय पक्षाला निवडणुकांपासून दूर ठेवण्यासाठी कायदा लागू केला आहे. अवामी लीग कार्यकर्त्यांचा छळ केला जात आहे. त्यांचे नेते एक तर भूमिगत आहेत किंवा तुरुंगात आहेत. बांगलादेश निवडणुकीची तयारी करत असताना हसीना यांचे भारतात निर्वासन आणि बांगलादेशमधून त्यांच्या प्रत्यार्पणाची मागणी केल्याने भारताविरोधी भावनांना बळकटी मिळत आहे. नेपाळमधील घटनांनी भारताइतकीच चीनचीही चिंता वाढली आहे. दोघांमधील 'बफर' म्हणून दीर्घकाळापासून मानले जाणारे हे हिमालयीन राष्ट्र अराजकाच्या उंबरठ्यावर आहे. राजकीय गतिरोध, खोल सामाजिक दरी आणि परकीय प्रभावाच्या भीतीने वादळ निर्माण झाले आहे. हे भारतासाठी वाईट संकेत आहेत.

नेपाळमधील वेगवेगळ्या विचारसरणीच्या कट्टर कम्युनिस्टांना ग्रहण लागणे चीनसाठी आणखी वाईट ठरेल. नेपाळी आंदोलकांना नेमके काय हवे आहे हे मात्र स्पष्ट झाले नाही. या गदारोळात चीनसमर्थक मानले जाणारे पंतप्रधान के. पी. शर्मा ओली यांना पायउतार व्हावे लागले. तीन वेळा पंतप्रधान राहिलेले ओली आणि त्यांचे प्रतिस्पर्धी पुष्पकमल दहल प्रचंड यांनी अलिकडच्या काळात आपापल्या पक्षांमध्ये बदल केले. त्यांचा क्रांतिकारी भूतकाळ मागे टाकून कम्युनिस्टांनी तथाकथित लोकशाही आणि राजेशाहीकडे परत येण्याच्या बाजूने असलेल्या शक्तींशी युती केली. यामुळे नेपाळला बाह्य शक्तींसह देशांतर्गत राजकारणासाठी सुपीक जमीन मिळाली. पूर्वेकडे पाहता, म्यानमारवर राज्य करणाऱ्या चीनसमर्थित लष्करी जंटा या गटाने डिसेंबरमध्ये निवडणुका जाहीर केल्या आहेत. त्यामुळे बंगालच्या उपसागराच्या प्रदेशात खोल भू-राजकीय बदल घडून आले आहेत. युनूस राजवटीने म्यानमारमध्ये एक मानवतावादी कॉरिडॉर बांधला जाणार असल्याचे म्हटले आहे. त्याला ट्रम्प यांचा पाठिंबा असल्याचे वृत्त आहे. त्यासाठी ४०० दशलक्ष अमेरिकन डॉलर्स आणि काही शस्त्रास्त्रे भारताच्या ईशान्येकडे, बांगलादेश-म्यानमार सीमेवर पाठवण्यात आली आहेत. हा कॉरिडॉर म्यानमारच्या राखाइन राज्यातून जातो. त्यावर लष्करी जुंटा सत्तेविरुद्ध लढणाऱ्या राखाइन आर्मीचे नियंत्रण आहे. बांगलादेशला या कॉरिडॉरद्वारे दहा लाख रोहिंग्या निर्वासितांना परत पाठवण्याची आशा आहे.



या कॉरिडॉरमुळे कलादान नदीमार्गे म्यानमारच्या सिटवे बंदरापर्यंत पोहोचण्याच्या भारताच्या २२ हजार कोटी रुपयांच्या प्रकल्पावर परिणाम होऊ शकतो. नेपाळमधील कम्युनिस्टांना दुर्लक्षित केल्याने आणि बांगलादेशमध्ये इस्लामवाद्यांच्या संभाव्य उदयामुळे कोणाला फायदा होणार आहे, असा प्रश्न उपस्थित होतो. दक्षिण आशियामधील या घडामोडींमध्ये पाकिस्तानला दुर्लक्षित करता येणार नाही. सध्या पाकिस्तानच्या पंतप्रधानांना फारसे स्थान नाही. त्यांचे लष्करप्रमुख फील्ड मार्शल असीम मुनीर यांचे महत्त्व मात्र वाढले आहे. अमेरिका, चीन त्यांना आवर्जून बोलवतात. सत्तेची सूत्रे लोकनियुक्त सरकारऐवजी लष्करप्रमुखांच्या हाती एकवटणे शेजारच्या लोकशाही राष्ट्रांसाठी चांगले नाही. भारताने लक्षात ठेवले पाहिजे की दक्षिण आणि आग्नेय आशियाई प्रदेशात अमेरिका-चीनमधील स्पर्धा तीव्र होत आहे. बांगलादेशशी ४,३०० किलोमीटरपेक्षा जास्त आणि नेपाळशी १,७०० किलोमीटरपेक्षा जास्त लांबीच्या सीमा आणि दोन्ही बाजूंच्या समुदायांना जोडणारे खोल सांस्कृतिक आणि कौटुंबिक संबंध असताना निर्माण होत असलेली अशी अस्थिरता केवळ भारतापुरती मर्यादित राहणार नाही. भारत आणि आग्नेय आशियाला व्यापार आणि वाणिज्य माध्यमातून सांस्कृतिक देवाणघेवाणीचा दीर्घ इतिहास आणि परंपरा आहे.

आग्नेय आशिया भारतीय व्यापारीवर्गासाठी आकर्षक होता आणि त्यांनी या दूरच्या प्रदेशांना स्वर्णभूमी किंवा सोन्याची भूमी, टोकोला किंवा वेलचीची भूमी किंवा नारिकेलद्वीप किंवा नारळाची भूमी असे नाव दिले. त्यांनी दोन मार्गांचा अवलंब केला. त्यापैकी एक म्हणजे बंगाल, आसाम, मणिपूर आणि म्यानमारमधून आग्नेय आशियाच्या विविध भागांपर्यंत पोहोचण्यासाठी जमीन मार्ग. दुसरा म्हणजे कोरोमंडेल किनारा किंवा बंगालच्या उपसागराच्या किनाऱ्यापासून केप कोमोरिन आणि मलाक्का सामुद्रधुनी मार्गे मलय द्वीपकल्पापर्यंतचा समुद्री मार्ग. एकोणिसाव्या आणि विसाव्या शतकात भारत आणि आग्नेय आशियाने ब्रिटन, फ्रान्स, नेदरलँड्स आणि पोर्तुगालसारख्या पाश्चात्य देशांच्या वसाहतीचा अनुभव घेतला. वसाहतीकरणात आर्थिक शोषण होते आणि अधिग्रहित प्रदेशांच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय विकासावर त्याचा खोलवर परिणाम होतो. भारत आणि आग्नेय आशियातील सांस्कृतिक संबंध खोल आणि वैविध्यपूर्ण आहेत. वस्तूंच्या व्यापारामुळे हिंदू आणि बौद्ध धर्माचा भारतातून आग्नेय आशियात प्रसार झाला. संस्कृत आणि पालीसारख्या भाषांचा आग्नेय आशियाई भाषांवर खोलवर प्रभाव पडला. त्याचप्रमाणे भारतीय संस्कृतीचा आग्नेय आशियावर प्रभाव पडला. भारताच्या इस्लामिक वास्तुकलेचा इंडोनेशियन आणि मलेशियन वास्तुकलेवर प्रभाव पडला आहे, तर द्रविड (दक्षिण भारतीय) आणि नागरा (उत्तर भारतीय) वास्तुशैलींनी आग्नेय आशियाई मंदिरांच्या रचनेवर प्रभाव पाडला आहे.

दुसऱ्या बाजुने पाहता रोंगाली (आसाम), थायलंडमधील सोंगक्रान, लाओसमधील पी माई आणि अरुणाचल प्रदेशमधील सांगकेन या सर्व उत्सवांमध्ये सांस्कृतिक समानता आढळते. ते सर्व नवीन वर्षाच्या आसपास साजरे केले जातात. हे लक्षात घेता भारताने १९९१ मध्ये 'पूर्वेकडे पाहा' धोरण सुरू केले. जपान, दक्षिण कोरिया, नेपाळ, श्रीलंका, भूतान आणि बांगलादेशसह आग्नेय आणि पूर्व आशियातील २३ देशांशी आर्थिक, धोरणात्मक आणि सांस्कृतिक संबंध मजबूत करणे हे या धोरणाचे उद्दिष्ट होते. सरकारने या धोरणाची क्षमता साकार करण्यासाठी आपल्या उपक्रमांमध्ये सुधारणा केली. आग्नेय आशियातील वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांसोबत सहकार्यात्मक संबंध निर्माण करण्यास भारताने प्राधान्य दिल्याने 'क्ट ईस्ट' धोरणाने जगाकडे पाहण्याचा भारताचा दृष्टिकोन बदलला. आता मात्र बदलाचे आणि बंडाचे वारे वाढत असताना अमेरिका आणि चीनची स्पर्धा आणि या देशांतील अशांतता लक्षात घेता सांस्कृतिक बंध बाजुला ठेवत भारताला सावध भूमिका घ्यावी लागणार आहे.



✦✦✦

# परदेशी गुंतवणूकदारांवर प्रभाव का पडेना?

**भारताचा विकासदर जगात सर्वाधिक आहे. तिसऱ्या क्रमांकाच्या अर्थव्यवस्थेच्या दिशेने भारताची वाटचाल सुरू आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या 'टॅरिफ वॉर'चाही भारतावर फारसा प्रतिकूल परिणाम झालेला नाही. असे असताना भारतीय बाजारपेठ परदेशी गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यात का अपयशी ठरत आहे? भारताच्या मजबूत जीडीपी वाढीनंतरही परदेशी गुंतवणूकदार शेअर बाजाराबद्दल उत्साही का नाहीत?**

परामर्श

हेमंत देसाई, ज्येष्ठ पत्रकार

जागतिक अनिश्चिततेच्या काळात, भारतीय अर्थव्यवस्था जोरदार कामगिरी करत आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सुरू केलेल्या 'टॅरिफ वॉर'चा अद्याप भारतीय अर्थव्यवस्थेवर फारसा परिणाम झालेला नाही. त्याच वेळी 'एनएसओ'ने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या पहिल्या तिमाहीमध्ये भारतीय जीडीपी ७.८ टक्के दराने वाढला आहे. हा जगातील कोणत्याही अर्थव्यवस्थेचा सर्वात जलद विकास दर आहे. अलीकडेच, भारत सरकारने वाहनांसह सर्व आवश्यक वस्तूंवरील जीएसटी कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे देशांतर्गत मागणी वाढण्याची अपेक्षा आहे. बऱ्याच काळानंतर अमेरिकेशी व्यापार कराराची आशा वाढली आहे. ट्रम्प आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर एकमेकांचे कौतुक केले आहे. हे सर्व असूनही परदेशी वित्तीय गुंतवणूकदार भारतातून गुंतवणूक का काढून घेत आहेत, याचा विचार केला जातो, तेव्हा त्याला अनेक कारणे असल्याचे दिसून येते. परदेशी गुंतवणूकदारांनी पाचपैकी फक्त एका वर्षात गुंतवणूक केली. आपण परदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदारांवर (एफपीआय) नजर टाकली, तर २०२१-२२ पासून गेल्या पाच आर्थिक वर्षांमध्ये फक्त २०२३-२४ मध्ये भारतीय शेअर बाजारात २५.३ अब्ज डॉलर्सची निव्वळ गुंतवणूक झाली आहे. इतर सर्व वर्षांमध्ये 'एफपीआय'नी आपल्या गुंतवणुकीपेक्षा जास्त रक्कम काढून घेतली. २०२१-२२ मध्ये १८.५ अब्ज डॉलर्स, २०२२-२३ मध्ये ५.१ अब्ज डॉलर्स, २०२४-२५ मध्ये १४.६ अब्ज डॉलर्स आणि २०२५-२६ मध्ये (५ सप्टेंबरपर्यंत) २.९ अब्ज डॉलर्सची रक्कम काढून घेतली आहे. हा ट्रेंड चालू आर्थिक वर्षातही कायम आहे.

एप्रिल-जून २०२४ च्या तुलनेत एप्रिल-जून २०२५ दरम्यान भांडवली आवक ४० टक्क्यांपेक्षा जास्त घसरली आहे. गेल्या तिमाहीमध्ये जीडीपीवाढीचा दर अपेक्षेपेक्षा जास्त म्हणजेच ७.८ टक्के होता तेव्हा हे घडले. सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात परदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदारांनी भारतीय शेअर बाजारातून १२,२५७ कोटी रुपये काढले आहेत. यापूर्वी 'एफपीआय'ने ऑगस्टमध्ये शेअर्समधून ३४,९९० कोटी रुपये आणि जुलैमध्ये १७,७०० कोटी रुपये काढले होते. यासह डिपॉझिटरी डेटानुसार २०२५ मध्ये आतापर्यंत परदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदारांनी शेअर्समधून एकूण १.४३ लाख कोटी रुपये काढले आहेत. भांडवल प्रवाहाच्या कमतरतेमागे अनेक जागतिक आणि स्थानिक कारणे असू शकतात. त्यात जागतिक आर्थिक अनिश्चितता, भू-राजकीय तणाव, उच्च व्याजदर आणि देशांतर्गत धोरणांमध्ये बदल या कारणांचा समावेश असू शकतो. गुंतवणूकदार जोखीम घेण्यास टाळाटाळ करतात आणि उच्च-जोखीम किंवा अस्थिर बाजारपेठांमधून गुंतवणूक काढून घेऊ शकतात. याव्यतिरिक्त काही देशांमध्ये गुंतवणुकीचे मुद्रीकरण नसणे किंवा गुंतवणुकीसाठी उपलब्ध असलेल्या आर्थिक साधनांचा अभावदेखील भांडवल प्रवाहात अडथळा आणतो. आर्थिक संकट किंवा भू-राजकीय तणावाच्या काळात, परदेशी गुंतवणूकदार आणि देशांतर्गत एजंट दोघेही आपली गुंतवणूक कमी करतात आणि भांडवल सुरक्षित ठिकाणी हलवतात. त्यामुळे भांडवल प्रवाहात घट होते.

जास्त व्याजदर असलेले देश अधिक भांडवल गुंतवणूक आकर्षित करू शकतात; परंतु मध्यवर्ती बँकेने धोरणे बदलल्यास भांडवल प्रवाहात चढ-उतार होऊ शकते. भांडवल प्रवाह नियंत्रित करणाऱ्या काही देशांची धोरणे किंवा वित्तीय बाजारपेठेतील नियामक अडथळे परकीय भांडवल आकर्षित करत नाहीत. जसे चीनच्या बाबतीत दिसून आले आहे. एखाद्या देशाची आर्थिक वाढ







परकीय भांडवल प्रवाहाशी सुसंगत न राहिल्यास किंवा अस्थिर राहिल्यास गुंतवणूकदार अशा संधींपासून दूर जाऊ शकतात. खासगी इक्विटी आणि व्हेंचर कॅपिटल गुंतवणुकीमुळे नवीन गुंतवणूक कमी होऊ शकते. कारण गुंतवणूकदार त्या गुंतवणुकींमधून नफा रोखतात. अमेरिका आणि चीनसारख्या प्रमुख आर्थिक गटांमध्ये जागतिक विभागणीदेखील भांडवल प्रवाह कमी करू शकते. कारण विकसनशील देश बहुतेकदा असुरक्षित असतात आणि त्यांना बाजू घेण्यास भाग पाडले जाते. त्यामुळे त्यांना भांडवलापर्यंत पोहोचण्यास मर्यादा येतात. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी वेगवेगळ्या देशांच्या संदर्भात वाढीव आयात शुल्कांबाबत अमलात आणलेल्या धोरणाबाबत अमेरिकेतच कायदेशीर गुंता निर्माण झाला. ट्रम्प यांनी ९० देशांविरोधात आयात शुल्काची करवत चालवली असून त्यासाठी 'इंटरनॅशनल इमर्जन्सी इकॉनॉमिक पॉवर्स क्ट'चा अवलंब केला. त्याविरोधात अमेरिकेच्या फेडरल सर्किटच्या अपिलीय न्यायालयाने सात विरुद्ध चार मतांनी नापसंती व्यक्त केली आहे. मात्र यावर अद्याप न्यायालयाचे अंतिम शिक्कामोर्तब व्हायचे आहे. या प्रकारचे धोरण राबवण्याचा अधिकार अध्यक्षांना आहे की नाही, हा खरा प्रश्न आहे.

आपल्या अविचारी आणि बेमुर्वतखोर धोरणांमुळे ट्रम्प यांनी जगाला अगोदरच खड्ड्यात घातले आहे. जागतिक व्यापारात घट झाली असून शेअर बाजारांनी आपटी खाल्ली आहे. शेअर बाजार कोसळतात, तेव्हा सोन्याचे भाव गगनाला भिडतात. सोन्याचा भाव प्रति दहा ग्रॅमला ९९,५०० ते १,१०,००० रुपयांच्या दरम्यान खालीवर होत राहील. मात्र पुढील वर्षाच्या पहिल्या सहामाहीमध्ये तो सव्वालाख रुपयांवर जाऊ शकेल, असा अंदाज आयसीआयसीआय बँकेच्या संशोधनाने व्यक्त केला आहे. सध्या सोन्याचा भाव प्रति दहा ग्रॅम एक लाख पाच हजाराच्या वर आहे. भारत रशियाकडून मोठ्या प्रमाणात तेल खरेदी करत असल्यामुळे अमेरिकेने भारतावर अतिरिक्त शुल्क लादले. अमेरिकन सरकारचे व्यापार सल्लागार पीटर नाव्हारो यांनी तर भारताविरोधात वक्तव्यांचा भडिमारच सुरू केला. भारत रशियाकडून तेल खरेदी करून फायदा कमावत आहे. रशियाने युक्रेनवर आक्रमण करण्यापूर्वी भारत रशियाकडून कोणतेही तेल खरेदी करत नव्हता, अशी टीका नाव्हारो यांनी केली. मात्र खुद्द अमेरिका रशियाकडून अब्जावधी डॉलर्सचा माल आणि युरेनियम आयात करत असताना, भारताला उपदेश करण्याचा नैतिक अधिकार या देशाला कसा मिळतो, असा प्रश्न अमेरिकन अब्जाधीश एलन मस्क यांनी नाव्हारो यांना विचारला आहे.

ट्रम्प यांची धोरणे मनमानी पद्धतीची असतात. अमेरिका जगभरात जितकी निर्यात करते, त्यापेक्षा किती तरी जास्त आयात जगातील विविध देशांमधून अमेरिकेत होत असते. २०२४ मध्ये यातील तफावत एक लाख २० हजार कोटी डॉलर्स इतकी होती. ही व्यापारतूट भरून काढण्यासाठी अमेरिकेत विकल्या जाणाऱ्या आणि भारतासारख्या देशांमध्ये निर्माण होणाऱ्या आयात वस्तूंवर अधिक कर लावायला पाहिजे, हे ट्रम्प यांचे मत. ट्रम्प यांची समजशक्ती कमी आहे की ते जाणीवपूर्वक हा युक्तिवाद पुढे रेटत आहेत, ते कळायला मार्ग नाही. कारण या अमेरिकन व्यापारतुटीच्या रकमेच्या दुप्पट निर्यात अमेरिकेतर्फे इतर देशांमध्ये होत असते. या सर्व देशांना अमेरिकन कंपन्यांकडून मिळणाऱ्या सेवांचे, अमेरिकन विद्यापीठांमधून अन्य देशांमधील विद्यार्थी फीच्या माध्यमातून मोजत असलेले मूल्य कित्येकपट जास्त आहे. त्यामुळे ट्रम्प यांचे तर्कटच चुकीचे आहे. शिवाय गेल्या काही महिन्यांमध्ये अमेरिकेकडून भारताने एफ-३५ विमाने, स्ट्रायकर युद्धवाहने, प्रिडेटर ड्रोन्स, खनिज तेल, नैसर्गिक वायू, द्रवीभूत वायू, लहान अणुभट्ट्या, रोबो तसेच क्वांटम/बायोटेक/सेमिकंडक्टर तंत्रज्ञानासाठी आवश्यक घटक इत्यादी खरेदी करण्याचे मान्य केले. अमेरिकन बर्बन व्हिस्की आणि वाइन्सवर भारताने करकपात केली. अमेरिका आणि भारत यांच्यातील दहा हजार कोटी डॉलर्सची व्यापारतूट कमी व्हावी यासाठी ट्रम्प यंच्या या मागण्या आपण मान्य केल्या. एवढे करूनही त्यांचे समाधान झाले नाही.

चालू आर्थिक वर्षांच्या एप्रिल ते जून या तीन महिन्यांमध्ये भारतातील थेट परकीय गुंतवणूक १५ टक्क्यांनी वाढून १८ अब्ज डॉलरवर गेली. उल्लेखनीय गोष्ट म्हणजे अमेरिकेतून आलेला गुंतवणुकीचा प्रवाह या काळात जवळपास तिप्पट होऊन साडेपाच अब्ज डॉलरवर गेला. अर्थात अमेरिकेची शुल्कवाढ १ ऑगस्टपासून लागू झाली आणि ऑगस्टअखेरीस त्यात आणखी वाढ झाली. त्यामुळे त्याचा फटका नंतरच्या तिमाहीमध्ये बसल्याचे दिसूनही येईल. २०२१ ते २०२४ या कालावधीत भारताची अर्थव्यवस्था जगात सर्वाधिक गतीने, म्हणजे ८.२ टक्क्यांनी वाढली. व्हिएतनाम ५.८ टक्के, चीन ५.५ टक्के, मलेशिया ५.२ टक्के, इंडोनेशिया ४.८ टक्के, ब्रिटन ३.७ टक्के, अर्जेंटिना ३.१ टक्के, अमेरिका-ब्राझिल-मक्सिको ३.६ टक्के, युरोपियन युनियन २.८ टक्के असा विकासदर होता. आज भारतात परदेशी भांडवलाची कमी आवक होते. मनमोहन सिंग सरकारच्या काळात, २००७-०८ मध्ये भारतात १०७ अब्ज डॉलर्सचे परकीय भांडवल आले होते. उलट, २०२४-२५ मध्ये फक्त १८ अब्ज डॉलर्स इतकेच परकीय भांडवल आले. स्वतःची पाठ थोपटून घेणाऱ्या नरेंद्र मोदी सरकारने या विसंगतीचा विचार केला पाहिजे.

✦✦✦

# कार्की आव्हान पेलणार?

**नेपाळच्या हंगामी पंतप्रधान म्हणून सुशीला कार्की यांच्यापुढे मोठे आव्हान उभे असणार आहे. त्यांच्या सरकारमध्ये कोणत्याही राजकीय पक्षाचा नेता किंवा पदाधिकारी असू नये, अशी अट 'जनरेशन झेड' या संघटनेने घातली. नव्या सरकारमध्ये जनरन झेड सहभागी होणार नाही पण सल्लागार गट म्हणून भूमिका बजावणार आहे. अशा परिस्थितीत अवघा देश पुन्हा उभा करण्याचे आव्हान त्यांना पेलावे लागणार आहे.**

दृष्टीक्षेप

अजय तिवारी

भारताचा शेजारी देश असलेल्या नेपाळमधे 'जनरेशन झेड' या बॅनरखाली युवाशक्तीने क्रांती घडवली. भ्रष्टाचार, बेकारी, महागाई, घराणेशाही आणि राज्यकर्त्यांचे विलासी जीवन या विरोधात लक्षावधी युवकांनी रस्त्यावर येऊन प्रक्षोभ प्रकट केला. जाळपोळ, हिंसाचार, रस्ता रोको, लुटमार, अशा घटनांनी पाच दिवस नेपाळ धगधगत होते, अखेर पंतप्रधान के. पी शर्मा ओली यांना राजीनामा देऊन दूर जावे लागले. संतप्त निदर्शकांनी सरकारमधील अनेक मंत्र्यांचा पाठलाग करून लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. माजी पंतप्रधानांच्या पत्नीला आगीच्या लोळात सोपवण्यापर्यंत दंगलखोरांची मजल गेली. अनेक मंत्र्यांची घरे, पंतप्रधानांचे निवासस्थान, राष्ट्रपतींचे निवासस्थान, संसद भवन, बँका, पंचतारांकीत हॉटेल्सची तोडफोड, जाळपोळ झाली. हजारोंच्या हिंसक जमावापुढे पोलीसही हतबल झाले. अखेर नेपाळमधे सत्तापालट झाला आणि माजी सरन्यायाधीश सुशीला कार्की यांना राष्ट्रपतींनी हंगामी पंतप्रधान म्हणून शपथ दिली. सुशीला कार्की या नेपाळच्या पहिल्या महिला पंतप्रधान आहेत. त्यांनी येत्या सहा महिन्यांमध्ये देशात सार्वत्रिक निवडणुका घेण्याची घोषणा केली आहे. नेपाळच्या इतिहासात युवाशक्तीने केलेल्या क्रांतीतून प्रथमच सत्तापालट घडवला गेला. अर्थात या सर्व घडामोडी मागे सरल्यानंतर आता नेपाळमध्ये कायद्याचे राज्य प्रस्थापित करण्याचे आणि सर्वांना सोबत घेऊन पुढे जाण्याचे आव्हान हंगामी सरकारपुढे आहे. हे आव्हान कार्की आणि सत्तेतले इतरेजन कसे पेलतात आणि त्याचा भारत-नेपाळ संबंधांवर काय परिणाम होतो, हे येत्या काळात पहावे लागणार आहे.




सत्ताबदलानंतर हंगामी पंतप्रधान म्हणून सुशीला कार्की यांचे नाव पुढे आले तेव्हा सर्वांना आश्चर्यच वाटले. नेपाळमधील लक्षावधी तरूणाईचे प्रेरणास्थान असलेले बालेन शाह हे पंतप्रधान होतील आणि जनरेशन झेड त्यांच्या नावाला मान्यता देईल, असा सर्वांचा समज होता. पण हंगामी पंतप्रधान होण्यास बालेन शाह राजी नसल्यामुळे सुशीला कार्की यांचे नाव पुढे आले. सुशीला कार्की यांच्या नव्या सरकारमधे कोणत्याही राजकीय पक्षाचा नेता किंवा पदाधिकारी असणार नाही, अशी अट 'जनरेशन झेड' या संघटनेने घातली. सुशीला कार्की यांना राष्ट्रपती रामचंद्र पौडेल यांनी राष्ट्रपती भवनात शीतल निवास येथे पंतप्रधानपदाची शपथ दिली. जनरेशन झेड च्या निषेध मोर्चाला पाठिंबा देणाऱ्या काठमांडूचे महापौर बालेन शाह यांनीही सुशीला कार्की यांच्या नावाला पाठिंबा दिला. नव्या सरकारमधे जनरेशन झेड सहभागी होणार नाही, पण सल्लागार गट म्हणून भूमिका बजावणार आहे. सुशीला कार्की या ७३ वर्षांच्या आहेत. भारतातील वाराणसीच्या बनारस हिंदू विद्यापीठातून त्यांनी शिक्षण घेतले आहे. त्यांनी त्रिभुवन विद्यापीठातून कायद्याचे शिक्षण घेतले आणि १९७९ मध्ये वकिली सुरू केली. २००६ मध्ये नेपाळच्या संविधानाचा मसुदा तयार करण्यासाठी स्थापन केलेल्या मदोसा समितीच्या त्या सदस्या होत्या. २०१६ मध्ये त्या प्रथम कार्यवाहक न्यायाधीश आणि नंतर सरन्यायाधीश झाल्या. पोलिसांच्या नियुक्त्यांमधे झालेल्या राजकीय हस्तक्षेपाच्या विरोधात त्यांनी एक निर्णय दिला. जून २०१७ मध्ये निवृत्तीच्या आधी त्यांच्यावर महाभियोग चालवण्यात आला आणि पदावरून हटवण्यातही आले.



भारताचा सख्खा शेजारी असलेला नेपाळ कम्युनिस्ट विचारप्रणालीच्या अधिन गेल्यापासून या देशात अस्थिरता आणि अशांतता आहे. चीनच्या दबावाखाली आणि प्रभावाखाली नेपाळचा कारभार चालू आहे असे आरोप गेले काही वर्षे उघडपणे केले जात आहेत. देशात राजेशाही संपुष्टात आल्यावर स्थिर सरकार मिळेल, रोजगाराच्या संधी वाढतील, विकासाला वेग येईल, अशी येथील तरूणाईची अपेक्षा होती. प्रत्यक्षात सरकार बदलले तरी देशात अस्थिरता कायम राहिली आहे. गेल्या सतरा वर्षांमध्ये पंधरा वेळा सरकारे बदलली. राज्यकर्ते म्हणून तीन राजकीय पक्षांचा आलटून पालटून खेळ चालू असल्याचे दिसून आले. या खेळात भ्रष्टाचार तर शिगेला पोहोचला. राज्यकर्त्यांचे आणि राजकीय नेत्यांचे सगेसोयरे आणि परिवारातील लोक विलासी आणि श्रीमंती जीवन जगत आहेत आणि आम जनता मात्र गरीबीशी झुंज देऊन लढत आहे, हे वास्तव आहे. गरीब जनतेला दोन वेळा जेवायला पुरेसे अन्न कमावता येत नाही आणि नेत्यांची मुले शिक्षणाला आणि मौजमजा करायला विदेशात जात आहेत, अशा पोस्ट सोशल मिडियावर सतत व्हायरल होत असतात. नेपाळमध्ये रोजगार नाही म्हणून रोज नेपाळी तरूणांचे लोंढे अन्य देशांमध्ये जात आहेत आणि राजकीय पुढाऱ्यांची मुले पंचतारांकीत जीवनशैलीत रममाण आहेत. यातून तरूणांमध्ये असंतोष वाढला आणि गेल्या आठवड्यात तो आक्रोश नेपाळमधील रस्त्यांवर प्रकट झाला.

हे वास्तव असतानाही भारताने आणि अमेरिकेने देशातील तरूणांना कम्युनिस्ट सरकारच्या विरोधात उचकावले असल्याच्याही बातम्या पेरल्या गेल्या. पण सत्तापालट झाल्याशिवाय आंदोलन थांबण्याची चिन्हे दिसेनात तेव्हा के. पी. शर्मा ओली यांनी पंतप्रधानपदाचा राजीनामा दिला. माजी पंतप्रधान शेरबहादूर देऊबा यांच्या घरात घुसून निदर्शकांनी आग लावली. या हिंसेमध्ये त्यांच्या पत्नी होरपळल्या. नेपाळमध्ये हिंसाचार आणि अराजकतेने टोक गाठल्याचे हे उदाहरण आहे. सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणाऱ्या जमावावर पोलिसांनी गोळाबीर केला, त्यात पन्नासहून अधिक तरूणांचा बळी गेला तर बाराशेहून अधिकजण जखमी झाले. फेसबुक, इंस्टाग्राम सह देशातील २६ सोशल मिडिया प्लॅटफॉर्म्सवर ओली सरकारने बंदी घालून तरूणांच्या रोषाचा आग्या मोहोळ आपल्या अंगावर ओढवून घेतला. निदर्शकांकडून दिवसा ढवळ्या सरकारी संपत्तीची राख रांगोळी होत असताना मंत्र्यांना अंगावरच्या कपड्यांनिशी पळ काढावा लागला, यापेक्षा दुर्दैव कोणते असू शकते? काठमांडुतील रस्त्यावर उतरलेल्या तरूणांच्या जमावाने राष्ट्रपती भवन किवा पंतप्रधान कार्यालयाचा ताबा घेतला. परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेल्यामुळे राष्ट्रपतींना घाई करून नवे हंगामी सरकार स्थापन करणे भाग पडले. रस्त्यावर उतरून सरकारच्या विरोधात आंदोलन करणारे युवक हे सर्व पंधरा ते तीस वयोगटातील होते. विशेष म्हणजे शाळेतील हजारो मुले मुली शालेय युनिफॉर्ममध्ये पाठिवर दप्तर घेऊन रस्त्यावर उतरून सरकारच्या विरोधात घोषणा देत होते.

हजारो तरूण आणि विद्यार्थी सरकारच्या विरोधात रस्त्यावर उतरतात तिथे सरकार टिकत नाही, हा आजवरचा जगभरातला अनुभव आहे. तोच अनुभव काठमांडूतील आंदोलनातून जगाला पहायला मिळाला. तीन कोटी लोकसंख्येच्या नेपाळमध्ये १५ ते ३० वयोगटातील युवाशक्ती ३५ टक्क्यांहून अधिक आहे. त्यामुळे त्यांच्या भावनांकडे आणि मागण्यांकडे दुर्लक्ष करणे कोणत्याच सरकारला परवडणारे नाही. भ्रष्टाचाराने कळस गाठला असताना आणि त्याविरोधात तरूणाईमध्ये असंतोष खदखदत असताना ओली सरकारने इंटरनेट बंद करून आगीत तेल ओतण्याचे काम केले. जनरेशन झेडच्या आंदोलनामागे कोणी नेता नव्हता. काठमांडुतील आंदोलन नेपाळमधील ७७ जिल्ह्यांमध्ये पसरले, पण त्याचे नेतृत्व करणारा कोणी एक चेहरा नव्हता. भ्रष्टाचार, बेरोजगारी आणि महागाईच्या खाईत सापडलेल्या नेपाळमधील संतप्त तरूणाईचा आक्रोश रस्त्यावर दिसला. जे बांगलादेश, श्रीलंकामध्ये घडले, तसाच उद्रेक नेपाळमध्ये बघायला मिळाला. बांगलादेशमध्ये उठाव झाल्यानंतर शेख हसीना यांना पंतप्रधानपदाचा राजीनामा देऊन पळ काढावा लागला. तेथे मोहमंद युनूस हंगामी सरकार चालवत आहेत. नेपाळमध्ये के. पी. शर्मा ओली यांना राजीनामा देऊन पायउतार व्हावे लागले. आता नेपाळमधे शांतता आणि सुव्यवस्था निर्माण करणे हे देशाच्या पहिल्या महिला कारभारी सुशीला कार्की यांच्यापुढील मोठे आव्हान आहे. नेपाळमधील घडामोडींवर भारत, चीन व अमेरिकेचे बारीक लक्ष आहे. मात्र एखादे राष्ट्र अशा प्रकारे अडचणीत आणण्याची आणि राजवट उलथवून टाकण्याची खेळी जगात सतत खेळली जात आहे, याची गंभीर नोंद जगाने घ्यायला हवी.

✦✦✦

# पुत्र व्हावा ऐसा...



आपल्या आईवडिलांची काळजी घेणे हे त्यांच्या मुलांचे केवळ कौटुंबिक, नैतिक कर्तव्य नसून,ती कायदेशीर जबाबदारी देखील आहे. मुले त्रास देतात म्हणून जर आईवडिलांनी त्यांच्याविरुद्ध तक्रार केली तर मुलांवर कायदेशीर कारवाई होऊ शकते.अशा कारवाया झाल्याच्या बातम्या अधूनमधून वाचनात येतात आणि वाईट वाटते. एकत्र कुटुंब व्यवस्था हे वैशिष्ट्य असलेला भारत कुठे हरवत चालला आहे, कुठे जाईल, पुढे आणखी काय काय होईल,अशी चिंता वाटू लागते. पण काही आशेचे किरण दिसतात आणि वाटते, सर्वच काही अंधारलेले नाहीय.

असाच मला दिसलेला आशेचा किरण म्हणजे मनोज भोयर आहे. उत्कृष्ट टीव्ही आणि डिजिटल पत्रकारितेबद्दल मनोजला विदर्भ गौरव प्रतिष्ठान आणि नागपूर श्रमिक पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने देण्यात येणारा अनिलकुमार स्मृती पुरस्कार नुकताच नागपूर येथे मुख्य माहिती आयुक्त राहुल पांडे यांच्या हस्ते आणि वनराईचे अध्यक्ष गिरीश गांधी, प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रदीप मैत्र यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला. या बद्दल मनोजचे मनःपूर्वक अभिनंदन.

मनोज माध्यम जगतात गेली २५ वर्षे चमकदार कामगिरी करीत आहे. पण मला तो केवळ त्याच्या व्यावसायिक कामगिरीमुळे भावतो असे नाही तर तो अधिक भावतो ते, तो प्रखर मातृपितृ भक्त आहे म्हणून. हा पुरस्कार स्वीकारताना त्याच्या सोबत तत्वनिष्ठ, विद्यार्थीप्रिय राहिलेले ८० वर्षांचे शिक्षक वडील भीमराव भोयर आणि आई देखील होती, हे विशेष. इतकेच काय, काही काळापूर्वी सिंगापूर येथील शब्द साहित्य संमेलनाचा उद्घाटक म्हणून मनोज गेला असताना, वडिलांची विमानात बसण्याची इच्छा पूर्ण करण्यासाठी तो या संमेलनासाठी आईवडिलांनाही सोबत घेऊन गेला होता. त्यांना केवळ विमान प्रवासच घडवून आणला नाही तर एक परदेश ही दाखवून आणला.

मनोजच्या वडिलांनी त्यांची शिक्षणक्षेत्रातील वाटचाल, त्यांनी केलेले प्रयोग, शिक्षणविषयक विचार असलेले 'शिक्षणवाटा चोखाळताना' हे पुस्तक लिहिले आहे. या पुस्तकाला त्यांचे मित्र डॉ. अभय बंग यांची प्रस्तावना लाभली.

'पद्मगंधा' ने प्रकाशित केलेल्या या पुस्तकाचे मनोजने मुंबई मराठी पत्रकार संघात शानदारपणे प्रकाशन केले होते. मी देखील या कार्यक्रमास उपस्थित होतो. पुढे हे पुस्तक वाचून प्रभावित झाल्याने मी या पुस्तकाचे परीक्षण देखील लिहिले होते.

मनोजचे बाबा वाटखेडा या गावात जन्मलेले. तिथेच ते चौथी पर्यंत शिकले. महात्मा गांधी यांच्या विचारातून सेवाग्राम येथे स्थापन करण्यात आलेल्या 'नई तालीम' शाळेत ते लोकांच्या मदतीने शिकायला गेले. ज्येष्ठ गांधीवादी स्व. ठाकूरदास बंग यांचे चिरंजीव, ज्येष्ठ समाजसेवक डॉ. अभय बंग यांच्याशी त्यांची झालेली मैत्री आजही कायम आहे.

मनोजच्या बाबांना त्यांचा खूप सहवास लाभला. त्यांच्यासोबत त्यांनी अनेक राज्यात दौरे केले. ग्रामीण भागातील शिक्षण आणि आरोग्य हे विषय मनोजच्या बाबांच्या अतिशय जिव्हाळ्याचे आहेत. त्यांनी स्वावलंबनाला सतत महत्व दिले.

या गोष्टींचा मनोजच्या विचारांवर आणि आयुष्यावर फार प्रभाव पडलेला आहे. विद्यार्थ्यांना अधिक वेळ देता यावा म्हणून ते नोकरीच्या गावीच रहात असत. फक्त आठवड्यातून एकदा घरी यायचे. त्यामुळे सर्व वेळ मनोजची आईच मुलांना सांभाळायची.त्यामुळे तिचे योगदान या भावंडांच्या जीवनात अनन्यसाधारण आहे.



मनोज नोकरीनिमित्त मुंबईत असला तरी त्याचे सर्व लक्ष आईवडिलांकडे लागलेले असते. इतके दूर राहूनही त्यांच्यासाठी जे जे काही करता येईल ते ते तो करीत असतो. त्यांना थोडे जरी काही झाले तरी, लगेच त्यांच्याकडे धाव घेतो. आजच्या २४ तास चालू असणाऱ्या माध्यमसृष्टीत हातची कामे सोडून किंवा व्यवस्थित मार्गी लावून अचानक गावाकडे निघावे लागणे किती त्रासदायक असू शकते, याची कल्पनाही करवत नाही.



अशी ही आईवडिलांशी, आपल्या मुळाशी नाळ तुटू न देता, प्रसार माध्यमांच्या आजच्या भाऊ गर्दीत स्वतःची वेगळी ओळख,वेगळी प्रतिमा निर्माण करणाऱ्या मनोजचा इथवरचा प्रवास सोपा नव्हता. त्याचे वडील जिल्हा परिषदेत शिक्षक असल्याने त्यांची कायम बदली होत असे.

त्याची पहिली चार वर्षे कुटुंबासोबत वर्धा जिल्ह्यातल्या कांढळी गावात गेली.पण शिक्षणाच्या दृष्टीने मुलांची आबाळ होऊ नये म्हणून वडिलांनी वर्धा शहरात कुटुंब हलविण्याचा निर्णय घेतला. त्यांचा हा निर्णय मनोज आणि त्याच्या भावंडांच्या भावी जीवनासाठी खूपच महत्वाचा ठरला.

देवेंद्र भुजबळ
९८६९४८४८००

मनोज वर्धा शहरातील संपन्न सामाजिक आणि सांस्कृतिक वातावरणात वाढला. तिथेच त्याचे महाविद्यालयीन शिक्षण झाले. महाविद्यालयीन जीवनातच तो लोकमतचा कॉलेज प्रतिनिधी झाला. तसा त्याही पूर्वी तो स्थानिक वर्तमानपत्रात बातम्या आणि लेख लिहीत असे. यामुळे त्याची पत्रकारितेची आवड वाढत गेली. एका अर्थाने पत्रकारितेचे बाळकडू मनोजला वडिलांकडून मिळाले, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

कारण ते त्याला सभा, संमेलने, भाषणे, शिबिरे, सांस्कृतिक कार्यक्रम यासाठी सतत सोबत नेत असत. त्यामुळे मनोजचा पत्रकारितेचा दृष्टिकोन व्यापक होत गेला.सामाजिक,राजकीय प्रश्नांची जाण येत गेली. त्यामुळे त्याने स्वतःची आवड ओळखून त्याने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या जगप्रसिद्ध रानडे इन्स्टिट्यूट मधून पत्रकारितेचे शिक्षण घेतले.

मनोजने पुण्यातच दैनिक लोकमत मध्ये काही काळ काम केले. पण त्याला ओढ होती ती टीव्ही पत्रकार बनण्याची. म्हणून त्याने पुणे सोडले आणि मुंबई गाठली . मुंबईत मनोजने मॅक्स महाराष्ट्र डिजिटल वाहिनीच्या संपादक पदाची जबाबदारी तर सांभाळलीच पण त्याशिवाय राजकीय, सामाजिक, साहित्यिक आणि अन्य क्षेत्रातील व्यक्तींच्या मुलाखती घेतल्या. राजकीय विश्लेषण करणाऱ्या 'टू द पॉईंट' या कार्यक्रमाचे संचालन केले. २०२४ च्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रभर दौरा करून शेतकऱ्यांशी आणि सामान्य माणसांशी संवाद साधत 'त्यांच्या जीवनमरणाच्या प्रश्नांवर ग्राऊंड झिरो' चे सादरीकरण केले.

मॅक्स महाराष्ट्र आधी मनोज लोकशाही वृत्त वाहिनीच्या आउटपुट विभागाचा संपादक होता. तर तत्पूर्वी जय महाराष्ट्र वृत्त वाहिनीत तो ५ वर्षे डेप्युटी एडिटर होता. या दरम्यान त्याने 'दिलखुलास ' हा राजकीय आणि सामाजिक नेत्यांच्या मुलाखतींचा कार्यक्रम सादर केला. विविध राज्यांच्या विधानसभा निवडणुकीचे विशेष वार्तांकन केले.

कोरोना काळात मनोजने 'टार्गेट कोरोना' या विशेष कार्यक्रमाची निर्मिती करून राज्यातील कोविड योद्धयांच्या आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या मुलाखती घेऊन त्यांचे प्रेरणादायी काम समाजासमोर प्रभावीपणे मांडून लोकांना धीर देण्याचे मोठे काम केले.

सहारा समय या राष्ट्रीय वृत्त वाहिनीत रिपोर्टर ते ब्युरो चीफ म्हणून मनोजने १० वर्षे काम केले. या काळात त्याने विधानसभा, लोकसभा निवडणूक वार्तांकन, सामाजिक आशयाच्या वृत्तकथा, अन्य मुलाखती घेण्याबरबरच गडचिरोलीच्या जंगलात जाऊन थेट नक्षलवाद्यांची मुलाखत घेण्याचे जीवघेणे धाडस केले आहे. याशिवाय त्याने ईटीव्ही, समय, न्यूज वर्ल्ड इंडिया आदी वाहिन्यांमध्ये देखील उल्लेखनीय काम केले आहे.

त्याने गुजरात दंगल, मुंबईतील बॉम्बस्फोट आणि त्यांचे न्यायालयीन खटले याचे वार्तांकन, महाराष्ट्र, गुजरात,राजस्थान या राज्यातील महत्वाच्या राजकीय घटनांचे वार्तांकन, उत्तरप्रदेश,केरळ, पंजाब,लेह लडाख आदी राज्यात जाऊन तेथील वार्तांकन केले आहे.

आपल्या वाहिनीतील जबाबदाऱ्या निर्भिडपणे, सक्षमपणे पार पाडीत असतानाच मनोजने पुणे, सोलापूर विद्यापीठ आणि अन्य ठिकाणी नवोदित पत्रकारांच्या कार्यशाळेत मार्गदर्शन केले आहे. पुणे इथे २०१७ साली तर इंदोर येथे २०१८ साली झालेल्या राष्ट्रीय पत्रकार परिषदेत त्याने व्याख्याने दिली आहेत.

महाविद्यालयीन जीवनापासून वेगवेगळ्या सामाजिक, साहित्यिक आणि पर्यावरणाशी संबधित संस्थासोबत मनोज काम करीत आला आहे. मनोजला मिळालेले महत्वाचे पुरस्कार म्हणजे नांदेड श्रमिक पत्रकार संघाचा पुरस्कार, बाबुलाल पराडकर पत्रकारिता पुरस्कार, अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या वणी येथील संमेलनात पत्रकारिता पुरस्कार, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती वर्धा दीपस्तंभ पुरस्कार आदी होत.

नव्याने पत्रकारितेत येणाऱ्या विद्यार्थ्यांना मनोजचे अत्यंत कळकळीचे सांगणे आहे की, मुळात या क्षेत्राची आवड असेल तरच हे क्षेत्र निवडा.या क्षेत्रात भरपूर संधी आहेत, तशी आव्हाने देखील खूप आहेत. पण आवड नसेल तर तुम्हाला येणाऱ्या अडचणींवर मात करता येणार नाही. तुम्ही थकून जाल.

केवळ ग्लॅमर आहे म्हणून पत्रकारितेचा विचार करू नका. त्यासाठी लागणारा अभ्यास, जनसंपर्क याचीही तयारी ठेवा. अन्यथा आईवडिलांचे मेहनतीचे पैसे तर तुमची उमेदीची वर्षे वाया जातील. पत्रकारितेचे उत्तम शिक्षण देणाऱ्याच महाविद्यालये, विद्यापीठे, संस्थांमध्ये शिक्षण घ्या, कारण आता खूप ठिकाणी पत्रकारितेचे अभ्यासक्रम शिकवले जातात पण त्यांना अजिबात दर्जा नसतो.

आपली नोकरी, सांसारिक जबाबदारी उत्तमपणे निभावत असतानाच सतत सामाजिक बांधिलकी जोपासून वाटचाल करीत असलेल्या मनोजला आणि त्याला सतत साथ देणाऱ्या त्याच्या परिवाराला आनंदी आणि आरोग्यदायी जीवनासाठी हार्दिक शुभेच्छा.

■ ■ ■

# पितृपक्ष किंवा हडपक



डॉ. अविनाश प. परांजपे
वानाडोंगरी, हिंगणारोड ,
नागपूर .

सद्ध्या पितृपक्ष उर्फ हडपक सुरू झाला आहे. बहुतांशी जनता या पंधरवड्याला अशुभ म्हणून मानते. असा समज आहे की या भाद्रपद पौर्णिमा पासून सुरू झालेल्या व सर्वपितरी अमावस्येला संपणाऱ्या पंधरवड्यात आपल्या पितरांचा श्राद्धविधी करण्यात येतो, त्या कारणाने आपल्या पितरांचा म्हणजेच मृत झालेले पूर्वजांचा आपल्या आसपास ह्य आत्मा स्वरुपात वावर असतो. याच कल्पनेने, आणि आत्मा शब्दाच्या लागूनच किंवा चिकटून असलेल्या भूत नावाच्या भितियुक्त अंध श्रद्धेने ग्रासून, अतृप्त आत्मा आपणास त्रास देईल, पछाडेल वगैरे अंधभीतीमुळे या पंधरवाड्यास अशुभ पणाचा टिळा लावण्यात येतो.

आता आपण याच्या मुळाशी जाण्याचं ठरवूयात. आपल्याला माहिती आहे की आपली अतिप्राचीन, पुरातन भारतीय संस्कृती ही एकत्र कुटुंब पद्धतीची आहे. प्राचीन काळा पासून आपल्या देशात कुटुंब म्हटले की घरात कमीतकमी पांच सात भाऊ, जवळ जवळ तेव्हाद्याच बहिणी, वडील, २-३ चुलते, काका, २-३ आजोबा, आज्या, २-३ काकू, ढिगभर बाळगोपाळ अशी जंत्री ठरलेलीच असायची.

परकीय आक्रमकांच्या आगमना पूर्वी देशभरातील लोक, शांतपणे एकोप्याने आपापले जीवन व्यतीत करत असत. आपापले व्यवसाय, कर्मे करत असत. याच शांतिपूर्वक जीवन पद्धतीने भारताला एक संपन्न राष्ट्र बनविले होते. ज्याची ओळख जगात या भारतभूमी मधून सोन्याचा धूर निघतो अशा शब्दात होत होती. परकीय आक्रमक भारतभूमीला सोनेकी चिडिया म्हणत असत.

काही शतकांच्या पूर्वी, इ.स. पूर्व ३३६ ते ३२३, या काळात अन्यायी, उन्मत्त, विलासी अशा मगधसम्राटाची सत्ता उलथून टाकून तेथे न्यायाचे मौर्य साम्राज्य स्थापन करून सम्राट चंद्रगुप्त मौर्य याचा सम्राटाभिषेक करणारे महागुरु आर्यचाणक्य, उर्फ आचार्य विष्णुगुप्त, उर्फ आचार्य कौटिल्य यांना सम्राट चंद्रगुप्त मौर्य याच्या शासनात एक सामाजिक महात्रुटी आढळली.

जेव्हा महागुरु आर्यचाणक्य, यांना गुप्तचरांच्या मार्फत ही बातमी समजली की ग्रीक सम्राट उर्फ युनानी सम्राट अलेक्झांडर उर्फ सिकंदर हा भारतभूमीवर आक्रमण करण्यास येत आहे. अशा आणीबाणीच्या वेळी मौर्य साम्राज्यातील महत्वाचे अधिकारी, मंत्री, सेनानायक, हे अत्यावश्यक बैठकींना अनुपस्थित असतात.

महागुरु आर्यचाणक्य यांनी खोलवर विचारणा केली असता, असे आढळले की ह्या समस्त व्यक्ति, त्यांच्या त्यांच्या कौटुंबिक पितृकार्यात म्हणजेच श्राद्धादी कार्यात व्यस्त होत्या. कारण एकत्र कुटुंबात पितृकार्य म्हणजेच श्राद्धादी कार्य हे कुटुंब प्रमुखाचीच जबाबदारी असायची.

पणजोबांचे श्राद्ध, पणजीचे श्राद्ध, दोन चार आजोबांचे श्राद्ध , दोन चार आजीचे श्राद्ध, दोन तीन चुलत्याचे श्राद्ध, चुलतीचे श्राद्ध, काकाचे श्राद्ध, काकुचे श्राद्ध, थोरल्या बंधुचे श्राद्ध, थोरल्या वाहिनीचे श्राद्ध, गणतीच करणे अवघड होऊन बसले होते. म्हणजे वर्षभरात तीनशे पासस्ट दिवसांपैकी जर हे महत्वाचे अधिकारी, मंत्री शंभर दोनशे दिवस आपल्या पूर्वजांची म्हणजेच पितरांची श्राद्धेच करत बसतील तर साम्राज्याचा कारभार कोण आणि कसा सांभाळतील? परकीय आक्रमकांचा सामना कसं करतील? अन्यथा संपूर्ण भारतवासीयांच्या श्राद्धासाठी कोण जीवंत राहील?

महागुरु आर्यचाणक्य चिंतातुर झाले. आणि त्यांनी त्यावर असा उपाय शोधला की, चैत्र मासा पासून फाल्गुन मासापर्यन्त बारा मासातील समस्त शुक्ल आणि वद्य प्रतिपदा, द्वितीयापासून चतुर्दशी आणि पौर्णिमा व अमावस्या या सर्व तिथी एकाच पंधरवड्यात सम्मिलीत करून, भाद्रपद पौर्णिमा पासून सुरू झालेल्या व सर्वपितरी अमावास्येला संपणाऱ्या पंधरवड्यात त्याचे नामामीधान पितृपक्ष करण्यात आले.

संपूर्ण वर्षभर श्राद्धविधी न करता समस्त अधिकारी व मंत्रीगणाने हे सगळे श्राद्धविधी व पितृकर्म केवळ याच पंधरवड्यात करावेत व वर्षभर केवळ आपले राष्ट्रकर्तव्य (आजच्या भाषेत ड्यूटी) करावे असा राजगुरु अध्यादेश काढला. जो आधी संपूर्ण मौर्य साम्राज्यात व नंतर संपूर्ण भारतवर्षात लागू करण्यात आला. तेव्हा पासून हा पंधरवडा पितृपक्ष उर्फ हडपक या नावाने ओळखल्या जाऊ लागला.

परंतु आपल्या रूढीवादी व परंपरावादी समाजाने. हळू हळू पुन्हा चैत्र मासापासून फाल्गुन मासापर्यन्त बारा मासातील समस्त शुक्ल आणि वद्य प्रतिपदा, द्वितीया पासून चतुर्दशी आणि पौर्णिमा व अमावस्या या सर्व तिथीना आणि शिवाय या पितृपक्ष नावाच्या पंधरवड्यात दोनहीवेळा श्राद्धविधी व पितृकर्म सुरू केलेत आणि त्याला श्राद्ध पक्ष हे जुळे नाव देऊन टाकले.

चला! दोन्ही वेळा श्राद्धविधी व पितृकर्म करून पूर्वजांना श्रद्धांजलि देताय हे मान्य करुयात, पण आपल्या आपले राष्ट्कर्तव्य (आजच्या भाषेत ड्यूटी) बद्दलचे काय? ती लाच घेतल्या शिवाय करणार?

# आपणही लोकसंख्येला नफ्यात बदलावे..

१९६२ च्या युद्धातील पराभवाच्या कटू आठवणीअजूनही आपल्याला अस्वस्थ करतात. तेव्हापासून चीनने आपल्या विस्तारवादी कारवायांमुळे ही कटुता अनेक पट वाढवली आहे. आपल्याशी झालेल्या अलीकडील संघर्षात पाकिस्तानने वापरलेली ८०% शस्त्रे चीनकडून आली होती. आपल्या देशभक्ती व राष्ट्रवादाला इतका धक्का बसला असूनही चिनी वस्तू खरेदी न करण्याच्या आवाहनाचा सामान्य भारतीयांवर कोणताही विशेष परिणाम झालेला दिसत नाही.

जोसेफ नीडहॅम या प्रसिद्ध विद्वानाने १९५४ ते २००८ दरम्यान लिहिलेल्या सायन्स अँड सिव्हिलायझेशन इन चायना या २७ खंडांच्या ग्रंथात दाखवून दिले की, इ. स.पूर्व पहिल्या शतकापासून ते पुढील १५ शतकांपर्यंत चिनी विज्ञान, तंत्रज्ञान व सभ्यता पश्चिमेपेक्षा खूप पुढे होती. या काळातील पश्चिमेकडील देश मानवी जीवनाच्या व्यावहारिक गरजा पूर्ण करण्याच्या बाबतीतही चीनशी स्पर्धा करू शकले नाहीत. नीडहॅमच्या मते, चीनची ही श्रेष्ठता त्याच्या सामाजिक -सांस्कृतिक वैशिष्ट्यांमुळे होती.

१६ व्या शतकापासून २० व्या आणि २१ व्या शतकात थेट उडी मारली तर दिसून येते की, चीनने गेल्या ७५ वर्षांत आपल्या प्रचंड लोकसंख्येला १००% शिक्षित करण्यासाठी खूप मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली.

सध्या चीनमधील उच्च शिक्षणाची गुणवत्ता पश्चिमेकडील उच्च शिक्षणापेक्षा कमी नाही. ऑस्ट्रेलियन स्ट्रॅटेजिक पॉलिसी इन्स्टिट्यूटच्या मते, २०१९ ते २०२३ दरम्यान ६४ प्रमुख तंत्रज्ञानांपैकी ५७ तंत्रज्ञानांत चीनने अमेरिकेला मागे टाकले. ट्रम्प यांनी अमेरिकेत संशोधन निधी कमी केला आहे आणि अमेरिकेबाहेरील संशोधकांना तेथे काढून टाकले जात असल्याने चीन उर्वरितांनाही मागे टाकेल.

भारताचा चीनबद्दलचा राग योग्य आहे, पण आपल्या शिक्षण व्यवस्थेत सुधारणा, पश्चिमेशी व्यवहार करताना आपले हित लक्षात ठेवण्याच्या व संशोधन-विकासात खासगी क्षेत्राला सहभागी करण्याच्या बाबतीत त्यातून शिकावे लागेल.

जगातील सर्वाधिक औद्योगिक रोबोट चीनमध्ये वापरले जात आहेत. क्वांटम कम्प्युटिंग, जीन एडिटिंग आणि नवी औषधे शोधण्यात तो खूप पुढे आहे. गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये चीनने अँटीमनी, गॅलियम आणि जर्मेनियमसारखे सुपरहार्ड मटेरियल अमेरिकेत पाठवण्यावर बंदी घातली होती, जेणेकरून अमेरिकेला त्यांचा फायदा होऊ शकणार नाही. त्याशिवाय प्रगत चिप्स व मशीन्स बनवता येणार नाहीत.

चीनने आपल्या खासगी क्षेत्राला नवीन गोष्टी शोधण्यास प्रोत्साहित केले आणि निर्यातीतून मिळणारा अतिरिक्त नफा पायाभूत सुविधांत गुंतवला. अशा प्रकारे त्याने उच्च, मध्यम व निम्नस्तरीय उत्पादनात क्रांती घडवून आणली. लोकांना चीन आवडो किंवा न आवडो, त्याच्या उत्पादनांशिवाय कोणीही जगू शकत नाही.

भारताचा चीनबद्दलचा राग योग्य आहे. भारताला जागतिक स्तरावर चीनचा सामना करावा लागेल. परंतु, चीनकडून शिक्षण व्यवस्था सुधारणे, पश्चिमेशी व्यवहार करताना त्याचे हित लक्षात ठेवणे आणि संशोधन-विकासात खासगी क्षेत्राला सहभागी करून घेणे शिकावे लागेल. हा एक दीर्घकालीन प्रकल्प आहे.

चीनचे सध्याचे यश हे गेल्या पन्नास वर्षांच्या प्रयत्नांचे एकत्रित परिणाम आहेत. भारतालाही चीनप्रमाणेच त्याच्या मोठ्या लोकसंख्येचे नफ्यात रूपांतर करावे लागेल.

■ ■ ■

## कलाजगत

# अभिनव सौंदर्यदृष्टीची चौकट

छायाचित्रण हे एक स्वतंत्र कलामाध्यम आहे. छायाचित्रकार या माध्यमातून मानवी समाज व संस्कृतीतील सर्जनशीलतेची भौतिक व वैचारिक अभिव्यक्ती साकारतो. रचना, प्रकाशयोजना, रंगछटा आणि क्षणनिवड या घटकांच्या साहाय्याने उत्तम व दर्जेदार प्रतिमा टिपून, वास्तवाला नवे सौंदर्य आणि अर्थ प्राप्त करून देतो. या कलेची स्वतःची दृश्यभाषा आहे. जी केवळ तांत्रिक प्रक्रीयेपुरती मर्यादित नाही, तर ती एक सौंदर्यशास्त्र आणि संवादाची व्यापक कलाभाषा आहे.

अंबानगरी फोटो-व्हिडीओग्राफर्स असोसिएशनच्या वतीने अमरावती येथील श्री संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवनाच्या कला दालनात राज्यस्तरीय छायाचित्र प्रदर्शन भरविण्यात आले आहे. हे प्रदर्शन नेचर ॲण्ड वेडींग या दोन विषयात विभागले आहे. या प्रदर्शनात २०० हून अधिक छायाचित्रे प्रदर्शित करण्यात आली आहेत. हे प्रदर्शन २१ सप्टेंबर पर्यंत खुले असेल.

**निसर्गवैभवः**

निसर्ग छायाचित्रण म्हणजे केवळ कॅमेरात दृश्य टिपणे नव्हे, तर निसर्गातील सौंदर्याचा आत्मानुभव प्रकट करण्याची एक कला आहे. त्यासाठी निसर्गाला जवळून अनूभवावे लागते. निसर्गाची विविध ऋतूतील विलोभनीय रुपे, आश्चर्यचकित करणारी ठिकाणे, डोंगरदऱ्या, धबधबे, वेगवान वाहणाऱ्या नद्या, घाटवाटा, विस्तीर्ण शुष्क पानझडी वने, घनदाट, मिश्र व सदाहरित वनांनी व्यापलेला विदर्भ प्रदेश, दवबिंदूंची नाजूक चमक, वाऱ्यावर डुलणारे गवत, फुलांवर थिरकणारी फुलपाखरे, सुर्योदय व सुर्यास्ताची मनमोहक अदा, निळ्याशार क्षितिजाचे नयनरम्य दृश्य, दुरच्या देशांतील रोमांचकारी निसर्गसौंदर्य, पशू-पक्षांचे विश्व यासारख्या विविध विषयांवरची सर्वांग सुंदर छायाचित्रे या प्रदर्शित करण्यात आली आहेत.



ड्रोन कॅमेराद्वारे टिपलेला गर्द हिरवा डोंगराळ भूप्रदेश, पर्वतरांगांमध्ये वसलेले निवासी क्षेत्र आणि त्या गावाला पांढऱ्या शुभ्र ढगांच्या चादरीने वेढलेले चित्तथरारक दृश्य छायाचित्रण कलेचा अच्युत्त नमूना आहे. त्या प्रतिमांतील विस्तार, एकाग्रता, वैविध्य, रंगछटा, त्रिमितीदर्शन आणि संकल्पना या सर्व बाबी सुखावणाऱ्या आहेत.

नैसर्गिक छायाप्रकाशातील सूक्ष्म भेदाने निसर्गातील विविध घटकांची वीण, जुळणी, पोत स्पष्ट करुन त्या घटकांच्या प्रकृतीची जाण करुन दिली आहे. हिरवाईने नटलेला शांत, लोभस तर कधी रौद्ररुप धारण केलेल्या निसगार्तील एकमेकांत कळत नकळत मिसळलेले आकार, सूक्ष्म छटाभेद व तपशिलांतील बारकावे छायाचित्रकारांनी अचूक टिपले आहेत.

**वन्यजीव :**

वन्यजीव छायाचित्रणाचे तंत्र फार वेगळे आहे. प्राण्यांना त्यांचा नैसर्गिक अधिवासात पकडून, छायाचित्रण करणे अत्यंत कठीण असते. त्यासाठी जिद्द, संयम आणि सर्जनशीलता लागते. योग्य क्षण टिपण्यासाठी तासन्तास वाट पाहावी लागते. या प्रदर्शनात सहभागी झालेल्या छायाचित्रकारांनी देखील प्राणी जीवनातील प्रेम भवना, पशु-पक्ष्यातील वात्सल्य कलात्मकतेने टिपले आहे.



'वाईल्डबीस्ट' या जंगली प्राण्याची शिकार करण्यासाठी चित्त्यांनी केलेली एक नाट्यमय युती, उडणारा मोर आणि त्याच्या गतीमान हालचालीचा क्षण, मासेमारीच्या जाळ्यात पक्षाला अडकवण्याचे दृश्य, घरमाश्यातील प्रणय, भारतीय शैलीतील हस्तनिर्मित बैलगाडी, गुढी आणि खार, दोन काळ्या डोक्याचे गुल (क्रोइकोसेफलस रिडिबंडस), उबदार, नारिंगी रंगाच्या पार्श्वभूमीवर झाडाच्या फांदीवरील सरडा यासारख्या वन्यजीवांच्या हालचालींचे बारकाईने आकलन करुन, छायाचित्रात नैसर्गिक घटकांचा अतिशय सुचक उपयोग केला आहे. त्या सर्व प्रतिमांच्या रचनेतील चौकट, अवकाश विभाजन, प्रकाश स्त्रोत लक्ष वेधून घेतात.



सिंह आणि सिंहीण यांच्यातील प्रणय, वाघाची भेदक नजर, रुबाबदार वनराज, चित्ता-बछड्यांचा खेळ, जंगली श्वापदावर चित्त्यांचा प्रहार, बिबट, हत्ती, माकडांच्या भावमुद्रा या छयाचित्रातील सौंदर्यमुल्य प्रभावी आहे. निसर्गात वास्तव्य करणाऱ्या प्राण्यांबद्दल कुतूहल आणि कौतुकाची भावना जागृत करणारी जवळपास सर्वच छायाचित्रे नजरा खिळवून ठेवतात.

**विवाह समारंभ :**

विवाह हा मनुष्याच्या आयुष्यातील एक महत्वाचा टप्पा आहे, जो सामाजिक, भावनिक आणि धार्मिकदृष्ट्या अत्यंत महत्वाचा मानला जातो. विवाह समारंभ नाते संबंध आणि कुटुंबांना जवळ आणतात. हृदयस्पर्शी भावना, उत्साही रंग, परंपरा आणि संस्कृती यांना एकत्र जोडून आयुष्यभरासाठी आठवणी निर्माण करतात. आजच्या डिजिटल युगात विवाह समारंभाचे छायाचित्रण ही एक स्वतंत्र कलाशैली बनली आहे. समारंभातील आनंददायी क्षण, आठवणी दृश्य स्वरुपात कायमस्वरुपी जतन करुन ठेवण्यासाठी, विवाह छायाचित्रणाला विशेष महत्व प्राप्त झाले आहे.

विवाह समारंभातील पारंपरिक छायाचित्रा सोबतच कॅंडिड (नैसर्गिक) फोटोग्राफी, प्री-वेडिंग फोटोग्राफी, साखरपुडा, हळद, मेहंदी समारंभ आणि प्रसंगानुरुप लग्नाच्या दिवसातील आनंदाचे क्षण छायाचित्रकारांनी कलात्मक दृष्टी व तांत्रिक कौशल्याचा पुरेपूर वापर करुन टिपली आहेत. ती अतिशय बोलकी आणि सर्वांगसुंदर आहेत.

केळवणातील आनंददायी संवाद, विशेषतः विवाहदिनीच्या चमकदार रांगोळ्या, रंगीबेरंगी तोरण, पारंपरिक पोशाखातील वधू-वराचा प्रवेश, मंगलाष्टकादरम्यान वधू-वराच्या चेहऱ्यावरील स्मित हास्य, वधूच्या दागिन्यांमधील बारकावे, अंगठी, वरमाला परिधान, सप्तपदीला नवसांची देवाणघेवाण, नवरीला निरोप देतानांचा कुटुंबासोबतचा प्रेमळ आणि भावनिक प्रसंग अतिशय सुरेखतेने टिपला आहे.

जहाजावरील भव्य दिव्य शाही विवाह सोहळा, आकाशात रंगीबेरंगी धुराच्या वाटांचे कोरिओग्राफ केलेले प्रदर्शन, पार्श्वभूमीत सजवलेले आकर्षक स्टेज आणि एकंदरीत समारंभाचा मुड पकडून, टिपलेले छायाचित्र अप्रतिम आहे. पारंपरिक भारतीय विवाहसोहळ्यातील वेशभूषा आणि दागिन्यांमधील टिपलेला जोडप्याचा सुंदर क्लोज-अप आनंद, कोमलता आणि बंधाचा क्षण सूचित करणारा आहे तर लग्नापूर्वीच्या विधीतील टिपलेला हळदीचा सोहळा पवित्रता, शुभ्रता आणि जोडप्यासाठी नवीन जीवनाची सुरुवात यांचे प्रतीक आहे. ती सर्व छायाचित्रे तंत्र आणि सौंदर्यदृष्ट्या परिपूर्ण आहेत.

या प्रदर्शनात सहभागी झालेल्या छायाचित्रकारांमध्ये कलाकृतीत अभिनव आशय निर्माण करणारी स्वतंत्र कलादृष्टी आहे. पारंपारिक सौंदर्यशास्त्र आणि समकालीन संवेदनशीलता यांचे मिश्रण करण्याची क्षमता आहे.



आशीष यावले
नागपूर.
९९२२२९००२२

या प्रदर्शनाच्या निमित्ताने नवोदित, हौशी आणि व्यावसायिक छायाचित्रकारांच्या कला जीवनाला अविष्कृत करण्यासाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे.

---

(लेखक उपयोजित कलेचे अभ्यासक आहेत.)

# मोहक वेदिका पिंटो

बाळासाहेब ठाकरेंचा नातू ऐश्वर्य ठाकरे याच्याबरोबर निशानची या चित्रपटात वेदिका पिंटो ही भारतीय मॉडेल, नृत्यांगना आणि अभिनेत्री झळकणार आहे. ऋत्विज यांच्या 'लिग्गी' या म्युझिक व्हिडिओमुळे ती प्रसिद्ध झाली. त्यात तिने एका धाडसी, मोकळी आणि निर्भय नवरीची भूमिका साकारली. सलमान खानने हा व्हिडिओ आपल्या इंस्टाग्रामवर शेअर करून आजच्या पिढीची उर्जा आणि आत्म विश्वासाचे कौतुक केल्यामुळे वेदिका विशेष चर्चेत आली. वेदिकाने २०१९ मध्ये 'लीजेंडरी' या म्युझिक व्हिडिओमधून पहिल्यांदा प्रेक्षकांचे लक्ष वेधले. मोहक व्यक्तिमत्त्व आणि नैसर्गिक अभिनयशैलीमुळे ती लवकरच चर्चेत आली. आदित्य रॉयकपूरसोबतचा 'ऑपरेशन रोमिओ' हा तिचा पहिला चित्रपट होता. ती धर्मा प्रॉडक्शनच्या 'बॉम्बे गर्ल' या प्रोजेक्टशी जोडली गेल्याने तिला अनेक चाहते आणि फोलोअर्स मिळाले.

सोशल मीडियावर सक्रिय असलेल्या वेदिकाची फॅशन सेन्स आणि फोटोज नेहमीच चर्चेत असतात. ती मुंबईत वाढली असून शिक्षणानंतर अभिनय क्षेत्राकडे वळली. तिचा चित्रपटसृष्टीतील प्रवास सुरुवातीच्या टप्प्यात असला तरी ती लवकरच यशस्वी होणार याबाबत तिच्या चाहत्यांना खात्री आहे.



# जिंदा हू मैं!

काही दिवसापूर्वी 'सिंघम'फेम अभिनेत्री काजल अग्रवालचा रस्ते अपघातात मृत्यू झाल्याची वावटळ उठली होती. एका अपघातात काजल गंभीर जखमी झाली आणि तिचा मृत्यू झाला, अशी चर्चा सोशल मीडियावर ऐकायला मिळाली. पण ही बातमी व्हायरल झाल्यानंतर अभिनेत्रीने स्वतः पुढे येऊन या अफवांचे खंडन केले. काजल अग्रवाल नुकतीच पती गौतम किचलूसोबत मालदीवमध्ये सुट्टीवर गेली होती. तिने इन्स्टाग्रामवर सुट्टीतील फोटो शेअर केले आणि सांगितले, की मी पूर्णपणे ठीक आहे, सुरक्षित आहे. खूप चांगलं काम करते आहे. मी तुम्हाला विनंती करते की अशा खोट्या बातम्यांवर विश्वास ठेवू नका किंवा त्या व्हायरल करू नका.

# रश्मिकाचा साखरपुडा?

अभिनेत्री रश्मिका मंदाना अलिकडेच साउथ इंडियन इंटरनॅशनल मूव्ही अवॉर्ड्स २०२५ मध्ये सहभागी होण्यासाठी दुबईमध्ये गेली. दुबई विमानतळावर तिच्या अनामिकेतील हिऱ्याच्या अंगठीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. अभिनेत्रीची अंगठी पाहून सोशल मीडिया वापरकर्त्यांनी अंदाज लावला की रश्मिका आणि दाक्षिणात्य अभिनेता विजय देवरकोंडा यांनी गुपचूप साखरपुडा केला आहे. एका व्हिडिओमध्ये रश्मिका मंदाना आणि विजय देवरकोंडा न्यूयॉर्कमधील मॅनहॅटनच्या रस्त्यावर हातात हात घालून चालताना दिसत होते. तथापि, कॅमेरे पाहताच दोघांनी लगेच हात सोडले आणि हसून चाहत्यांकडे बघून हात हलवू लागले.



# गुपित उघड...

२००७ मध्ये आलेल्या 'आवारापन' या लोकप्रिय चित्रपटाचा सिक्वल लवकरच येणार आहे. विशेष म्हणजे या चित्रपटात इम्रान हाश्मी बरोबर रोमान्स करणाऱ्या अभिनेत्रीच्या नावाबद्दल गुप्तता पाळली जात होती. परंतु ३ एप्रिल २०२६ ला थिएटरमध्ये रिलीज होणाऱ्या या बहुप्रतीक्षित चित्रपटात दिशा पटनी दिसणार हे आता उघड झालं आहे. विक्रम भट्ट यांच्या या चित्रपटात दिशा पटनीला मुख्य अभिनेत्री म्हणून कास्ट केलं गेलं आहे. त्यामुळे 'आवारापन २' या सिनेमाबद्दल लोकांची उत्सुकता वाढली आहे.



# 'निशानची'मधून ऐश्वर्य ठाकरेचे बॉलीवूडमध्ये पदार्पण

ऐश्वर्य ठाकरेचा 'निशानची', अक्षयकुमारचा जॉली एलएलबी ३ आणि अजय : द अनटोल्ड स्टोरी ऑफ अ योगी हे तीन चित्रपट सध्या चर्चेत आहेत. ॲमेझॉन एमजीएम स्टुडिओज इंडिया निर्मित अनुराग कश्यप दिग्दर्शित निशानची हा मनोरंजनपट ॲक्शन, ड्रामा, रोमान्स, कॉमेडी असा फिल्मी मसाला असलेला नवा चित्रपट आहे. बाळासाहेब ठाकरे यांचा नातू ऐश्वर्य ठाकरे या चित्रपटातून बॉलीवूडमध्ये पदार्पण करत आहे. 'निशानची' मध्ये ऐश्वर्यने बबलू आणि डबलू या जुळ्या भावांची दुहेरी भूमिका साकारली आहे. त्याच्यासोबत वेदिका पिंटो, मोनिका पवार, मोहम्मद जीशान अय्यूब, कुमुद मिश्रा हे कलाकार या चित्रपटात आहेत. प्रसून मिश्रा, रंजन चंदेल आणि अनुराग कश्यप यांनी या सिनेमाची कथा लिहिली आहे.



गेल्या काही महिन्यांपासून 'जॉली एलएलबी'च्या सीक्वलची चर्चा सुरू होती. या चित्रपटात अक्षयकुमार जॉली मिश्राच्या भूमिकेत आहे तर अर्शद वारसी जॉली त्यागीच्या भूमिकेत दिसणार आहे. या चित्रपटात विनोद, ड्रामा आणि भावनांचा तडका असेल. ही एक कोर्टरूम कॉमेडी असून जॉली मिश्रा आणि जॉली त्यागी यांच्यातील मजेशीर युक्तिवाद पहायला मिळतील. या चित्रपटात हुमा कुरेशी, अमृता राव आणि गजराज राव यांच्याही भूमिका आहेत.

'अजय : द अनटोल्ड स्टोरी ऑफ अ योगी' हा योगी आदित्यनाथ अर्थात अजयसिंह बिष्ट यांच्या जीवनावर आधारित चरित्रपटदेखील प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेत आहे. हिमालयातील एका छोट्या गावातून सुरुवात करून संन्यासी, आध्यात्मिक नेता आणि पुढे उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री होईपर्यंतचा त्यांचा प्रवास यात दाखवला आहे. या चित्रपटात अनंत विजय जोशी यांनी अजयची भूमिका साकारली आहे. परेश रावल यांनी महंत अवैद्यनाथ यांची भूमिका केली असून त्यांनी अजयच्या प्रवासाला दिशा दिली. हा चित्रपट शंतनू गुप्ता लिखित बेस्टसेलिंग पुस्तकावर आधारित असून राजकारण आणि अध्यात्म यांचा सुंदर संगम घडवतो.

# आतली बातमी फुटली...

वीजी फिल्म्स या बॅनरअंतर्गत दिग्दर्शक विशाल पी. गांधी आणि जैनेश इजरदार मराठी प्रेक्षकांसाठी 'आतली बातमी फुटली' हा चित्रपट घेऊन आले आहेत. एका खूनाच्या सुपारीच्या रहस्यभेदाभोवती या सिनेमाची कथा फिरते. जोडीदाराच्या खुनाची सुपारी देण्याची वेळ आलेल्या एका नवऱ्याची आणि सुपारी घेणाऱ्या व्यक्तीची उडणारी त्रेधातिरपीट दाखवणारा 'आतली बातमी फुटली' हा चित्रपट म्हणजे उडणारा गोंधळ आणि अनपेक्षित घटनांची धमाल आहे. ज्येष्ठ अभिनेते मोहन आगाशे, ज्येष्ठ अभिनेत्री रोहिणी हट्टंगडी, पॉवरपॅक्ड अभिनेता सिद्धार्थ जाधव असे मराठीतले नामवंत चेहरे या चित्रपटाच्या निमित्ताने पहिल्यांदाच एकत्र आले आहेत. हा कॉमेडी थ्रिलर चित्रपट १९ सप्टेंबरला राज्यभरात प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. खिळवून ठेवणारी कथा असलेला 'आतली बातमी फुटली' प्रेक्षकांसाठी मनोरंजनाची ट्रीट ठरणार आहे. धक्कादायक वळण घेणारा हा चित्रपट प्रत्येकाला 'सरप्राईज' करेल असा विश्वास दिग्दर्शक विशाल गांधी यांनी व्यक्त केला.



# अनुपर्ण रॉय यांचा सन्मान

२०२५ चा व्हेनिस चित्रपट महोत्सव २७ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर दरम्यान इटली इथे पार पडला. त्यात चित्रपट निर्मात्या अनुपर्ण रॉय यांना 'साँग्स ऑफ फरगॉटन ट्रीज' या त्यांच्या पहिल्याच चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकाचा पुरस्कार मिळाला. संपूर्ण देशासाठी हा अभिमानाचा क्षण ठरला. 'साँग्स ऑफ फरगॉटन ट्रीज' या चित्रपटासाठी त्यांना ओरिझोन्टी विभागाचा सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक पुरस्कार देण्यात आला. समारोप समारंभात ओरिझोन्टी ज्युरीच्या अध्यक्षा, फ्रेंच चित्रपट निर्मात्या ज्युलिया डुकोर्नो यांनी या पुरस्काराची घोषणा केली. ही कामगिरी भारतीय चित्रपटसृष्टीसाठी एक महत्त्वाचा टप्पा मानली जाते आहे. हा चित्रपट अनुराग कश्यप यांनी सादर केला होता. महोत्सवाच्या ओरिझोन्टी स्पर्धा विभागात त्याचा प्रीमियर झाला.

पुरस्काराबाबत अनुपर्ण म्हणाल्या, 'जिला नेहमीच दुर्लक्षित केले गेले किंवा कमी लेखले गेले अशा प्रत्येक महिलेला हा चित्रपट समर्पित आहे. मला आशा आहे की, या विजयामुळे महिलांचा अधिक आवाज आणि शक्ती जगाच्या समोर येईल.' चित्रपटाची कथा थोया नावाच्या एका सुंदर आणि बुद्धिमान स्थलांतरित मुलीची आहे. तिला अभिनेत्री व्हायचे आहे आणि तिची धडपड यात मांडली आहे. इटलीच्या व्हेनिस येथे पांढऱ्या साडीत पुरस्कार स्वीकारण्यासाठी आलेल्या अनुपर्ण रॉय यांनी या सन्मानाचे वर्णन 'स्वप्न साकार होण्याचा क्षण' असे केले आहे.



# एआय विरुद्ध ऐश्वर्या!

ऐश्वर्या राय बच्चन ग्लॅमर, अभिनय आणि व्यक्तिमत्त्वासाठी नेहमीच चर्चेत असते. बराच काळ मोठ्या पडद्यापासून दूर राहूनही ऐश्वर्याची लोकप्रियता तशीच आहे. नुकतीच स्वत:च्या व्यक्तिमत्त्वाच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी तिने दिल्ली उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. एआयद्वारे अश्लील आणि बनावट सामग्री तयार करून आपले फोटो आणि नाव वापरले जात असल्याचा तिने आरोप केला. या फोटोंचा वापर कॉफी मग, टी-शर्ट आणि इतर वस्तू विकण्यासाठी केला जात आहे. ऐश्वर्याच्या वकिलांनी सांगितले की इंटरनेटवर फिरणाऱ्या या प्रतिमा पूर्णपणे एआय जनरेटेड आहेत आणि कोणत्याही वास्तवाशी जुळत नाहीत. परंतु तरीही तिचे नाव आणि चेहरा जोडून पैसे कमावले जात आहेत. तिचे नाव आणि चेहरा वापरण्याचा अधिकार कोणालाही नाही. न्यायालयाने या प्रकरणी पुढील सुनावणी ७ नोव्हेंबर रोजी संयुक्त रजिस्ट्रारसमोर आणि १५ जानेवारी २०२६ रोजी उच्च न्यायालयात ठेवली आहे. या बॉलिवूड सुपरस्टारला नेहमीच आपले कुटुंब आणि वैयक्तिक जीवन गोपनीय ठेवायचे असते. परंतु इंटरनेट आणि सोशल मीडियाच्या साम्राज्यात तिच्या नावाचा आणि प्रतिमेचा गैरवापर सतत वाढतो आहे. ही याचिका दाखल करून ऐश्वर्याने स्पष्ट संदेश दिला आहे की आपल्या प्रतिमेचा आणि व्यक्तिमत्त्वाचा कोणताही बेकायदेशीर वापर सहन केला जाणार नाही. हे प्रकरण केवळ बॉलिवूड सेलिब्रिटीसाठीच नाही तर संपूर्ण डिजिटल आणि सोशल मीडियावर सेलिब्रिटी हक्कांच्या संरक्षणासाठी एक महत्त्वाचे उदाहरण ठरेल अशी चिन्हे दिसत आहेत. तिच्यापाठोपाठ अभिषेक बच्चननेही याच कारणासाठी कोर्टात धाव घेतली आहे.



# 'द बॅड्स ऑफ बॉलीवूड' आणि 'द ट्रायल सीझन २'

शाहरुख खानचा मुलगा आर्यन खान याची 'द बॅड्स ऑफ बॉलीवूड' ही वेब सिरीज १८ सप्टेंबर २०२५ पासून नेटफ्लिक्सवर दाखवली जाणार आहे. या वेब सिरीजद्वारे आर्यन खान लेखक-दिग्दर्शक म्हणून पदार्पण करत आहे. ही सिरीज बॉलिवूडच्या ग्लॅमरस दुनियेमागील खरे आणि काहीसे विचित्र जग प्रेक्षकांसमोर आणणार आहे. बाहेरून चकाचक दिसणाऱ्या या दुनियेच्या आत यशस्वी होण्यासाठी काय काय करावे लागते आणि प्रसिद्धीच्या झगमगाटामागे दडलेले वास्तव काय आहे ते या सिरीजमध्ये धाडसीपणे दाखवण्यात येणार आहे. या सिरीजमध्ये लक्ष्य लालवानी मुख्य भूमिकेत आहे. त्यात बॉबी देओल, मोना सिंग, मनोज पाहवा यांसारखे दमदार कलाकार आहेत. विशेष म्हणजे शाहरुख खान, सलमान खान, रणवीर सिंग आणि करण जोहर यांच्यासारखे अनेक मोठे कलाकारही त्यात आहेत. 'द बॅड्स ऑफ बॉलीवूड' या मालिकेतून आर्यन खान प्रेक्षकांचं मनोरंजन करण्यात यशस्वी ठरेल, अशी आशा आहे. दरम्यान, काजोलच्या 'द ट्रायल-प्यार, कानून, धोका' या सीरिजच्या पाहिल्या भागाला प्रेक्षकांनी खूप प्रेम दिल्यानंतर आता सीरिजचा दुसरा भाग प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. सीरिजच्या पहिल्या सीझनची कथा काजोलने साकारलेल्या वकील नयोनिका हिच्याभोवती फिरणारी होती. 'द ट्रायल' चा दुसरा सीझन १९ सप्टेंबर २०२५ ला जिओ हॉटस्टार या ओटीटी प्लॅटफॉर्मवर रिलीज होणार आहे. या सीझनमध्ये काजोल पुन्हा एकदा वकील नोयोनिका सेनगुप्ताच्या प्रमुख भूमिकेत दिसणार आहे. आता या नव्या सीझनमध्येही कोर्टरुम ड्रामा आणि भावनिक गुंतागुंत यांचं मिश्रण पहायला मिळणार आहे. 'द ट्रायल'ची संपूर्ण कथा रॉबर्ट किंग आणि मिशेल किंग यांच्या 'द गुड वाईफ' या प्रसिद्ध अमेरिकन शोवरून प्रेरित आहे.

